सं. ठाणें
५१०४
५५६
१९२३
REFBK-0002363

ठाणे

… सहविचारिणी सभेनें पारितोषिक दिलेला कवितग्रंथ

सं. का. … 
ना. ५७१८७४
ठाणे

# उत्साहलहरी

पां. रा. नंदुरबारकर

सं. ०९।०६ ४
१७।३।५

॥ ॐ ॥

बडोदें येथील सहविचारिणी सभेनें पारितोषिक दिलेला कविताग्रंथ

# उत्साहलहरी

( मिस एला व्हीलर विलकॉक्सच्या निवडक लघु काव्यांचा अनुवाद )


पां. रा. नंदुरबारकर

प्रिन्सिपाल, मूकविद्यालय, बडोदें,

मूकगृहशिक्षण, आर्य वैद्यकाचा इतिहास,

इ० ग्रंथाचे कर्ते


यांनीं तयार केली ती


बडोदें नवाबाजार रोड वरील श्री प्रतापविजय प्रिन्टिंग प्रेस
मध्यें आनंदराव भाऊराव भेंडभर ह्यांनीं प्रकाशकाकरितां
छापून तयार केली. ता. २५-८-१९२३.

शके १८४५. सन १९२३.



REFBK-0002363

श्री.

# परिचय.

श्रीयुत पां. रा. नंदुरबारकर यांनीं मिस् एला व्हीलर वुईलकॉक्स या अमेरिकन कवयित्रीच्या कवनांच्या अनुवादरूपानें महाराष्ट्रीय वाङ्मयसागरांत उत्साहलहरी उत्पन्न करण्याचा हा प्रयत्न केला आहे. सहविचारिणी सभा ही बडोद्याची सुप्रसिद्ध वाङ्मयपोषक संस्था सर्वपरिचितच आहे; या सभेच्या विद्यमानेंच उत्साहलहरी प्रसिद्ध होत असून, तिनें बक्षिस रूपानें या काव्यावर आपलें मोर्तबसूद केलें आहे.

रा. नंदुरबारकर यांनीं या आपल्या कृतीला काव्य असें ह्मटलें आहे. अलीकडे काव्य या अभिधानांत, ज्या अनेक गोष्टींचा समावेश मानला जातो, त्या अर्थानें 'उत्साहलहरी' काव्य आहे हें खरें; परंतु काव्याची जी सर्वमान्य व सर्वप्रसिद्ध व्याख्या 'रसात्मकं काव्यं', ही जर काव्याची कसोटी मानिली, तर माझ्या मतें रा. नंदुरबारकरांची कृति काव्य न मानतां, सुभाषित मानणें, अधिक सयुक्तिक होईल. खरोखरीं हल्लीं काव्य व सुभाषित, यांतील भेद अधिक स्पष्टतर झाला पाहिजे. एखादा सुंदर विचार सुंदर, चटकदार अथवा पाठांतराला सुलभ, अशा रीतीनें वृत्तांत व्यक्त केला, तर त्याला सुभाषित ह्मणणेंच योग्य आहे; परंतु तें काव्य मात्र नव्हे. रसपरिपोषाच्या निकषावरच काव्याची परीक्षा व्हावयास पाहिजे, व या दृष्टीनें कोणत्याहि काळांतील पुष्कळसें पद्यवाङ्मय सुभाषितच होय. भर्तृहरीचीं शतकें, अथवा समर्थांचे मनाचे श्लोक हे उत्तम सुभाषिताचे नमुने आहेत; परंतु तीं काव्यें नव्हत. याच कसोटीनें पाहतां, 'उत्साहलहरी', ही सुभाषिताच्या वर्गांत जाईल.

तेव्हां सुभाषित या दृष्टीनें पाहतां, मिस वुईलकॉक्स ही लेखिका उत्तम सुभाषितकर्त्री असल्यानें, तिचे विचार फार आनंददायक, कर्तव्यप्रवण, नित्य व्यवहारात्मक व सुलभग्राह्य असे आहेत. वर्डस्वर्थच्या कवितेप्रमाणें, ते सुंदर वृत्तबद्ध गद्य आहेत, असें ह्मटलें तरी चालेल. यामुळें मिस वुईलकॉक्सची प्रसिद्धि फार झाली आहे, ती योग्यच आहे. तिच्याच विचारांचा अनुवाद, रा. नंदुरबारकरांनीं केला असल्यामुळें, त्यांतील विषय सुंदरच आहेत.

अशा सुभाषितांना साधी, सोपी, सरळ, सहजप्रवाही रचना फार अनुकूळ असते व अशी रचना हा नंदुरबारकरांच्या कृतीचा विशेष आहे. मोठ्यामोठ्या

उपमा, कल्पनेच्या भराऱ्या, संस्कृतप्रचुर भाषा, यांचा त्यांच्या कृतींत अभाव असून, ती सरळ, प्रसन्न, अशी असते. त्यांच्या प्रस्तुत कृतींपैकीं, 'प्राचीन व अर्वाचीन संस्कृतीचा योग', 'जीवात्मप्रवास', 'दुःख मित्र आहे,', 'विषयाचें आझ', 'पोकळ तत्वज्ञान', 'प्रेमाष्टक', 'जगांत वेडेच वेडे' वगैरे उतारे सुंदर आहेत. विशेषतः अलीकडील फॅशन प्रमाणें, घारीचे पंख लावून, आकाशाच्या पोकळींत, उड्या मारणाऱ्या कित्येक डोमकावळ्याप्रमाणें, त्यांनीं गूढगूहन करून, फजीत पावण्याचा उद्योग न करितां, साध्या व अल्पजलच कां होई ना, पण स्वच्छोदकपुष्करिणींत विहार करणाऱ्या बदकाचें व्रत स्वीकारलें आहे, हें त्यांना भूषणास्पद आहे. तसेंच ज्यानें उठावें, त्यानें सर्व महाराष्ट्राला सर्वकाळ होळीचाच सण आहे समजून, जणूं काय सर्व जग निद्रिस्त असून, आपणच एकटे जागे असण्याच्या बाहाण्यानें, शिंगें, शंख, तुताऱ्या व शेवटीं शंखध्वनीहि फुंकण्याचें सोंग आणावें. तसेंहि कांहीं त्यांनीं केलें नाहीं, हेंहि त्यांच्या कृतीच्या समंजसपणाचें द्योतक आहे. स्वच्छ, साध्या, नित्यप्राप्य, पण अत्यंत अवश्य, अशा जलाप्रमाणें अथवा पोषक अन्नाप्रमाणें, त्यांचें सुभाषित, मधुर व उपयुक्त आहे. त्याचा आस्वाद महाराष्ट्रीय जनता घेईल, अशी आशा आहे.

बाण मारील तेथून पाणी काढणाऱ्या अर्जुनाप्रमाणें, सर्वांना उदक काढतां आलें नाहीं, तरी आस्वाद घेऊन, त्याची परीक्षा करितां येतें; त्याचप्रमाणें सुभाषित निर्माण करितां आलें नाहीं, तरी त्याची रुचि मला घेतां येते. इतकाच रा. नंदुरबारकरांच्या कृतीचा परिचय इतरांना करून देण्याचा माझा अधिकार आहे, असें मी समजतों व ह्मणून हें कार्य मी आनंदानें करीत आहे, व तें करण्याची संधि मला दिल्याबद्दल, मी रा. नंदुरबारकरांचा आभारी आहे. एकदां परिचय करून देऊन, त्यांना वाचकांच्या कडे सोंपल्यावर, अर्थातच मी सुटलों; सबब हें परिचयकार्य करून, मी मागें सरतों.

बडोदें, रावपुरा,
मिति श्रावण शुद्ध १५.
शके १८४५.

(सही) दाजी नागेश आपटे

# प्रस्तावना.

दिवाण बहादुर वासुदेव महादेव समर्थ, बडोद्यास सन १९१२ मध्यें, अमात्यपदारूढ झाले. ते सहविचारिणी सभेचे उत्पादकही होते. ते अमात्य-पदाधिष्ठित असतांना, सभेचा मी एक चिटणीस होतों. कार्यानिमित्त त्यांच्या कडे मी गेलों असतां, मला कविता करण्याचा नाद आहे, असें एका गृहस्था-कडून त्यांना कळलें. त्या बरोबर त्यांनीं सुचविलें कीं, श्री समर्थ रामदास स्वामींनीं, त्यांना त्या काळीं पाहिजे होतें, तसा बोध मनाला केला; त्याच प्रमाणें सांप्रत काळीं आपणांस हावें आहे, त्या विषयीं बोध आहे, असे मनाचे श्लोक तुम्ही करावें. त्या प्रमाणें करून, दिवाण बहादुर यांस, ते मी वांचून दाखविले.

त्या वेळीं अमेरिकेची प्रसिद्ध कवयित्री, मिस एला व्हीलर विलकॉक्स, हिच्या काव्यग्रंथाचे चार पांच भाग, मजकडे त्यांनीं पाठविले व त्यांतील निवडक वेंचे, मराठींत शोभण्यासारखे घेऊन, त्यांचा अनुवाद मराठी कवितांत करावा, अशी सूचना केली.

सन १९१३ त सभेचा वार्षिकोत्सव त्यांचे बंगल्यावर थाटानें झाला. त्या वेळीं भरसभेंत कवितांचे परीक्षण करण्यांत आलें व कविता बरी आहे, असा सभेचा अभिप्राय झाला. पुढें सभेनें विचारल्यावरून, दिवाण बहादुरांनीं, आपला अभिप्राय, पुढील प्रमाणें, व्यक्त केला आहे. ते म्हणतातः—

> रा. नंदुरबारकर यांनीं आह्मी सुचविल्यावरून, मिस विलकॉक्स या अमेरिकन बाईच्या कवितांवरून, मराठी भाषेंत कविता केलेल्या पाहिल्या. त्यांत मूळ कवितांतील भावार्थ बरा उतरला आहे. कविता चांगली साधली आहे, दुर्बोध नाहीं, सरळ आहे, आश्रयास पात्र आहे.

सारांश, दिवाण बहादुर समर्थांच्या व सहविचारिणी सभेच्या प्रोत्साहना-नेंच उत्साहलहरी प्रगट होत आहे. तिचें सर्व श्रेय त्यांजकडे आहे व म्हणून त्या उभयतांचे आभार मानावें, तितके थोडेच होणार आहेत.

सन १९१५ चे वार्षिकोत्सवाचे वेळीं सभेनें मला ५० रुपयांचें पारितोषिक देण्याचें ठरविलें व पुस्तक, महायुद्धाची महर्गता बंद झाल्यावर, छापावें, असें सुचविलें.

तो योग सन १९२३ मध्यें आला आहे. प्रथम फेब्रुवारींमध्यें काम संपेल, असा छापखानेवाल्यांचा अंदाज होता; परंतु त्यांच्या कित्येक अडचणीमुळें, एवढा विलंब झाला. असो.

या कामांत आमचे बंधु, चि. रा. कृष्णाजी रामचंद्र संत व मित्र, रा. प्रेमानंद छोटालाल शहा, यांनीं पुष्कळ सहाय्य केलें आहे; त्या बद्दल त्यांचे आभार मानणें उचित आहे.

रा. रा. दाजी नागेश आपटे, बडोद्यांतील एक उत्कृष्ट विद्वान् गृहस्थ, वकील, यांनीं या लहान ग्रंथास 'परिचय' लिहून देण्याचें परिश्रम केले, या मुळें त्यांचे मजवर मोठे उपकार झाले आहेत.

या कविताग्रंथांत मनाचे श्लोक व आरंभींचीं पांच सात अष्टकें, स्वतंत्र आहेत. बाकीचे वेंचे मिस एला व्हिलकॉक्स बाईच्या कविताग्रंथातील आहेत. परकीय भाषेंतील विचारांचे स्वभाषेंत रूपान्तर करणें अगोदर कठीणच; त्यांतले त्यांत कवितेंत करणें, त्याहून ही कठीण; हें विद्वान लोकांस सांगावयास नकोच. तथापि यथामति प्रयत्न करून, तो महाराष्ट्र रसिक लोकांपुढें, मी सादर करीत आहें. तो सर्वांनीं गोड करून घ्यावा, अशी विनंती आहे.

ही उत्साहलहरी आबाल वृद्धांच्या अंतःकरणांत प्रविष्ट होवो व त्यांचें मनोबल वाढविण्यास कारण होवो, अशी प्रार्थना मनोभावें परमेश्वरास करून, हा प्रास्ताविक लेख संपवितों.

नजरपागा-बडोदें<br>नारळी पौर्णिमा<br>शके १८४५

पां. रा. नंदुरबारकर.

काव्य ८२५

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६ | झाल | झालें | ५८ | १ | हाती | हाती |
| १ | १९ | कोपऱ्यात | कोंपऱ्यातें | ५८ | ५ | लान | लीन |
| २ | ८ | रम्य | रम्य. | ६० | ४ | बुद्धाच्य | बुद्धीच्या |
| २ | ११ | झाली | झाली. | ६० | ११ | कांपुना | कांपुनी |
| २ | २८ | प्रभुति | प्रभृति. | ६० | २१ | लापतसे | लोपतसे |
| ३ | १० | वांधी | बांधी | ६० | २९ | आधश | आद्यशक्ति |
| ५ | ११ | शांता | शांती | ६१ | ६ | भांढगी | भांडगी |
| ६ | ५ | महामागरीं | महासागरिं | ६१ | १० | शक्ता | शक्ती |
| ८ | ६ | कलाकौश | कलाकौशल | ६१ | ११ | जीघात्मा | जीवात्मा |
| ८ | १६ | साऱ्याही | साऱ्याहि | ६१ | १८ | स्री | स्त्री |
| १० | १३ | काढुनी | काढुनि | ६२ | ३ | अल्यावर्ध | अल्पावधी |
| १० | १४ | कार्यासहा | कार्यासहि | ६४ | ७ | लाकीं | लोकीं |
| १० | १६ | कोणी | कोणि | ६४ | ७ | विलाकीं | विलोकीं |
| [illegible]३ | ६ | सान | सोनें | ६४ | १८ | झाला | झाला |
| [illegible] | ६ | तरी | तरि | ६६ | २५ | आनंदाच | आनंदाची |
| [illegible]१ | १ | स्वकरीं | स्वकरिं | ६७ | २४ | विलाकीं | विलोकीं |
| [illegible]३ | ४ | मदान | मैदान | ६९ | १७ | इच्छारुप | इच्छारुपी |
| [illegible]५ | १३ | सदव | सदैव | ७० | ६ | सहजां | सहजीं |
| [illegible]७ | १८ | अश्वस्थाना | अश्वस्थामा | ७० | ७ | झांलिले | झांकिलें |
| [illegible] | ३० | जीन | जीनें | ७० | २६ | झुतीनयन | श्रुतीनयन |
| [illegible] | ३० | सूयमाला | सूर्यमाला | ७० | २६ | ज्ञानबुद्धी | ज्ञानवृद्धी |
| [illegible] | २३ | प्रभुपादीं | प्रभुपादिं | ७० | २८ | झाला | झाला |
| [illegible] | ६ | जगता | जगती | ७१ | १९ | असौख्य | असौख्यभय |
| ३[illegible] | १६ | दुःख | दुःखें | ७२ | २ | कोंदाटत | कोंदाटतो |
| ४[illegible] | १२ | क्रूरपणान | क्रूरपणानें | ७२ | ९ | मनावास | मनोवासना |
| ४[illegible] | २६ | ततारी | तुतारी | ७२ | १५ | बतवती | बलवती |
| ४[illegible] | २ | दुंदुभाचे | दुंदुभीचे | ७४ | ३ | हेमहेतु | हेमसेतु |
| ४[illegible] | १९ | मलान | मलीन | ७५ | २० | अधिक | अधिक तो |
| ४[illegible] | २२ | उज्ज्वला | उज्ज्वला | ८५ | १३ | आझीं | ओझीं |
| ५[illegible] | ९ | लाकी | लोकीं | ८५ | २० | विभु | विभू |
| ५[illegible] | २३ | विगाधा | विरोधा | ८५ | २४ | द्यावें | द्यावें |

# अभिप्राय.

कै. रा. बा. विष्णु मोरेश्वर महाजनि एम. ए., वऱ्हाड प्रान्ताचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन ह्मणतातः—

रा. रा. नंदुरबारकर यांनीं सुप्रसिद्ध कवयित्री, एला व्हीलर व्हिलकॉक्स, यांच्या निवडक उत्साहजनक लघुकाव्यांचें मराठींत पद्यमय भाषान्तर केलें आहे. त्यांतील कांहीं कविता मी वांचिल्या. निवड बरी, रचना सरळ, यामुळें अर्थ समजण्यास अडचण पडत नाहीं.

मुंबई,
ता. १८-५-१९१५

( सही ) वि. मो. महाजनि

रा. रा. सीताराम वासुदेव पेंडसे बी. ए., माजी चीफ एज्युकेशनल इन्स्पेक्टर, व हल्लीं बडोदें प्रांताचे नायब सुभे, ह्मणतातः—

रा. पां. रा. नंदुरबारकर, ह्यांनीं आंग्ल कवयित्री, एला व्हीलर व्हिलकॉक्स, हिच्या कवितांवरून, मराठी कविता केल्या आहेत. त्या बहुतेक आम्ही वांचिल्या. कवितांचा मूळ विषय तत्वज्ञान, मानसशास्त्र, हा असल्यामुळें, त्याला काव्यांत उतरवून मनोरंजक करणें, सामान्यतः कठीणच आहे. तथापि रा. नंदुरबारकरांची ही कृति बरीच चांगली उतरली आहे. कवितांच्या उदात्त विषयाला साजेल, अशी भाषा असून ही, ती साधी व शब्दरचनाही सुबोध असल्यामुळें, कविता समजण्यास अडचण पडत नाहीं. कवितांमध्यें प्रसादगुण बराच आहे. कित्येक ठिकाणीं तर हा अनुवाद नसून, कवीची स्वतंत्र कृतीच आहे, असा भास होण्या-इतकी, काव्यरचना चांगली वठली आहे. एकंदरींत रा. नंदुरबार-करांची कृति, त्यांच्या इतर कवितां इतकीच, आदरणीय व उत्तेजनास पात्र आहे.

रावपुरा, बडोदें,
ता. २५-१०-१९१९

( सही) सी. वा. पेंडसे

## अनुक्रमणिका.


| नांव. | श्लोक संख्या. | पृष्ठांक. |
|---|---|---|
| मनाचे श्लोक. | २६ | १ |
| उत्साह. | ८ | २ |
| चिंता. | ८ | ३ |
| संदेह. | ८ | ४ |
| निश्चय. | ८ | ४ |
| शांति. | ८ | ५ |
| सततोद्योग. | ८ | ५ |
| भीति. | ८ | ६ |
| आनंद. | ८ | ७ |
| श्रद्धा. | ८ | ७ |
| विषयाचा अनुभव. | ८ | ८ |
| दुःख ज्याचें त्याला. | १२ | ९ |
| स्वीकृत कार्य. | ७ | १० |
| स्वकर्म करा. | ६ | १० |
| विचारसामर्थ्य. | २ | ११ |
| मनाची एकाग्रस्थिति. | ५ | ११ |
| अल्पसंतोष सोडा. | ६ | १२ |
| प्रमाद, यशाचे स्तंभ. | ५ | १२ |
| सुदैव. | ७ | १२ |
| जीवात्मप्रवास. | १० | १३ |
| देवमंदिर. | ४ | १४ |
| दृढ निश्चय. | ४ | १५ |
| विश्वाची उत्पत्ति. | ४ | १५ |
| दुःख मित्र आहे. | ४ | १६ |
| जीवित क्षणभंगुर आहे. | ९ | १७ |
| धीर. | ७ | १७ |

| | | |
|---|---|---|
| शांतिगीत | १२ | १८ |
| अधिकार. | ६ | १९ |
| वाट दाखवा. | १२ | २० |
| आस्था. | ४ | २० |
| विषयांचें आंझें. | ७ | २१ |
| जीवाची उन्नति. | १० | २२ |
| अज्ञात राज्य. | ३ | २२ |
| जीवनमार्ग. | ६ | २३ |
| कर्मयोग. | ८ | २३ |
| देवकार्य. | ५ | २४ |
| दुःखाचे उपयोग. | ८ | २५ |
| देव आणि मी. | १० | २५ |
| जन्माचा हेतु. | ६ | २६ |
| इच्छाशक्ति. | ५ | २७ |
| जीवाचा प्रवास. | ८ | २७ |
| अभिमानखंडण. | ६ | २७ |
| तीन मित्र. | ८ | २८ |
| जग उत्कृष्ट होत आहे | १० | २९ |
| प्रेमाचें माप. | ४ | ३० |
| आज. | ३ | ३१ |
| उपदेश. | ८ | ३१ |
| आन्तर्दृष्टि. | ११ | ३२ |
| पोकळ तत्वज्ञान. | २ | ३२ |
| खरा ज्ञानी. | ४ | ३३ |
| जग सुखमय आहे. | ८ | ३३ |
| शब्दसामर्थ्य. | ५ | ३४ |
| आमचा वारसा. | ३ | ३५ |
| जीवाची समस्थिति. | ३ | ३५ |
| सिद्धीचें मूळ | ४ | ३५ |
| जगदुन्नतीची इच्छा. | ६ | ३६ |
| जन्माचें सार्थक्य. | ३ | ३७ |
| पुनरुक्ति. | ३ | ३७ |
| मृत्यूची पृच्छा. | ४ | ३८ |
| अहं ब्रह्मास्मि. | ८ | ३८ |
| प्रातःस्तवन. | ४ | ३९ |
| पूर्ण सिद्धाति. | [illegible] | ३९ |

| | | |
|---|---|---|
| आनंदाचा उपयोग. | ८ | ४० |
| माया. | ४ | ४१ |
| कर्मानें अधिकार. | ६ | ४१ |
| जाति जगांत नाहींत काय ? | ७ | ४२ |
| बायकांचे युद्धाविषयीं विचार. | २० | ४३ |
| वाणी. | ८ | ४४ |
| वादाचा निर्णय. | ८ | ४५ |
| असा काळ सर्वांस येतो. | ५ | ४५ |
| भूतकाळ विसरा. | १२ | ४६ |
| नट व नाटक. | ९ | ४७ |
| कष्टावांचून सिद्धि नाहीं. | १० | ४८ |
| अविश्वास. | ५ | ४९ |
| दया माउली. | ६ | ४९ |
| जग चांगलें होत आहे. | ६ | ५० |
| जीवन मारवाडी आहे. | ५ | ५१ |
| विपत्ति. | ५ | ५२ |
| सफळ प्रार्थना. | ४ | ५२ |
| जीव अमर आहे. | ४ | ५३ |
| आशावाद. | ७ | ५४ |
| जग चांगलें व वाईट. | ५ | ५४ |
| आत्मश्रद्धा. | ९ | ५५ |
| पुनर्जन्माचें कारण. | ४ | ५५ |
| प्रेमच ईश्वर आहे. | ५ | ५६ |
| कलियुगाचा दोष. | ६ | ५६ |
| प्रेमाष्टक. | ८ | ५७ |
| गुण घ्यावेत. | ६ | ५८ |
| खरी योग्यता. | ६ | ५८ |
| कालावधि. | ११ | ५९ |
| कालाचा तडाखा. | ८ | ५९ |
| इच्छाशक्ति. | ४ | ६१ |
| भवभार. | ४ | ६१ |
| माझें स्वामित्व. | ६ | ६२ |
| गुप्त रत्नें. | ५ | ६२ |
| आनंददेव. | ११ | ६३ |
| शत्रु. | ७ | ६३ |

| | | |
|---|---|---|
| जगांत वेडेच वेडे. | ७ | ६४ |
| पंथ. | ७ | ६५ |
| दोन पेल्यांचा संवाद. | १६ | ६५ |
| प्रातःस्तवन. | ४ | ६६ |
| मी कसा आहे. | ९ | ६७ |
| प्रेमच पुरे. | ८ | ६८ |
| श्रेष्ट कर्तव्य. | ४ | ६८ |
| तुमची नौका. | ७ | ६९ |
| स्वभक्ति करिं शेंवटीं. | ५ | ७० |
| भावी धर्म. | ८ | ७१ |
| विचाराकर्षण. | ३ | ७२ |
| जीवनदी. | १० | ७२ |
| लोकांस प्रार्थना. | १० | ७३ |
| जर. | ५ | ७४ |
| ज्योतिष्यास उत्तर. | ८ | ७५ |
| मुक्ति. | ३ | ७६ |
| जगाची प्रगति. | ६ | ७६ |
| दान. | ४ | ७७ |
| सिद्धि. | ४ | ७७ |
| असंतोष. | ३ | ७८ |
| गुप्त विचार. | ६ | ७८ |
| सेवकसंहार. | ४ | ७८ |
| खरा श्रीमंत कोण ? | १५ | ७९ |
| वर्षप्रतिपदेचा निश्चय. | ६ | ८० |
| प्रेम. | ६ | ८१ |
| भावी अवतार. | १० | ८२ |
| प्रेमाचें साम्राज्य. | १९ | ८३ |
| धैर्य. | ५ | ८४ |
| स्थित्यंतर. | ६ | ८४ |
| लोकांस काय पाहिजे. | ८ | ८५ |
| इच्छादेवी. | ३ | ८६ |

श्री.

# अर्पणपत्रिका.

दिवाण बहादुर वासुदेव महादेव समर्थ बी. ए.

श्रीमंत गायकवाड सरकारचे माजी अमात्य
व
बडोदें सहविचारिणी सभेचे आद्य प्रवर्तक

यांसी,

त्यांच्या निस्पृहता, स्वजनप्रेम, राष्ट्राभिमान, तेजस्विता, उद्योगशीलता, वाङ्मयाभिरुचि, काव्यप्रीति, संहतिप्रियता, परोपकारबुद्धि इ० सद्गुणास्तव हा लहान कविताग्रंथ सन्मानपूर्वक अर्पण केला आहे.

पां. रा. नंदुरबारकर

श्री.

# उत्साहलहरी.

## मनाचे श्लोक.

क्र. २३६३

### प्राचीन व अर्वाचीन संस्कृतींचा योग.

सकाळीं हरीचें सदा नाम ध्यावें ॥ शुची हो, करीं स्नानसंध्यादि भावें ॥
स्वदेकाग्रता सिद्धि आरोग्य देते ॥ मना, उन्नती शुद्ध भावें घडे ते ॥ १ ॥
पिता, बंधु मातेवरी प्रेम इष्ट ॥ स्वदुत्कर्ष साधावया त्यांस कष्ट ॥
गुरु स्वत्व मानुष्य दे मानवाला ॥ मना, योग्य ह्या देवता वंदमाला ॥ २ ॥
गुरूचा कदा दोष काढूं नको रे ॥ न निंदा करीं, राहसीं तूंचि कोरें ॥
गुणांची प्रशंसा सदा चांगल्यांची ॥ मना, देतसे श्रेष्ठता तूज साची ॥ ३ ॥
न निंदा करीं कोणत्याही जनाची ॥ स्तुती आदरीं योग्य मोठ्या नरांची ॥
तुझा होय उत्कर्ष यानेंच बापा ॥ मना, चिंतना वृत्ति तैसी अपापा ॥ ४ ॥
मना, मानसीं क्षुद्र वृत्ती नसावी ॥ स्वकीयांवरी प्रेम दृष्टी वसावी ॥
करीं आगतांचा यथायोग्य मान ॥ मना, सान मोठे असावें समान ॥ ५ ॥
जुनी संस्कृती-वेदशास्त्रीं पुराणीं ॥ जिला पाहुनी गातसे विश्व[१] गाणीं ॥
उपेक्षूं नको ती तुझ्या उन्नतीला ॥ मनारे करीं, पाहसी काय लीला ॥ ६ ॥
मना, सोडि ना आपुला धर्म पाहीं ॥ स्वधर्माविना सौख्य होणार नाहीं ॥
सदाचारमार्गांतुनी तीक्ष्ण कांटे ॥ परी धैर्य ठेवोनि जा त्याचि वाटे ॥ ७ ॥
मना, ब्राह्मणक्षत्रियीं वैश्यशूद्रीं ॥ रथा ओढिलें राष्ट्ररूपी अतंद्रीं[२] ॥
जयाचे तयानें स्वयें कार्य केलें ॥ ह्मणोनी पुरा राष्ट्र देदीप्य[३] झालें ॥ ८ ॥
मुनी जाहले व्यास वाल्मीकि जैसे ॥ बली जन्मले मारुती भीम तैसे ॥
कुबेरापरी वैश्य झाले धनेश ॥ मही अन्नपूर्णा, मना पूर्ण तोष ॥ ९ ॥
फिरोनी जगीं चारही कोपऱ्यात ॥ धना आणिती उद्यमी वैश्यनेते[४] ॥
जगांतील चाऱ्ही समुद्रीं नहाती ॥ हिरे माणकें स्वर्ण मोत्यें वहाती ॥ १० ॥
कृषीकार ते वत्स भूधेनुकेचे ॥ पिती पाजिती दुग्ध त्या जन्मदेचें ॥
मना, सर्व वर्णी महाकार्य केलें ॥ सुवर्णत्व या आर्यभूमीसि आलें ॥ ११ ॥
श्रुती जाहल्या सर्व आधार धर्मा ॥ स्मृती सांगती मानवी धर्मकर्मा ॥
अती सूक्ष्म तीं योगमंत्रादि शास्त्रें ॥ विचारें मना, निर्मिलीं घोर अस्त्रें ॥ १२ ॥
गिरा[५] संस्कृता पाणिनी आकळीतो ॥ जगीं सर्व झाला सुकीर्तीपती तो ॥
मना, मंथुनी वेदशास्त्रोदधीतें ॥ करीं जिष्णुच्या दे सुधा श्रीहरी ते ॥ १३ ॥
जगांतील साऱ्याहि दर्शांत गीता ॥ असे मान्य झाली जना बुद्धिमंता ॥

---

१ सारें जग. २ निरलस. ३ प्रकाशमान, प्रसिद्ध. ४ मोठे मोठे व्यापारी. ५ भाषा.

उदेलें मना काव्यकर्तृत्व लोकीं ॥ महाकोशही काव्यरूपी त्रिलोकीं ॥१४॥
कवी जाहले कालिदासासमान ॥ महायोध ही द्रोणभीष्म[1] प्रधान ॥
मुनी शोधुनी आंतली सृष्टि सारी ॥ मना आणिती देवसामर्थ्य भारी ॥ १५ ॥
बसोनी वनीं त्यागुनी सर्व पाहीं ॥ घरीं आणुनी मोडिला देव त्यांहीं ॥
जगाला दिला धर्म त्यांनीं उदंड ॥ जुन्या संस्कृतीचा प्रभाव त्रिखंड ॥१६॥
नवी संस्कृती पाहुणी आर्यदेशीं ॥ इहोत्कर्ष साधावयातें पुरेशी ॥
महापर्व हें पातलें भाग्ययोगें ॥ मना कांस बांधोनि कार्यास लागे ॥१७॥
हिनें व्यापिलीं चार खंडें जगाचीं ॥ दुजी सृष्टि केली नवी रम्य साची ॥
जुनें शोधुनी वाढविलें प्रयत्नें ॥ नवीं खोदुनी काढिलीं दिव्य रत्नें ॥ १८ ॥
नभीं शोधुनी काढिले नव्य तारे ॥ स्थला खंडुनियां खनींचे पसारे ॥
मना यंत्रनौकादि शास्त्रें निघालीं ॥ जगाची स्थिती त्यामुळें श्रेष्ठ झाली ॥१९॥
रवी जाहलासे जगीं चित्रकार ॥ प्रचेता[2] तसा वाहती अग्नि भार ॥
मना, चंचला[3] होय सदेशवाही[4] ॥ करीतें सदा गान आकाश[5] पाहीं ॥२०॥
स्थलीं वाष्पयानें, जलीं अग्निनौका ॥ विमानें नभीं, ओढिते वीज पंखा ॥
मना सारथी वीज झाली नरांची ॥ दिवे लाविते तीच दासी घराची ॥ २१॥
दुहेरी तुझ्या संस्कृती प्राप्य धामीं ॥ बसे स्वस्थ ना लाग आतांचि कामीं॥
नवें चांगलें तें करीं साध्य सारें ॥ बळें निश्चयें सिद्धि लाधे तुला रे ॥ २२ ॥
फिरोनी जगीं आणि विद्याधनाला ॥ न भीती धरीं सागरीं जावयाला॥
मना, ज्ञान साधोनि यावें कळेनें ॥ स्वकीयांस तें सर्व द्यावें बळानें ॥२३॥
मना मानवी शक्तिला अंत नाहीं ॥ मना सर्व सामर्थ्य तुझ्यांत पाहीं ॥
भरो अंतरीं पूर्ण मानुष्यवारें ॥ जुनी कांत टाकोनि होई नवा रे ॥ २४ ॥
पौर्वात्यपाश्चात्यसुधारणांचा ॥ संयोग झाला परिसायसांचा[6] ॥
साधील जो दोहिंस सव्यसाची ॥ त्याच्या करीं सिद्धि महोन्नतीची ॥ २५ ॥
समर्थे[7] स्वयें जागवीलें मनाला ॥ परी झोंप आली पुन्हां ही तयाला ॥
म्हणोनी कृती जाहली ही लहान ॥ समर्थांसि[7] हें वाहिलें फूल पान ॥ २६ ॥

---

## उत्साह.

### श्लोक.

उत्साह व्हावा हृदयांत भारी ॥ उत्साह सिध्यर्थ निमी तयारी
उत्साहयोगें सकलार्थ साधे ॥ उत्साहहीना सगळेंच बाधे ॥ १ ॥

---

१ द्रोण भीष्म प्रभुति. २ वरुण, समुद्र. ३ वीज. ४ निरोप पोंहचविणारी. ५ शब्द धरण्याचें यंत्र, फोनोग्राफ, याची कल्पना. ६ परीस आणि लोखंड यांचा. ७ रामदास.

उत्साह तारी विपदर्णवांत[1] ॥ उत्साह ठेवी सुखवैभवांत ॥
उत्साह त्या दुष्कर कांहिं नाहीं ॥ उत्साह देवत्व नरांत पाहीं ॥ ३ ॥
उत्साह इच्छा पुरवीत सारी ॥ उत्साह दे साधन कार्यकारी ॥
उत्साह विद्या करि पूर्ण शास्त्रें ॥ उत्साह देतो मनुजा महास्त्रें[2] ॥
उत्साह निष्काम करीत कर्मे ॥ उत्साह वागे जगिं सत्य धर्मे ॥
उत्साह शोधी जगदात्म तत्व ॥ उत्साह नारायण पूर्णसत्व ॥ ४ ॥
उत्साहयोगें नटनाटय येतें ॥ उत्साहयोगें कवि विश्वजेते[3] ॥
उत्साह दे मानवता पशूला ॥ उत्साह मोठेपण दे शिशूला[4] ॥ ५ ॥
उत्साह निर्मी नव यंत्र यत्नें ॥ उत्साह काढी खणुनी सुरत्नें ॥
उत्साह पृथ्वीजलधीसि[5] बांधी ॥ उत्साह भूमीगगनांसि[6] सांधी ॥ ६ ॥
उत्साह तारुण्य जरान्वितातें ॥ उत्साह देतो अमरत्व त्यातें ॥
उत्साह व्हावा मनुजांत शुद्ध ॥ उत्साहयोगें पुरुष प्रवुद्ध ॥ ७ ॥
उत्साह योगी धरिती बलिष्ठ ॥ उत्साह साधी गुणिही वरिष्ठ ॥
उत्साह व्हावा सकळा जनांला ॥ उत्साह ठेवीं दुबळया, मनाला ॥ ॥ ८ ॥

---

# चिंता.

## श्लोक.

चिंता करी दुर्बळ मानसातें ॥ शैथिल्य आणीत शिराशिरांतें॥
ती आग जाळीत समग्र देह ॥ शोषीत चिंता रुधिरप्रवाह ॥ १ ॥
तेजोबलातें तनुच्या हरी ते ॥ निर्माल्य चिंता सकला करीते ॥
चिंता करीते धनिका भिकारी ॥ चिंता असे फार जगीं विषारी ॥ २ ॥
चिंता जरा आणितसे अकालीं ॥ चिंता जनातें करि दुःखशाली ॥
चिंता असे जोंवरि विद्यमान ॥ कांहीं सुचे खान तसें न पान ॥ ३ ॥
चिंता असे रोग खरा मनाचा ॥ चिंता करी घात सदा जनाचा ॥
चिंता ज्वरें व्याकुळ लोक झाले ॥ केसें करावें न सुचोनी भ्याले॥४ ॥
चिंता करी संसृतिभार भारी ॥ चिंता करी बुद्धि मलीन सारी॥
चिंतापरांचें यश हारपे तें ॥ जातें तिथें दुर्बळ मार खातें ॥ ५ ॥
चिंता हरी सर्व विचारशक्ती ॥ साधे न त्यातें मग भुक्तिमुक्ती ॥
चिंता निजानंदसुखार्थ नाशी ॥ चिंता नरा ठेवितसे उपाशी ॥ ६ ॥
घेवोनि आनंद रसायनातें ॥ त्यागोनीयां दुर्बळ भावनातें ॥
व्हावें बली या जगतीं नरांनीं ॥केला गुरूनीं धरि बोध कानीं॥८॥

---

१ संकट समुद्रांत. २ मोठीं अस्त्रें. ३ जगांस जिंकणारे. ४ मुलांत ही मनोवृत्ति प्रबळ आहे, म्हणून तो मोठा आहे. ५ तारायंत्रें आणि बाष्पयानें यानीं ६ विमानांनीं.

जी संपदा लोकिं मिळावयाची ॥ कार्यें तुझ्या हातुनि व्हावयाची ॥
होणार पैशा दृढ भावनेनें ॥ नेटें करीं कर्म मनोबलानें ॥ ९ ॥

## संदेह.

### श्लोक.

संदेह वृत्ती मलिना मनाची ॥ संदेह वृत्ती निजनीचतेची ॥
संदेह उत्कर्ष अपक्वतेचा ॥ संदेह लोकीं करि घात साचा ॥ १ ॥
संदेह सामर्थ्य लयासि नेता ॥ संदेह पुत्रा करि दूर कांता ॥
संदह मैत्री न करी दुजाची ॥ संदेह कोंडोनि मनास जाची ॥ २ ॥
संदेह विद्या न करीत कांहीं ॥ ज्ञान्यासि संदेह विखार पाहीं ॥
व्यापार मोठा न घडे तयाला ॥ क्षत्रासि दे नांगर आसुडाला ॥ ३ ॥
संदेह आहे कलहासी मूळ ॥ संदेह सारें बुडवीत कूळ ॥
संदेह तेथें नच ऐक्य होय ॥ संदेह सारे रचितो अपाय ॥ ४ ॥
संदेह विश्वास न ठेवि पोटीं ॥ संदेह भोगी बहु दुःख कोटी ॥
संदेह पोटा पुरतें न खाय ॥ संदेह लोभीं बुडवीत पाय ॥ ५ ॥
संदेह आहे नच सौख्य त्याला ॥ संदेहरूपी विष उग्र प्याला ॥
संदेह आत्मोन्नतिला अपाय ॥ संदेह तेजोबल सर्व खाय ॥ ६ ॥
निजात्मसामर्थ्य कळे न ज्याला ॥ त्याचा असे संशय ज्यास आला ॥
त्याच्या मृती माळ गळ्यांत घाली ॥ हें सत्य भंगे न कदा त्रिकालीं ॥ ७ ॥
योगीश्वरीं सज्जन साधु यांनीं ॥ लोटोनियां संशय दूर त्यांनीं ॥
उद्धार केला [1] स्वजनापरांचा ॥ गाया कवीला बहु हर्ष वाचा ॥ ८ ॥

## निश्चय.

### श्लोक.

सन्निश्चयानेंच धरोनि कांस ॥ लोकांतराचा घडला विकास ॥
हा निश्चयो भूति[2] जनास देतो ॥ हा वैभवाच्या पदवीस नेतो ॥ १ ॥
नावाडि हाची विपदर्णवांत ॥ विघ्नें हरी निश्चय हा भवांत ॥
विद्यार्णवा हा शशिरूप होत ॥ या निश्चयें कार्य घडे जगांत ॥२॥
या निश्चयें साधिति योग सांग ॥ या निश्चयें भक्ति घडे अभंग ॥
या निश्चयें कर्मकला अपार ॥ या निश्चयें ज्ञान महाविचार ॥ ३ ॥

---

१ स्वकीय परकीयांचा. २ मोठेपणा, उन्नति.

याने भिकारी नृप थोर केले ॥ विद्यार्णवा पोहुनि शंख नेले ॥
शास्त्रांत केली प्रगति प्रचंड ॥ या सृष्टिची गूढ कला विखंड॥४ ॥
हाची गिरी पर्वत पोखरीत ॥ सृष्टींत सौंदर्य नवें भरीत ॥
या निश्चयें नाहिं असाध्य कांहीं ॥ नेटें चढावें भगवत्पदाही ॥ ५ ॥
आकाश शोधीत रवीस तोली ॥ तो सिंधुची लावित पूर्ण खोली ॥
पृथ्वीस कांखेंत विशंक मारी ॥ मेरूवरी मारितसे भरारी[1] ॥ ६ ॥
धृती करी चंचल मेघकन्या[1] ॥ ये त्या सती[2] पावन पूज्य धन्या ॥
मागें न घेती पद एकदांही ॥ निर्मी मुनीवीर असंख्य पाहीं ॥ ७ ॥
शिकंदरानें जग जिंकियेलें ॥ पुनीत बुध्दें जगदर्ध केलें ॥
आचार्य वेदध्वज कीं उभारी ॥ चिंतामणी हा फलरूपधारी ॥ ८ ॥

---

# शांती.

## श्लोक.

शांती अवस्था स्थिर मानसाची ॥ शांता मनोनिग्रह रूप साची ॥
विश्वोदरीं या परिपूर्ण शांती ॥ शांती प्रभूची बहु दिव्य कांती ॥ १ ॥
व्यापीतसे शांती चराचरातें ॥ शांती असे पूर्ण धराधरातें ॥
शांती सकाळीं विलसे दिनांतीं ॥ शांती निशारूप खरी असे ती ॥ २ ॥
शांतीगुणें सौख्य अपार आलें ॥ शांती सुधा प्राशुनि देव झाले ॥
शांतीगुणें होय कदा न नाश ॥ शांती करीते पुरुषा विपाश[3] ॥ ३ ॥
शांती समुद्रीं पसरे विकार ॥ संक्षुब्ध तेव्हां घडती विचार ॥
आपत्ति राहे सहसा टळेना ॥ शांतीविना कार्य जगीं कळे ना ॥ ४ ॥
शांती करी संतत कर्म पाही ॥ शांती दिशा जिंकितसे दहाही ॥
कर्मांत शांती भजनांत शांती ॥ शांती भवीं स्वर्ग जगीं महंती ॥ ५ ॥
वादांत शांती शिकण्यांत शांती ॥ युध्दांत शांती विकण्यांत शांती ॥
शांती असावी अवघ्याहि कामीं ॥ कामादिका शांती न भी रिकामी ॥ ६ ॥
शांति क्षमाशस्त्र धरोनि हातीं ॥ शत्रूरगा[4] सज्जन जिंकिताती ॥
शांती महाशक्ति बलिष्ट एक ॥ आत्मीय सामर्थ्य असे सुरेख ॥ ७ ॥
कालीय सर्प यमुना विषारी ॥ शत्रू सहा तेवि हृदीं विकारी ॥
कृष्णास्ति होता अरि एकटाच ॥ या मानवा शत्रु विशेष पांच ॥ ८ ॥

---

# सततोद्योग.

## श्लोक.

पादापुढें टाकुनि पाद सान ॥ ओलांडिती भूमिहि दीर्घमान ॥

---

१ वीज. २ पतिव्रता. ३ मुक्त. ४ शत्रुरूपी नागाला.

टाक्यावरी देउनि सान टाके ॥ शिंपी शिवी लांब अनेक ताके ॥ १ ॥
इटेवरी ठेवुनी अन्य ईट ॥ शिल्पी रची उंच विशाल कोट ॥
थराथरांनीं हिमराशि झाले ॥ शिलाशिलांनीं गिरि थोर केले ॥ २ ॥
प्रवालकीटीं लघु दुर्बळांनीं ॥ क्रमाक्रमानें सततश्रमानीं ॥
द्वीपें विशालें रचिलीं निजांगीं ॥ प्राची महासागरीं नील रंगीं ॥ ३ ॥
जीं मानवी बुध्दि विचार सार ॥ कार्यें. जगीं जाहलीं थोरथोर ॥
तीं सिध्द झालीं सततोद्यमानें ॥ संपादिली कीर्ति धिमेपणानें ॥ ४ ॥
जें कार्य आजी धरिलें करास ॥ होऊं नका त्यांत मुळीं उदास ॥
तें होय माझ्या कडुनी कशाचें ॥ ऐसें मनीं आणुं नका स्ववाचे ॥ ५ ॥
ज्या पर्वता देखुनि आज भ्याला ॥ मैदान वाटेल उद्यां तुम्हांला ॥
एके दिनीं रोम न राष्ट्र झालें ॥ पाश्चात्य लोकीं म्हण सार्थ चाले ॥ ६ ॥
तरूस पुष्पा पुढती करोनी ॥ सिध्दांत हा सृष्टी कथीत कानीं ॥
चिंतूं नका कार्य दिनावधीचें ॥ योजाचि जें आज करावयाचें ॥ ७ ॥
आरंभ केल्यावरी कार्य हातें ॥ न्यावें बळें रेटित शेंवटातें ॥
नेटें करा उद्यम नित्य थोडा ॥ टांका पुढारा भरधांव घोडा ॥ ८ ॥

---

# भीति.

## श्लोक.

भीती जगीं फार विघातकारी ॥ भीतीच साऱ्या जनतेस मारी ॥
भीती करी तप्त तनू नराची ॥ जाळीतसे भी रुधिरासि साची ॥ १ ॥
रक्तास भीती करिते असार ॥ श्वासांत भीती रचिते विकार ॥
शैथिल्य आणी भय सर्व आंगीं ॥ निःसत्व भीती करिते प्रसंगीं ॥ २ ॥
बुध्दी घडे क्षीण खरें कळे ना ॥ भ्रांती मनीं अन्न मुखीं गिळे ना ॥
निद्रा नये सैाख्य कुठें दिसे ना ॥ भीती करी सर्व जगांत दैना ॥ ३ ॥
भीतीमुळें कार्य जगीं घडे ना ॥ भीतीमुळें स्थैर्य नसे नरांना ॥
भीतीच बोलावित रोग नाना ॥ भीती जरा वांकवितें तनूंना ॥ ४ ॥
भीती असे तो जगतीं लबाडी ॥ भीतीच चोरी करवी चहाडी ॥
दारिद्र्य भीती सृजिते न शंका ॥ भीतीच लावी नरकीं कलंका ॥ ५ ॥
स्वार्थी परार्थी भय दुःख देतें ॥ भी आणिते जन्म मृती जनातें ॥
योगीश्वरांनीं भय जिंकियेलें ॥ भक्ताग्रणींनीं भय शून्य केलें ॥ ६ ॥
जया न भीती यश तोचि पाहे ॥ लोकीं बली तो जय कीर्ति लाहे ॥
जिंकीतसे तो भुवनत्रयाला ॥ लक्ष्मी उभी जोडुनि हात त्याला ॥ ७ ॥

जिंकोनियां भीतिस सज्जनांनीं ॥ सोडोनियां दुष्ट विकार त्यांनीं ॥
केलें जगीं थोर पराक्रमातें ॥ झालें म्हणोनि कवि गावयातें ॥ ८ ॥

---

## आनंद.

### श्लोक.

आनंद सृष्टींत चराचरांत ॥ आनंद वृक्षीं कुसुमीं लतांत ॥
आनंदरूपी पशुपक्षि लोकीं ॥ आनंद राहे भरुनी त्रिलोकीं ॥ १ ॥
आनंद आरामवनोवनांत[1] ॥ आनंद आनंद नदीनदांत ॥
आनंद आकाश नगीं[2] समुद्रीं ॥ आनंद तारारविमेघचंद्रीं ॥ २ ॥
आनंद मोठीच उदात्त वृत्ती ॥ आनंद ही चिद्बल[3] सत्वशक्ती ॥
आनंद वारी भय दुर्विकार ॥ आनंद सारी दुबळे विचार ॥ ३ ॥
आनंद गात्रीं नव तेज देतो ॥ आनंद वाणी मधुरा करीतो ॥
आनंद आरोग्य मनास शांती ॥ आनंद लक्ष्मी वरि दिव्य कांती ॥ ४ ॥
आनंद विद्याधन साधिताहे ॥ आनंद तेजोबल दिव्य आहे ॥
आनंद मैत्री करि संधियोग ॥ आनंद भोगी सगळे सुभोग ॥ ५ ॥
आनंद शेती करितो समृध्द ॥ व्यापार आनंद करीत शुध्द ॥
आनंद पैसा बहुरूप वाहे ॥ आनंद दे संतति तेज पाहे ॥ ६ ॥
आनंद आपत्ति बळें झुगारी ॥ आनंद आहे अरिगर्वहारी[4] ॥
आनंद सेतू इहपार लावी ॥ आनंद वृत्ती सहजा करावी ॥ ७ ॥
करोनियां दुर्बळ भावनान्त ॥ आनंद योगीवर साधितात ॥
आनंद विश्वीं भरला समुद्र ॥ आनंद भोगीत बली नरेंद्र ॥ ८ ॥

---

## श्रद्धा.

### श्लोक.

श्रध्दा मनाची बहु उच्च वृत्ती ॥ श्रध्दा मनाची अति गूढ शक्ती ॥
श्रध्दा मनाचें बल पूर्ण जाणा ॥ श्रध्दा नसे तो जगि दीनवाणा ॥ १ ॥

---

१ बागांत व अरण्यांत. २ पर्वतावर. ३ चैतन्य शक्ति. ४ शत्रूच्या गर्वाचा नाश करणारा.

श्रध्दाचि दे साधुनि अर्थ चार ॥ श्रध्दा करी धर्ममतें उदार ॥
श्रध्दा बळें अर्थ[1] अपार साधे ॥ श्रध्दा बळें मुक्ति जिवास लाधे ॥ २ ॥
श्रध्दा भरी मानुषवीर्य[2] आंगीं ॥ श्रध्दा करी कार्य जगांत जंगीं ॥
श्रध्दाबळें चिंतिति तें अचिंत्य[3] ॥ श्रध्दाचि कोडें उकलीत सत्य ॥ ३ ॥
श्रध्दा स्वविद्याधनसाधिकाहे ॥ वेदान्तशास्त्रें रचि सर्व पाहें ॥
श्रध्दा कलाकौशललाभ साधी ॥ श्रध्देसि मोठे नमितात आधीं ॥ ४ ॥
श्रध्दाचि आरोग्य सुखास देते ॥ श्रध्देमुळें आयुसि वृध्दि होते ॥
श्रध्दाबळें साधिति काम लक्ष ॥ श्रध्दाचि चिंतामणि कल्पवृक्ष ॥ ५ ॥
श्रध्दा रची सृष्टि दुजी विशाल ॥ श्रध्दा पिते सागरही खुशाल ॥
श्रध्दा जगीं आणित जान्हवीला ॥ श्रध्दा धरी डोंगर अंगुलीला[4] ॥ ६ ॥
श्रध्दा भरी वीर्य महौषधींत ॥ अतर्क्य मंत्रासि हि ती करीत ॥
श्रध्दाबळें सर्व हि विश्व चाले ॥ श्रध्देविना पान न एक हाले ॥ ७ ॥
श्रध्दाबळें शंकर[5] थोर आहे ॥ श्रध्दागुणें बुध्द सुपूज्य पाहें ॥
श्रध्दाबळें येशुहि साधु झाला ॥ श्रध्दायुधें जिंकिति ते जगाला ॥ ८ ॥

---

## विषयाचा अनुभव.

### श्लोक.

आतां कंटाळलों मी, उगिच जगतिं या लाविलें प्रेम साचें ॥
इच्छा साऱ्या ही झाल्या सुफलित, पुरलें आर्त मोठेपणाचें ॥
या आयुष्यांत कांहीं अभिलषित मला राहिली वस्तु नाहीं ॥
आशा संतृप्त झाल्या म्हणुनि हृदयिं मी खिन्न होवोनि राहीं ॥ १ ॥
जी उत्कंठा गिरीच्या वरि वरि चढतां वाटली हर्ष झाला ॥
गेली आतां परी ती वितळुनि सगळी पोंचतां शेखराला ॥
कीर्त्युंबूद्गारि[6] यंत्रें धवल उडविती हर्षवीर्तीं तुषार ॥
तैसें वाहुनि जातां जळ नच सुखवी नेत्रयुग्मास फार ॥
लोकीं आनंद ज्यातें वदति फल असे शोभलें बाह्य रंगें ॥
शक्ती तारुण्य माझें सकल विकुनियां घेतलें तें निजांगें ॥
त्यानें संतुष्ट झालों क्षणभरि परि तें रत्न खोटें निघालें ॥
गेली त्याची चकाकी सहज झिजुनियां शेवटीं गार झालें ॥ २ ॥
प्रेमा शुध्द प्रकाशे कनकविभवसा मृत्युलोकीं असार ॥
त्यानें आनंद मातें चिरसुख दिधलें सांगुनी वृत्तसार ॥

---

१ द्रव्य, धन. २ मनुष्याचें बळ. ३ ब्रह्म. ४ यांत विश्वामित्र, अगस्ती, सगर व श्रीकृष्ण यांच्या आत्मश्रद्धेचा उल्लेख आहे. ५ शंकराचार्य ६ कीर्तीरूपी कारंजें.

त्यानें संतोषवीलें किती समय परी शेवटीं वृत्त त्याचें ॥
तें तेंची नित्य कानीं पडत मज शिळें वाटतें आज साचें ॥ ४ ॥
स्वार्थी आयुष्य नेलें अमित धन मिळो इच्छिलें स्यां जगांत ॥
गांठीं आहे परी तें अजुनिहि विटलों मानसीं भी सुखातें ॥
जोराचा मार अर्धा नच करित कदा याहुनी मानवाला ॥
शिक्षा अन्य प्रभूची भयकर इतुकी वाटते ना मनाला ॥ ५ ॥
माझ्या स्वार्थप्रभावें सुदिन बहु मला प्राप्त झाले महान ॥
तेव्हां नाहीं कशाचें मुळिंच मम मना क्षीणतेचीण भान ॥
इच्छा आतां पडावी स्वतनु विकळही भस्म होवोनि जावी ॥
मृत्यूनें दुर्विचारांमधुनि मजसि हो मुक्तता पूर्ण द्यावी ॥ ६ ॥
कांहीं हेतू जहाले विफलित जगतीं धन्य तो धन्य लोकीं ॥
हानी मोठी जयाची जितपत तितुका लाभ झाला विलोकीं ॥
उत्कंठा त्यास राहे प्रबळ पुढति कीं सिद्धि साधावयाची ॥
त्याला आनंद दुःखें हृदयिं अनुभवें पूर्ण पाहावयाचीं ॥ ७ ॥
ज्याची मोठेपणाची पुरलि बलवती हौस तो दुःखि पाहीं ॥
ज्याच्या आशा जहाल्या सहज सफळ वा हानिही ज्यास नाहीं ॥
जेव्हां ये वीट त्याला बहुत अनुभवें तृप्ति होतां मनाची ॥
वैराग्यें ही न त्याचें प्रमुदित मन हो रीति ऐसी जगाची॥ ८ ॥

---

## दुःख ज्याचें त्याला.

### साकी.

हांससि जेव्हां लोक तुजसवें हांसाया येताती ॥
रडसी परि तैं तुझी तुलाची एकाला रड रड ती ॥ १ ॥
पूर्वीपासुनि अनंत दुःखीं जनना ही झेंपावें ॥
तिवें तिलाची भारी पडलें केंवि तिनें सुख द्यावें ॥ २ ॥
गाणें गातां रानीं पर्वत उत्तर देती त्याला ॥
शोकाचा परि सर्व उसासा गगनीं विरुनी गेला ॥ ३ ॥
प्रतिध्वनी कीं तत्पर उत्तर आनंदाचें द्याया ॥
मागें सरतो परि चिंतेचे शब्द मुखीं काढाया ॥ ४ ॥
असतां सुखांत शोधित येती तव गृह सारे लोक ॥
शोकीं असतां पाठी दावुनि पळुनी जाती देख ॥ ५ ॥
तुझ्या सर्वही आनंदाचा निधी तयांसी व्हावा ॥
त्यांना परंतु तव दुःखाचा लेशहि ना चिकटावा ॥ ६ ॥
मोद करीं तूं ह्मणजे स्नेही बहुत तुला मिळतील ॥
कष्टीं पडतां तेही सारे सोडुनियां जातील ॥ ७



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे नं. ता.

सौख्यामृत तव बळेंचि प्याया कोणि नको ना ह्मणतें ॥
तुझियावांचुनि दुःखविषातें प्याया न कुणी धजतें ॥ ८ ॥
जेऊं घाली ह्मणजे सारें घर भरुनी जाईल ॥
बसली उपाशि तेव्हां कोणी ढंकुनि हि न पाहील ॥ ९ ॥
मनुजां देतां धन, ते करिती जीवन तों साद्य भलें ॥
परि मरतांना सर्व वृथा तें कुणी न कामा आलें ॥ १० ॥
आनंदाचें सुंदर मंदिर, स्थळही विस्तृत त्यांत ॥
मोठया मोठया सुखलुब्धांना परिवारासह ज्यांत ॥ ११ ॥
परि क्रमानें दुःखाच्या अति निरुंद खिडींमधुनी ॥
एका एका जावें लागे सर्वां वरती चढुनी ॥ १२ ॥

## स्वीकृत कार्य.

### श्लोक.

जें जें तुला कार्य करावयातें ॥ मोठें लघू हो अथवा तयातें ॥
सिद्धीस न्याया तुज शक्ति आहे ॥ ईशें दिली बुद्धि कुशाग्र पाहें ॥ १ ॥
ऐकावया तत्पर कान केला ॥ कोणी तरी काढुनी दोष गेला ॥
निंदा करोनी कुणि तो अकालीं ॥ उत्कृष्ट कार्यासही घाव घाली ॥ २ ॥
पुढें असे हाऊ विशाल पाहें ॥ त्वां मारिला नेम यथार्थ आहे ॥
बिंदूवरी निश्चित थेट गेला ॥ नाहीं ह्मणे कोणी तरी तयाला ॥ ३ ॥
हर्षे करी नाटयगृहांत गान ॥ श्रोते जरी डोलवितात मान ॥
ऐसा गुणी ही नट कार्यकारी ॥ कोणी तयाला म्हणती भिकारी ॥ ४ ॥
विद्यागिरी होय विशाल पाहीं ॥ चढावया मार्ग झराझराही ॥
गेले वरी जे चढुनी प्रभावें ॥ ते भासती सान दुज्यां स्वभावें ॥ ५ ॥
आतां करी स्वीकृत कार्य नेटें ॥ सन्निश्चयानें हृदि धैर्य दाटे ॥
मागोन कोणी वदु देत कांहीं ॥ सरें न मागें धृति सोडि ना ही ॥ ६ ॥
विद्यागिरीच्या वरि आळसी ते ॥ जाती किती मोद करावयातें
न थांबतां त्वां शिखरासि जावें ॥ सारे स्तुती ना करिती स्वभावें ॥ ७ ॥

## स्वकर्म करा.

### श्लोक.

तारे जवें धांवती अंतराळीं ॥ [1]कक्षांतुनी आपुलिया त्रिकाळीं ॥
आकाश मार्गस्थ विशाल गोल ॥ तो आक्रमी सूर्य अनंत काल ॥ १ ॥
एका प्रभूच्या नियमानुसार ॥ पृथ्वी फिरे ही गगनीं अपार ॥
विश्रांति नाहींच वसुंधरेला ॥ प्रदक्षिणा घालित भास्कराला ॥ २ ॥

---

१ मार्गांतून.

U २५




कीं वाहतीं निर्झर सर्वकाळीं ॥ बीजें सदा पावति वृद्धि वेळीं ॥
दावी हरि सत्य पुनः पुनः हें ॥ कर्मेंचि हें विश्व निबद्ध राहे ॥ ३ ॥
इच्छे हरीच्या हृदयीं प्रकाशे ॥ दिव्यात्मदीप्ती न कदाहि नाशे ॥
विश्रान्ति शांती नच कीं जियाला ॥ कर्मीत रात्रंदिन मार्ग आला ॥ ४ ॥
नेणोनियां जीवितहेतु कांहीं ॥ नराधमा अंतरिं भाव राहीं ॥
हें विश्वसामर्थ्य बळें त्यजावें ॥ स्वतंत्र त्यां सोडुनि कर्म व्हावें ॥ ५ ॥
कीं सृष्टिचा नेम अखंड चाले ॥ तें भूत त्रिकाळ जगांत हालें ॥
तें लाविते कर्म करावयातें ॥ वेगें बळें नेतहि सत्पथातें[1] ॥ ६ ॥


मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ


---

## विचार–सामर्थ्य.

### श्लोक.

न शब्दरूपी असतो विचारा ॥ [2]खगांपरी कीं उडण्या पिसारा ॥
ते [3]चंचलेच्या परि धांव घेती ॥ जीवांजिवां आक्रमिती पळांतीं ॥ १ ॥
आच्छादिले दुष्ट विचार सारे ॥ विखारसे बाहिर येति बा रे ॥
न बोलतां प्रेमविचार झाला ॥ त्यानें चढे [4]दीप्ति नवी जगाला ॥ २ ॥

---

## मनाची एकाग्र स्थिति.

### साकी.

मनोबलाची कलींत झाली आहे पांगापांग ॥
कालबलातें निरर्थ वेंचिति शांति मिळे ना सांग ॥ १ ॥
उल्कासमची निजमार्गानें वक्रगतीनें जाती ॥
लोक प्राकृत स्वैर भटकती अपुल्या मार्गावरती ॥ २ ॥
घालविताती मानव-महती विशींत हतबल होती ॥
भोगासाठीं कांहीं नसतां गोष्टी पोकळ करिती ॥ ३ ॥
मोठेपण नच संप्रति गवसे या पिढिच्या लोकांत ॥
कारण कोणी नाहीं घालित मन एका विषयांत ॥ ४ ॥
सारें कळतें हें परि त्यावरि लक्ष नसे कवणाचें ॥
चित्तैकाग्र्य चि सर्वसिद्धिचें रहस्य आहे साचें ॥ ५ ॥

---

१ सन्मार्गाला, ईशपदाला  २ पक्ष्याप्रमाणें  ३ विजेच्या  ४ तेज.

## अल्प संतोष सोड.

### श्लोक.

समाधान मानूं नको थोडक्यांत ॥ समाधान आहे क्रियाहीन शांत ॥
सदा उन्नतीचा चढे मार्ग जीव ॥ तया कष्ट होती खरेंची अतीव ॥ १ ॥
समाधान संतोष-वृत्ती मनाची ॥ खरी तृप्ति आहे कृतार्थस्थितीची ॥
जगीं जाहलीं थोर कार्यें कशानें ॥ जिवाच्या असंतोषवृत्तीबळानें ॥ २ ॥
अती सूक्ष्मसें बीज भूमींत ताजें ॥ वरी येउनी पुष्पपर्णीं विराजे ॥
वसे अंतरीं चेतना सूक्ष्म कांहीं ॥ वरी यावया शक्ति तीचीच पाहीं ॥ ३ ॥
[1]प्रतीचीन जे अल्प संतुष्ट होते ॥ कसे सागरा घालिते पालथे ते ॥
विशालत्वसौंदर्यशोभी किनारे ॥ कसे पाहुनी होति साश्चर्य सारे ॥ ४ ॥
निज श्रेष्ट यानीं न तूं तुष्ट व्हावें ॥ जिवीं स्फूर्ति चैतन्य मोठें रहावें ॥
महत्कार्य सिद्धीस ती नेत आहे ॥ नरा प्रेरुनी उच्च ठावास वाहे ॥ ५ ॥
यदा संचरे स्वांतरीं चेतना ते ॥ नसो खिन्नता लोटि संतोष हातें ॥
तुला घालवी नेउनी स्फूर्ति तेथें ॥ महत्सिद्धिदा ईश्वरी शक्ति जेथें ॥ ६ ॥

---

## प्रमाद, यशाचे स्तंभ.

### श्लोक.

प्रभू जन्म देतो प्रमादा कराया ॥ पडाया झडाया पुनःसांवराया ॥
[2]अघाचीं फळें मोहक स्वादु खाया ॥ किती तीं कडू हें निजांगें पहाया ॥ १ ॥
चुकाया स्वमार्गीं तया अंतराया ॥ तमीं आंधळ्यासारखें संचराया ॥
परी शोधुनी प्रार्थितां देवदेव ॥ खरा दाखवी मार्ग तोची सुदैव ॥ २ ॥
पुढें जाउनी मागचा मार्ग पाहीं ॥ कळे कष्ट आवश्य तेव्हां मलाही ॥
भय द्वंद्व अस्थैर्य दुःखें जनाला ॥ खरी साधुनी शांति देती मनाला ॥ ३ ॥
पराभूत त्या गोड सिद्धी उद्यांची ॥ पडे चालतां काळजी घेत तोची ॥
तया होतसे स्थान ठावें भयाचें ॥ अनभ्यस्त जे त्यांस दावीत साचें ॥ ४ ॥
पहा द्वंद्व दुःखें जगीं जीव जागे ॥ चुकीच्याच योगें करीं ज्ञान लागे ॥
चुकीच्या सुकष्टाविना खेददाही ॥ खरें तत्त्व हातासि येणार नाहीं ॥ ५ ॥

---

## सुदैव.

### आर्या.

आंतरविचाररज्जुसि यावें जोडोनि अंतरात्म्यातें ॥
दैव खरें हें आहे कर्मानें साध्य तूं करीं त्यातें ॥ १ ॥

---

१ पाश्चात्य. २ पापाचीं.

ऐसें झाल्यानंतर इच्छा सर्वहि फळास येतील ॥
दिनानुदिन हातानें चमत्कृति विनाप्रयत्न घडतील ॥ २ ॥
निस्पृहता साधावी ईश्वरसौजन्य संचरो आंगीं ॥
आनंद सदा वाहिल सर्व जगीं या तुझ्यांतुनी जंगी ॥ ३ ॥
सर्वहि सिद्धी येतिल हातीं तुझिया न मागतां पाहें ॥
जेथें तेथें हातीं सोन सोनें परोपरी लाहे ॥ ४ ॥
व्यवसायाचा गोंधळ सगळा गोंगाट गांवचा सोडीं ॥
तनुचे व्यापार तदा इंद्रियद्वमनें मनांतुनी मोडी ॥
एकाग्रमन करुनी होउनियां स्थीर ईश्वरी समता ॥
प्रेमीं भरोनि उरली अनुभवि ती दूर सारुनी ममता ॥ ६ ॥
धैर्य धरीं होय पुढें भीती उरली तुला न मग कांहीं ॥
स्वप्नीं हि नये ऐशा सिद्धी येती तुझ्या करीं पाहीं ॥ ७ ॥

---

## जीवात्मप्रवास.

### श्लोक.

मेघीं आक्रमिला नभीं रवि जरी झांकोनियां टाकिला ॥
त्यानें तो धरिला स्वमार्ग पहिला निःशेष ओलांडिला ॥
अस्ताव्यस्त जगें विनाशसमयीं होवोनियां नासती ॥
ब्रह्मा लोक नवे पुन्हां घडितसे होते तसे मागुती ॥ १ ॥
तेव्हां मार्ग जरी तमोमय दिसे जावें न कोठें कळे ॥
कक्षा नेमियली जिवास तुझिया धैर्यें पुढें जा वळें ॥
झाली रात्र असे तमोमय पथीं भीती नसो मानसीं ॥
ब्रह्माची[1] प्रकट [1]प्रभा तुज करीं आहे पहा दिव्यशी ॥ २ ॥
राहें तूं जगतीं सदा समजुनी होतास होशील ही ॥
जीवात्मा तव लांबुनी फिरत हा आला प्रवासी मही ॥
आलाहे प्रभवांतुनी परत जो जाणार त्याच स्थळीं ॥
ज्योती लावियली हृदीं प्रगट जी ती शाश्वता सोंवळी ॥ ३ ॥
रत्नीं तो निजला अपार जनधीलाटांतरीं नाचला ॥
रानीं संचरला, स्मशानि वसला, तेथोनिही हालला ॥
ऐसा फार युगें नवीन वसनें घालीत रात्रंदिनीं ॥
आतां तो प्रगटे तुझ्याचि हृदयीं दीप्ती सुखानंदिनी ॥ ४ ॥
आत्मा धांवतसे धरी नव तनू तो जीर्ण सोडीतसे ॥
जातां मूर्ति जुनी नवी धरितसे शोधोनि काढीतसे ॥
आत्मा शोधित वस्त्र जें विरचिलें त्यांची कृतीनें तव ॥

---

१ ईश्वराची ज्योती म्हणजे जीवात्मा.

तूझें मानस यंत्र, त्यावरी असे तंतू विचारोद्भव ॥ ५ ॥
जसे कीं जलबिंदु बाष्प बनुनी पृथ्वीवरी वाहती ॥
तसे सर्व विचार दैविं अपुले एकत्रता पावती ॥
त्या पासोनि तुझी नसेच सुटका भोगावया लाविती ॥
योनी उत्तम दुष्ट मध्यम असो, जीवा तुझी ही गती ॥ ६ ॥
कोठें ही कधि ही कसें तरी जगीं कोणाहि लोकांतरीं ॥
जन्मींचे इह जे विचार सगळे आत्मा प्रकाशीं धरीं ॥
आहे नेम असा अबाधित न तो भंगेल देहांतरें ॥
जें जें मंदिर बांधिलें निज करें तें एकटा भोग रे ॥ ७ ॥
कल्पाकल्पि युगायुगीं सतत या कालावकाशांतुनी ॥
ऐसा जीव सवासना फिरतसे निश्चित मार्गांतुनी ॥
जें जें मागसि तें स्वभावगतिनें हातास येईल तें ॥
ज्वाला अग्नितुनी जशा प्रगटती तैसीं तुझीं इंप्सितें ॥ ८ ॥
कानीं तो ध्वनि एकदां भरलिया सारी त्वरा मावळे ॥
आहे जीव तुझा अनंत विभुचा एकत्व हें आकळे ॥
धांवाधांव तदा तुझी मिटुनियां थांबेल केव्हां तरी ॥
निष्ठा हेतुवरी असो अचल, तो प्रेमा स्वकार्यावरी ॥ ९ ॥
तुझा राक्षस तूं तसा असिस तूं देवेश तूंची तव ॥
केला मार्ग पदापदा क्रमुनियां तुझा तुवांची नव ॥
कोणी ना तुज सोडवी क्षणभरी पापप्रमादांतुनी ॥
यावत्काल न ऐकिला ध्वनि असे त्वां अंतरात्म्यांतुनी ॥ १० ॥

---

## देवमंदिर.

### श्लोक.

विनम्र बनुनी हृदीं विमल भावना ठेवुनी ॥
स्तुती करिति पूजिती अमित लोक ते येउनी ॥
पवित्र शिवमंदिरीं विमल [1]आपगेच्या स्थळीं ॥
जनोद्धृति[2] करावया जमति शुद्ध [3]आत्मे बळी ॥ १ ॥
घरांत वसुनी सदा स्तव करी विधानोक्त[3] ते ॥
तिथें हि जमतीं नभा उतरुनी त्वरें दैवतें ॥
अखंड वसतीं तुझ्या निकट, तीं जिथें राहतीं ॥
सुकार्यशत वांछितें सफळता तुझीं पावतीं ॥ २ ॥
असे नयनिं झोंपडी लघु सुरेख म्यां पाहिली ॥

---

१ नदी कांठीं २ जनाचा उद्धार. ३ महात्मे--दृश्य व अदृश्य ३ विधियुक्त.

उभीं दिसति शांतिनें प्रबळ आत्मरूपें स्थळीं ॥
निराश जन त्या स्थळीं विसरती विषादा सदा ॥
प्रकाशयुत मंदिरांतुनि पळे पळ आपदा ॥ ३ ॥
स्वतेजयुत दिव्य ते विमल ईश्वरी अंशची ॥
जिथें प्रभुनुति घडे वसति येउनी ते शुची ॥
स्वदर्थ रचुनी पहा सुरस रम्य देवालय ॥
तिथें मग दिसेल ते जमति ये तुला प्रत्यय ॥ ४ ॥

---

## दृढ निश्चय.

### श्लोक

पाया निश्चयरूप त्यावरि रचीं भावी तुझें मंदिर ॥
खेदाच्या वरती असो न कधि तें कैसें टिकावें चिर ॥
पापांच्या [1]तिमिरीं नको धडपडूं आत्मप्रकाशें लव ॥
अंधःकार पथांतुनी उडवि तूं आशेचियां वास्तव ॥ १ ॥
[2]भूतायूंमधल्या कलंक कृतिचें डागाळलें चोपडें ॥
पाहोनी नयनीं वृथा जळफळें अश्रू न ढाळीं गडे ॥
तत्पृष्ठें उलटीं हंसोनि हंसुनी सोत्साह हो सद्बळ ॥
कोरीं ही पुढती त्वदर्थ असतीं लीं राहिलीं पुष्कळ ॥ २ ॥
पश्चाताप मुखांतुनी घडिघडी बाहेर काढूं नये ॥
[3]स्फुलिंग [3]प्रभुचा तुझ्यांत वसतो तो वाढवावा स्वयें ॥
सर्वोत्पादकशक्तिला कळतसे मोठी जिला ना मिती ॥
जीवीं उन्नतिच्या पदा चढुनियां सामर्थ्य जाया किती ॥ ३ ॥
बीजा वाढवुनी मरीचि[4] करितो न्यग्रोध[5] मोठें जसे ॥
ती शक्ती करी साह्य देवुनि खरें सामर्थ्य जीवां तसें ॥
केला निश्चय पाहिजे दृढ परी अभ्यंतरीं मानवा ॥
हें विश्व प्रभुची कृती कवच कीं घालील तेव्हां जिवा ॥ ४ ॥

---

## विश्वाची उत्पत्ति.

### श्लोक

प्रेमीं आहे स्फुरत बल तें विश्व निर्मावयाचें ॥
पूर्ण प्रेमें हृदय भरलें जेधवां ईश्वराचें ॥

---

१ अंधारांत. २ गत आयुष्यांतील. ३ ईश्वराची ज्योति, जीव. ४ सूर्य. ५ वटवृक्ष.

कौटाळोनी निखिल वरचें शून्य आकाश ज्यानें ॥
केली सृष्टी धवलित अशी सूर्यमाला क्रमानें ॥ १ ॥
तेजोराशी मुकुटमणि तो सूर्य केला विशाल ॥
नक्षत्रांचें वलय[1] फिरवी भोंवतीं सर्व काल ॥
नाना योनी स्मितसुख हरी दृष्टिपातें कृपेच्या ॥
जाती जाती अगणित करी कीटकांच्या नरांच्या ॥ २ ॥
दैवी सृष्टीनरकृतिमधें भव्य जें सर्व झालें ॥
तें तें प्रेमें प्रगट घडलें द्वेषयोगें न आलें ॥
इच्छा ज्याला स्थिर चिर करीं श्रेष्ठ कार्यें करावीं ॥
प्रेमस्फूर्ती निजहृदि तयें पूर्ण आधीं भरावी ॥ ३ ॥
व्यापी सर्वेहि भूतां प्रेमा पसरोनि आपुला लोकीं ॥
कळलें रहस्य हरिच्या पूर्णत्वाचें तयास अवलोकीं ॥ ४ ॥

---

## दुःख मित्र आहे.

### श्लोक

[2]कराल [3]असि घेउनी निज करीं उरीं मारि त्या ॥
अरीस भिउनी जसा जन पळे त्वरें मीहि त्या ॥
मुखा असुख-शत्रुच्या बघुनि कावराबावरा ॥
विलासधनशोधना तडक लागलों बावरा ॥ १ ॥
त्यजोनि मज जाउं तो सुख न दाखवी मी यदा ॥
मला निरखुनी उभा, स्वपद हालवी न कदा ॥
नमस्कृति करी म्हणे सुपथ एकची आपुला ॥
सुसंगति पथीं असो म्हणुनि संगतिनें चला ॥ २ ॥
धरीत कर तो मम स्वकरिं दावुनी वाटलें ॥
तनूंत परि त्या क्षणीं स्वबल पूर्ण हेलावलें ॥
करांत कर घालुनी क्रमित मार्ग गेलों तदा ॥
स्वयें पुढति पोंचवी परम हर्ष देवी पदा ॥ ३ ॥
प्रभुसाक्षात्कार तयें करवुनि केलें बलाढय थोर मला ॥
म्हणुनी मी मानितसें आहे माझा सुमित्र दुःख भला ॥ ४ ॥

---

१ कडें. २ तीक्ष्ण. ३ तरवार.

# जीवित क्षणभंगुर आहे.

## आर्या.

क्षणभंगुर जीवित हें खेद कराया तयांत नच वेळ ॥
गत हर्ष असे बुजुनी गेला, तेवीं तसाचि चिरकाळ ॥ १ ॥
दुःखसुखातें विसरुनि गत दिवसांच्या पुढें चला नेटें ॥
आपण पुढती जाऊं स्वकीय मार्गें धरोनि बळ मोठें ॥ २ ॥
विशालगति सूर्याच्या [1]उदयास्तांच्या मधील अवकाशीं ॥
व्यर्थ रडाया काल क्लेश कराया नसे मनुष्यासीं ॥ ३ ॥
आयुष्य असे थोडें वैर धराया परासवें जगतीं ॥
कालचि घे सूड बळें त्याचा, धरितां मनांत धीरधृती ॥४॥
वर्षें उडुनी जातीं क्षतपरिहारक [2] गदांसि [3] घेउनियां ॥
द्वेष कराया नाहीं नाहीं अवकाश या जगीं राया ॥५॥
नीच लघू टेंपाडें तुमच्या पुढती असंख्य जीं दिसतीं ॥
स्वोदाहरणें करुनी तत्व महा हेंच सिद्ध दाखवितीं ॥६॥
अत्यल्प असे जीवन, परि तें पुरुषार्थसाधनीं मोठें ॥
द्वेषाला अल्प परी प्रेमाला दीर्घ दीर्घ तें वाटे ॥ ७ ॥
प्रीती चिर राहतसे, अजरामर शुद्ध जागती ज्योत ॥
वर फिरत्या लोकांचे ती सांधे जोडुनी असे देत ॥८॥
नियम प्रथम प्रभुचा विश्व प्रेमासभोंवतीं हाले॥
प्रभुकृत विश्वांमध्यें तेजस्वी खेद ना करी काळें ॥९॥

---

# धीर.

## आर्या.

होतें [4]पीडन जगतीं हानी अन्याय चालती जे जे ॥
धावक काल तयातें तुडवी मिळवी धुळीस निज तेजें ॥१॥
तरुणपणीं देवाला अविचारें बहु निंदिलें म्यां तें ॥
आतां अनुभव आला धीरानें चांगलें जगीं होतें ॥२॥
दुर्जन न्याय करीती दुर्मति सत्ता जगांत गाजविती ॥
असदांचे भीतीनें सत्य दबोनी लपूनियां बसती ॥३॥

---

१ दिवसांत. २ जखमा बऱ्या करणाऱ्या. ३ औषधें. ४ जुलूम.

2363

कृत्रिम झाले पुढती स्वभावराज्यास घेतलें त्यानें ॥
पाणी आणुनि नेत्रीं श्रम करिती कामगार कष्टानें ॥४॥
श्रीमंत पदीं बसुनी स्वस्थ करी राज्य सर्व पृथ्वीचें ॥
आहे काल दयाळू धीरानें करिल चांगल तीचें ॥५॥
भक्तिविरहित भिकारी पंथ मिरविती जगांत कांचनसे ॥
भरलें अज्ञान जनीं तत्वार्थावरि न लक्षही तैसें ॥६॥
प्रभुचा नियम अबाधित जो स्वबळें सूत्र हालवी सारें ॥
ईश्वर इच्छिल तेव्हां होतें संतत जगांत जनहित रे ॥७॥

---

## [1]शांतिगीत.

### आर्या.

आत्मोन्नती घडाया अन्यायाचा करावया मोड ॥
जगदुत्पत्तीपासुनि आलें भांडत समस्त जग झोड ॥१॥
कालीं तमोगर्यीं त्या इतिहासाचा धरोनि दीप बडा ॥
बघ पूर्वयुगारण्यीं जातीजातींत लागला झगडा ॥२॥
निजपद विसरुनि धर्मैं स्मरुनी नच नियत देवकार्य खरें॥
राष्ट्रोराष्ट्रीं युद्धें लावुनि केले विरोध जगिं सारे ॥३॥
भक्तीच्या पंथांनीं मनुजां मनुजांकडोनि मारविलें ॥
[2]सद्धर्मानें उलटें द्वेष निराशा अघोर माजविले ॥४॥
बंधूनीं बंधूशीं केले झगडे बळें सपरिवार ॥
पूजाविधी निराळे केवळ यास्तव जगांत अनिवार ॥५॥
सुज्ञ जहालें जग हें दयालु, आत्मा प्रकाश पावतसे ॥
युद्धें अज्ञपणाचीं लोपुनि शांति स्थळासि जात असे ॥६॥
नृपतिद्रोहें पूर्वी जेथें मारिति नरांस ठार कळें ॥
एकाला बहुतांना स्वर्गाची वाट दाविती स्वबळें ॥७॥
तेथें ते एक स्थळिं जमतात सभा करोनि एकमनें ॥
खड्गातें त्यागुनियां विचार-शस्त्रें उभारुनी सुमनें ॥८॥
मानवपशुची अवनति त्याचा संहार होत कालानें ॥
आत्मज्योती उजळे शोभत संतत निजप्रकाशानें ॥९॥
[3]द्रष्ट्याला दिसताहे दुरुनी जनता पुढें जगीं होती ॥
बलधी देवांश अशी युध्दोद्यत शस्त्रभार नच हातीं ॥१०॥

---

१ यांत मुख्यत्वेंकरून पाश्चात्य देशांतील वर्णन आहे. २ खिस्तीधर्मानें.
३ विचारी मनुष्यास.

रक्तप राक्षस पुढती दैत्यबलातें शके न दावाया ॥
+ताम्रवधाच्या गोष्टी पाताळीं भूतवृक्षसम व्हाया ११ ॥
बंद ध्वनि तोफांचे वधकलहांचे समस्त बोभाटे ॥
युद्ध निर्भत्रक जाउनि शंखध्वनि शांतिशृंगरव दाटे ॥ १२ ॥

---

## अधिकार.

### श्लोक

( या कवितेंत लघु अधिकाराचीं माणसें व थोर अधिकारांचीं माणसें, यांच्या दृष्टींत केवढें अंतर असतें, तें वर्णिलें आहे )

प्रेमानें भरल्या जगांत दिधला जन्म प्रभूनें मला ॥
सर्वांही मनुजांसि संसृतिपथीं आंधार जो भासला ॥
नेत्रीं तो मज ना दिसे निजपथीं माझ्यापुढें लोपला ॥
आरम्याचा रविसा प्रकाश पडतां कीं शोभवी भूतला ॥ १ ॥
सारें कांचनवर्ण विश्व दिसलें म्यां पाहिलें जेधवां ॥
कष्टें अन्य ह्मणे सुरंग परी हे होती फिके तेधवां ॥
छाया ताप विशेष भोगित तुह्मा लागेल जावें मही
माझ्या या नयनांसि सुंदर दिसे तो मार्ग आद्यापिही ॥ २ ॥
बोले लोक मला अह्मांसी दिसतां, आनंदयोगी [१] तुह्मी ॥
लोकीं दुःख भरोनि सत्य नुरलें नेत्रीं पहातों अह्मी ॥
हर्षे नाचतसां परी लवकरी लोळाल दुःखान्तरीं ॥
गेलें आयु तरी नये अनुभवा ही उक्ति माझ्या परी ॥ ३ ॥
प्रेमा फार करीतसां जन वदे सर्वांवरी उज्वल ॥
जीवाला पडनी घऱ्यावरि घरे द्वेषाल हें भूतल ॥
खोटें भाकित जाहलें प्रतिदिनीं माझे मनीं खातरी ॥
प्रेमाला बहु सांपडे स्थळ, नसे अप्रीतिला स्वांतरीं ॥
बोले लोक करें तुम्ही सढळ हो प्रेमामृतें [२]तर्पितां ॥
सारें ही जग, पीत तें उपकृतो फेडी न कोणी पिता [३] ॥ ३ ॥
झालीं रिक्त तथापि तीं प्रतिदिनीं पात्रें भरीतीं घन ॥
दैवी पीयुष आपुलें वितरिती ते मागुती सज्जन ॥ ५ ॥
जन्माचा अधिकार होय तुमचा [४] भूमीवरी प्रीतिच्या [४] ॥
रोहा दक्ष करा श्रमा सग वरा सर्वश्रियेतें तिच्या ॥
माझा निश्चय कामना हृदयिंच्या प्रेमें फळा पावती ॥
प्रीती आवडते विशेष मजला द्वेषीं न माझी गती ॥ ६ ॥

---

+ अमेरिकेंतील मूळ राहणाऱ्यांच्या. १ उत्साही. २ प्रेमानें प्रसन्न करितां, ३ पिणारा. ४ प्रेमरूप शेतीवर.

# वाट दाखवा.

## आर्या.

दावा वाट मला हो, जाती जीनें जगीं सदाचार ॥
भीती न मला केला कितिहि तुफानीं शिरावरी मार ॥ १ ॥
घाया तोंड तयाला माझ्या हृदिं संचरेल धैर्य वर ॥
माझें बळ खचुनी वा सोडुनि जाइल न बाहुचें सार ॥ २ ॥
निश्चय पूर्ण मनाचा विजयश्री घालणार मज माळ ॥
दावा वाट मला हो भिउनि जियोनी पळेल कीं काल ॥ ३ ॥
दावावी वाट मला जावें ज्यां, उच्च भूमिकेवरती [१] ॥
जेथुनि आत्मे तनुंना दासासम वश करोनि राववितो ॥ ४ ॥
चिंता नाहीं येउनि मोठी [२] शोकासुखार्णवा भरती ॥
क्रोधें लाटा त्यांच्या जीवीं माझ्या सवेग आदळती ॥ ५ ॥
जाउनियां मी कधि तरि [३] इष्टस्थाना विशंक गांठीन ॥
दावा हो वाट मला झालों तेव्हां कृतार्थ मानीन ॥ ६ ॥
वाट मला दावावी धैर्यबलें ज्यां चढोनि वर जावें ॥
तृष्णागिरिच्या तेथुनि अयोग्य[४] बिलेंपणेस ढकलावें ॥ ७ ॥
कालौषधि शमवीती जीं दुःखें तीं चढोनि वर जावें ॥
क्षुल्लक लाभें किंवा क्षुद्रानंदावरी न मोहावें ॥ ८ ॥
जावें उंच चढोनी जेथुनि हे पोरखेळ भासावे ॥
दावा वाट मला ती पाहुनि विषया खरेंच हांसावें ॥ ९ ॥
दावा हो वाट मसीं निश्चल परिपूर्ण शांति वास करी ॥
स्वानुभवाच्या योगें नांदे जी अवतरोनि नित्य उरीं ॥ १० ॥
[५] तनुभावाचे जेथें सारे झगडे शमोनि जातात ॥
[६] शिवतेजानें जेथें जीवात्मे स्वप्रकाश होतात ॥ ११ ॥
कठिण प्रवास जरि हा विघ्नचमू ही करी जरी मारा ॥
दावा वाट मला ती संसारीं दिसतसे खरी सारा ॥ १२ ॥

---

# आस्था.

## श्लोक.

त्वरा करित आपणां इतुकि संप्रती धावरी ॥
उतावळ करीतसे बहुत चेंगराचेंगरी ॥

---

१ उच्च मनाची स्थिति. २ शोक व दुःख यांच्या समुद्राला. ३ प्राप्तव्यपद, परमात्मपद. ४ द्रव्य लोभ. ५ देहभाव, अहंकार. ६ परमात्मा.

परांसि तुडवोनियां स्वकरीं मागुती लोटुनी ॥
पुढें पळत जातसों बिकट + वाट ओलांडुनी ॥ १ ॥
असे मनुजि उत्तम प्रबळ वृत्ति आस्था खरी ॥
मदार कुणि ठेवि ना खचित आज तीच्यावरी ॥
त्वरेंमधुनि आकळे सकळ मर्म या वृत्तिचें ॥
रहस्य करिं लाधलें तरिच आपणां सिद्धिचें ॥ २ ॥
युगांत गत जाहले मनुज थोर पृथ्वीवरी ॥
तदीय भर हेतुचा सकळ होय आस्थान्तरीं ॥
तयांस कळला खरा परम अर्थ गूढांतरीं
म्हणोनि पद थोरलें महति पावले भूवरी ॥ ३ ॥
हरी सकृप त्यांवरी वसत योग्य आस्था उरीं ॥
अशा सबळ वृत्तिनें करिति लोक कार्यें खरीं ॥
जरी श्रमति जाति ते पुढति संघडी सांडुनी ॥
स्थळीं स्थिर मनें उभे विजय मालिका घालुनी ॥ ४ ॥

---

## विषयांचें ओझें.

### साकी.

वाटे मजला कदा कदा कीं माझें हृदय लहान ॥
[१] अलिच्या परि जो, फिरुनि वसंतीं गुंजारव करि गान ॥ १ ॥
उपवनभागीं सुंदर किंवा कुरणांमधुनि तृणाच्या ॥
मधु हरिताहे रम्य सुमांतुनि सर्वहि पुष्पलतांच्या ॥ २ ॥
दिवस संपुनी होत जेधवां सूर्यास्ताचा काळ ॥
निजगृहिं जावें वाटे त्याला नुचले पंख मधाळ[२] ॥ ३ ॥
[३] पीयूषासम भार तयाला इतुका चिकटुनि राहे ॥
सोडुनि जावें उडुनि मनीं ये परि दुष्कर त्या पाहें ॥ ४ ॥
दशा अशी मम हृदयाची कीं विषयप्रेमें भरल्या ॥
होते चढुनी शांतिपदाला स्वर्गी जातां वरल्या ॥ ५ ॥
साधारण पथ चढोनि वरती प्राणी अनंत गेले ॥
प्रेमाचें तें पाश मानवी ओझें होउनि ठेले ॥ ७ ॥
संसाराच्या प्रेमें, जीवीं ओझें त्याचें वाहे ॥
ईशपदाला जातां खालुनि मानस त्याचें ओढे ॥ ८ ॥

---

+ कठीण. १ मधमाशी, भ्रमर. २ मधानें भरलेले. ३ गोड, अमृता सारखा.

# जीवाची उन्नति.

## साकी.

* ज्ञानागमना तुझ्या जिवाला +वातायनशत व्हावें ॥
या विश्वाचें वैभव अंतरिं तद्द्वारानें यावें ॥ १ ॥
एका भिकार पैथगवाक्षें प्रकाश पुरता न शिरे ॥
§अनंततेजोनिधिमधुनि जो विश्वीं निखिलीं पसरे ॥ २ ॥
¹विश्वासाचे तामस पडदे फाडुनि तोडुनी टाकीं ॥
प्रभुसम मोठी सत्य शिराया उंच असावी खिडकी ॥ ३ ॥
मटपटपिहिता लघु दारांतुनि डोकावुनियां एका ॥
²संशयसौधीं जीवें तिमिरीं अथडावें सांगा कां ॥ ४ ॥
श्रीहरितेजें आकाशोदधि तुडुंब भरला आहे ॥
त्यांत नहाया सुवर्णलहरी प्रेमबलाच्या पाहे ॥ ५ ॥
काढा झाडुनि वाणी, कुजक्या धार्मिक विश्वासाची ॥
जाळीं सारीं पाडा खालीं दुर्बळशा श्रद्धेची ॥ ६ ॥
विचाररूपी ज्ञानरवीच्या प्रकाशिं त्वां मिरवावें ॥
गाणें अवाच्य भगणें गातीं श्रवणांनीं ऐकावें ॥ ७ ॥
प्रभुयशवर्णन सृष्टी करि तें कानीं पूर्ण भरावें ॥
येणें जीवें सत्य सुजनता सद्गुण हृदयीं घ्यावें ॥ ८ ॥
आत्मे सहस्र अदृश्य येउनि उचलुनि तुज धरितील ॥
शांतिसुखांच्या निजाश्रमातें तुज घेउनि चढतील ॥ ९ ॥
विश्वाच्या या समर्थ शक्ती तव बलवृद्धि कराया ॥
भीती न धरीं अर्ध त्यजुनी पुरतें सत्य वराया ॥ १० ॥

---

# अज्ञात राज्य.

## श्लोक.

ससिंधू पृथ्वी ही हुडकिलि सहारण्य मनुजीं ॥
महाभूतांचे त्या कळति हृदयीं धर्म सहजीं ॥
जगाची या झाली प्रगति अझुनी नाहिंच खरी ॥
बळें केले लोहें³ निगडित तया आजचि नरीं ॥ १ ॥
⁴ तरी देशोदेशीं फिरति बनला दास उदधी ॥
महाभूतें गर्वी भयद असतीं घोर बलधी ॥

---

* ज्ञान प्राप्तीला. + शेंकडों खिडक्या. § अखंड प्रकाशाचा निधि—ईश्वर.
१ तामस विश्वास-अंध श्रद्धा. २ संशयरुपी गच्चीवर. ३ तारायंत्रें व अग्निरथ मार्गी. ४ नौका.

नरा हातीं देती हितगुज परी गौप्य सगळें ॥
नराज्ञेनें जेवीं पळत सुटतीं शशवि मुळें ॥ २ ॥
जरी तीरातीरां क्रमुनि अझुनी शोधिति धनी ॥
पुरे भू जिंकाया जनरहित मदान न वनीं ॥
परी शोधा राज्य प्रवळ अझुनी एक उरलें ॥
निजात्म्याचें, जिंका सतत करुनी कर्म उगलें ॥ ३ ॥

---

## जीवनमार्ग.

### श्लोक.

सारें तमीं आथडतों भवांत ॥ पथा खऱ्याही चुकलों तशांत ॥
अंतीं चुकीचा कळलें मनाला ॥ हाची असे उत्तम लाभ झाला ॥ १ ॥
मार्गी खऱ्या जात असों कळोन ॥ सीमा भवाची जरि गांठवे न ॥
जावें यदा पर्वतपायथ्यासीं ॥ तेव्हां चढावें गिरिशेखरासीं ॥ २ ॥
प्रमाद केले न जगद्गुरूंनीं ॥ मार्ग क्रमीला वहुधा तयांनीं ॥
जयांत छाया भरला प्रकाश ॥ झाले म्हणोनी प्रभुच्या सकाश ॥ ३ ॥
श्रीकृष्ण बुद्ध प्रभु येशु यांहीं ॥ उल्लंघुनी त्याच पथास पाहीं ॥
केला असे बोध महा जगाला ॥ जाणावया बुद्धि नसे जनांला ॥ ४ ॥
प्रीती स्वतः ची करि शेवटीं जो ॥ दुःखोपयोगासहि जाणतो जो ॥
प्रारब्ध ज्याचें भरलें प्रमादीं ॥ त्याच्याकडे सिद्धि वळेल आधीं॥ ॥ ५ ॥
व्हावीं जिवा कर्मफलें अवश्य ॥ म्हणोनि व्हावें सुकृतासि वश्य ॥
मानं नको जाति निरर्थ वर्षें ॥ ज्ञानासि जीं साधुनि देतिं हर्षें ॥ ६ ॥

---

## कर्मयोग.

### श्लोक.

येथेंच मध्यें बस तूं जगाच्या ॥ राहें मधें लौकिक गोंधळाच्या ॥
दि[illegible] जिवाला ढकलोन जेथें ॥ पापासुखाशीं झगडावयातें ॥ १ ॥
आहे खरें हें स्थळ कर्मभूमी ॥ जाणावया वस्तु अनंत नामीं ॥
हेंची असे राज्य जिथें विचारें ॥ जिंकावया शक्य वळ नृपा रे ॥ २ ॥

थांबूं नको स्वर्गसुखार्थ कांहीं ॥ एकांत मंदीर न मात्र पाहीं ॥
येथें रहावें कलहांगणांत ॥ जाणोनि ध्यावें मुनि जाणतात ॥ ३ ॥
जें पाहिलें योगिवरीं निहाळ ॥ सर्वान्तरीं ईश्वर विश्वपाळ ॥
ज्योति प्रभु तो सकलां नियंता ॥ उत्पत्तिकर्ता अविता निहन्ता ॥ ४ ॥
पृथ्वीच आहे सुरलोकभाग ॥ मोठा न मृत्यूहुनि जन्म सांग ॥
आनंद जन्मीं सगळया असावा ॥ पूर्णोन्नतीयत्न जगीं करावा ॥ ५ ॥
कष्टांत येथें जनगर्जनांत ॥ दावीं कसें राहवतें प्रशांत ॥
आत्मा कशी मारितसे भरारी ॥ साधूनि दे जो सुखशांति सारी ॥ ६ ॥
न दूर राहीं पद एक मागें ॥ युद्धाचिया गर्दित जा, न भागें ॥
हाटांत रस्त्यांत अनंत ठाव ॥ आहे कराया सुकृतासि वाव ॥ ७ ॥
घसें मठीं ना गिरिगव्हरांत उत्तुंग भागीं गिरिच्या प्रशांत ॥
येथें [1]चितेच्या हिकडेच पाहीं ॥ प्रेमें सदा कर्म करीत राहीं ॥ ८ ॥

---

# देवकार्य.

## श्लोक.

वाटे काय तुला करें नच घडे माझ्या महत्कार्य रे ॥
इच्छा श्रेष्ठ खरीं मनीं वसत कां मोठेपणाची बरें ॥
राहे दक्ष निजांतरीं चुकवि ना आतां मनापासुनी ॥
अल्प स्वल्प दया परावरि करायाची सुरीती जुनी ॥ १ ॥
स्वप्नीं भाविशि काय रे मज पुढें यावा असा काळ तो ॥
कीर्तिप्राप्ति घडो, सर्व जन वसो माझ्याच सत्तेंत तो ॥
आतांपासुनि दक्षता धरुनियां मागें न तो घालवीं ॥
केल्यावांचुनि साह्यता, तळमळे जो जीव दुःखें महीं ॥ २ ॥
दुःखी देखुनियां जना द्रवतसे किंवा तुझें आंतर ॥
त्यातें साह्य करूं मनीं जरि असो दृष्टी न उंचावर ॥
मार्गी भेटति जीव जे सकळ ही अन्नाजला पारखे ॥
त्यांना साह्य करीं विशंक विभुला सारे जगीं सारखे ॥ ३ ॥
खोटयाचा लव आंतुनी तुज गमे होवो खरा न्याय कां ॥
आरंभीं निजमंदिरीं श्रम करीं जीवान्त तों साधका ॥
आधीं तूं निजवाटिकेस सजवी लोकां दिसो चांगली ॥
हातीं वेइं करावया मग सखे शेती दुज्याची भली ॥ ४ ॥

---

[1] मृत्यूच्या पूर्वी.

कार्यार्थ प्रभु पाठवी अपुलिया नेते जना योग्य ते ॥
अन्यांच्या करवीं तयांस करवी जें पाहिजे साह्य तें ॥
मोठे पर्वत फोडुनी अवनिला डोकीं वरी काढिती ॥
सिंधूच्या भरतीसवें लघु गिरी कीं वाळुचे नाचती ॥ ५ ॥

---

## दुखाःचे उपयोग.

### साकी.

वर्षावर्षाअंति वयाच्या अधिकाधिक मी जाणें ॥
दुःखाचा किति उपयोग असे हृदयीं माझ्या बाणे ॥ १ ॥
दृष्टी गभीर गभीर माझी विचार करितां झाली ॥
दुःख असावें काय म्हणोनी कार्यकारणें कळलीं ॥ २ ॥
अंधाराच्या ओल्या दिवसाअंतीं जीवगणातें ॥
तेजोमय रविच्या किरणांनीं पुरता हर्ष मनातें ॥ ३ ॥
उपवासांतीं भाकर तुकडा लागे मधुर जिभेला ॥
मोठया मोठया पक्वान्नांची सुरुची सदैव ज्याला ॥ ४ ॥
सक्कत जयाच्या उपहासाचे शब्द श्रवणीं आले ॥
तया नटाला मंद नुतीही प्रमोदकारण झालें ॥ ५ ॥
पत्नीविरहित रहावयाची कष्ट दशा ज्या कळली ॥
प्रेमशृंखला जड ही त्याच्या मनास हलकी गमली ॥ ६ ॥
एकान्तीं चिर जाउनि बसला वरती गिरिशिखराचे ॥
मित्रवचाचें गायन मधुर श्रवणा लागे त्याचे ॥ ७ ॥
ह्मणुनी माझ्या अधिकाधिक हें वाटे सत्य मनाला ॥
दुःखें सारीं मित्रापरि तीं करितीं साह्य जनाला ॥ ८ ॥

---

## दैव आणि मी.

### श्लोक.

देवा, मला पंडित सांगतात ॥ अजिंक्य लोका असमी जगांत ॥
शक्ती तुझी माहित पूर्ण मातें ॥ इच्छाबळें जिंकिन मी खलातें ॥ १ ॥
भंगावया मानवगर्व पाहीं ॥ अंगीं तुझ्या शक्ति असे न कांहीं ॥
न बाह्य सृष्टीवरि लेश सत्ता ॥ आहे धनी मीच जिवा नियन्ता ॥ २ ॥

कीं मृत्यु आहे इतुका लहान ॥ न नांव देण्यास हिं योग्य जाण ॥
कधीं मला तो करणार काय ॥ देहांतुनी काढिल जीव पाय ॥ ३ ॥
देवा वसे वस्तु मदंतरांत ॥ जी जागुनी राहुनि दक्ष त्यांत ॥
हानी अनर्था असुखा निवारी ॥ माझा धनी मीच न तूं विचारीं ॥ ४ ॥
जन्मे यदा विश्व तयाचि काळीं ॥ इच्छा अमर्त्या मम येत[1] खाली ॥
ती अंश आहे पृथुकारणाचा[2] ॥ निर्मीन जो सूर्यशशींस साचा ॥ ५ ॥
प्रभा तयानें भरिली नराला ॥ समुद्र ज्यानें जळपूर्ण केला ॥
[3]राजेश्वराच्या प्रभवें कुळांत ॥ कांहीं उणें ना मम विक्रमांत ॥ ६ ॥
प्रेमा महाकारणरूप आहे ॥ त्याच्यांतुनी जीवजलौघ वाहे ॥
जो अंतरीं प्रेमळ लोकिं राहे ॥ त्याच्यांत सामर्थ्य विशेष पाहें ॥ ७ ॥
द्वेषास जो अंतरिं दे न थारा ॥ तो शांतिनें शक्ति करीं असारा ॥
द्वेषीत नाहीं निज शत्रुलाही ॥ आघात किंवा भय त्यास नाहीं ॥ ८ ॥
भूतानुकंपा धरुनी मनांत ॥ इच्छीत सर्वां शुभ मी जगांत ॥
अवश्य माझें हित त्यांत झालें ॥ प्रेमांत ऐसें वर तत्व ठेलें ॥ ९ ॥
द्वेषास मी लावितसें कवाड ॥ नाहीं कशाची मज भीति आड ॥
देवा न भीतों कधिं निश्चयानें ॥ राजा असें मीच न तूं बळानें ॥ १० ॥

---

## जन्माचा हेतु.

### श्लोक.

जावें पदा मागुति ईश्वराच्या ॥ हा हेतु जन्मीं सगळ्या जिवांच्या ॥
झाडूनियां जीव भवीं धुराळा[4] ॥ प्रभूलि गांठी झटुनी निराळा[5] ॥ १ ॥
भोगावयाचें प्रति दुःख लोकीं ॥ नैराश्य कष्ट प्रतिकूलता कीं ॥
एकेक ही पायरि उंच साची ॥ महेश्वराच्या पदसाधनाची ॥ २ ॥
पंथ क्रमीं नित्य पदापदांनीं ॥ दीर्घांतरें भीति मनीं न मानीं ॥
महेश्वराचा पदवीस जावें ॥ त्यानें जगीं धन्य म्हणोनि घ्यावें ॥ ३ ॥
छाया प्रभा प्रत्यहिं जेवि येती ॥ आनंद दुःखें वितळूनि जाती ॥
सानंद ऐसेंच वद स्ववाचे ॥ जाऊं पथानें प्रभुच्या पदाचे ॥ ४ ॥
महेश्वराच्या पथि चालतांना ॥ शोकार्त मुद्रा लवही करी ना ॥
तो शांतिनें चालत मार्ग जासी ॥ तयांत तेव्हां रविसा प्रकाशीं ॥ ५ ॥
मार्गांत जें सौख्य मिळेल घ्यावें ॥ जावें पुढें, जैं पथ वांकुडावे ॥
तेव्हां मनींचा दृढ हेतु ठेवा ॥ स्वजीव सर्वेशपदासि जावा ॥ ६ ॥

---

१ अवतरली. २ महाकारणाचा. ३ राजाचा राजा, ईश्वर. ४ मालिन्य. ५ एकटा.

## इच्छाशक्ति

### श्लोक.

इच्छा तसा होसिल निश्चयानीं ।। असत्य संतोष अपेशि मानी
कीं काल नोहे अनुकूल मातें ।। विमुक्त आत्मा नच मान्य त्या तें ।। १ ।।
स्वर्गासि जिंकी करि दास काला ।। गर्विष्ट दैवा नुरवी यमाला ।।
प्रसंगरूपी अदया नृपाला ।। भंगोनि इच्छा करि दास त्याला ।। २ ।।
इच्छा नरीं शक्ति अदृश्य आली ।। ती शाश्वता आत्मकुलीं जहाली ।।
इष्ट स्थला जाउनियां भिडे ती ।। पाषण भित्ती हि न आड येती ।।३ ।।
कांहीं विलंबें नच घाबरावें ।। ज्ञानी जनांच्या [1]धृतिला धरावें ।।
आक्षेस आत्मा उठुनी करीतां ।। मानोनि ती जोडिति देव दाता ।। ४ ।।
सिंधूकडे जात नदी[2] जवानें ।। फोडी कडे ती धरणें बळानें ।।
ती आपुला मार्ग चुके न सोडी ।। 'इच्छा तसा होसिल' तत्व गोडी ।। ५ ।।

---

## जीवाचा प्रवास.

### साकी.

निश्चित सुखें जीव भवपथीं प्रवास करितो जेव्हां ।।
तारुण्याच्या सुंदर सुममय गिरिशिखरि बघतो तेव्हां ।। १ ।।
लांबुनि दिसतो रात्रीं त्यातें प्रकाश वरि दीपाचा ।।
रम्य मनोहर सुंदर अर्क्षी तोच असे आशेचा ।। २ ।।
जाय पुरातन कालाचा रथ तेव्हां धडधड पुढतीं ।।
तारुण्य सर्वे झरझर धांवे वर्षोवर्षी अंतीं ।। ३ ।।
दुःखी कष्टी झाला होतो जीव पुढें परि जातो ।।
अच्छादित मग पूर्ण धुकयानें अश्रस्थाना बघतो ।। ४ ।।
त्याला पुढती कोसाकोसावरि दिसताती दगड ।।
त्याच समाधी मृत देहांच्या पश्चिम भागीं रगड ।। ५ ।।
तेथें शोभे निजरंगानें सूर्यास्ताच्या काळीं ।।
विश्रांतीचें भव्य मनोहर निर्जन मंदिर माळीं ।। ६ ।।
ही विश्रांति स्थित्यंतर कीं मृत जीवाचें पाहीं ।।
जीवशिवांचा वियोग होतो प्रकार ऐसा नाहीं ।। ७ ।।
भय सारें ही लोटुनि परतें चढतां वरदेशपदा ।।
गांठी अंतीं प्रेमाची तो अनंतनगरी शिवदा ।। ८ ।।

## अभिमान खंडन.

### श्लोक.

आश्चर्यानें चकित अथवा मूढ मी संशयानें ।।
होतों तेव्हां शमवुनी मना बोधितों निश्चयानें ।।
शक्ती जीनें सृजिलि न चुके सूर्यमाला विशाला ।।

---

१ धैर्य. २ वेगानें.

जें जें कांहीं प्रभु करित तें मानवांच्या सुखाला ॥ १ ॥
जीनें तारे सतत गगनीं चालवीले प्रभावें ॥
सप्तद्वीपा रचित अवनी अद्भुता जी स्वभावें ॥
राहे बापा शिर नमवुनी शक्ति ती श्रेष्ट आहे ॥
ठेवीं ज्ञानाविषयिं न तिच्या संशयो पामरा हे ॥ २ ॥
कोणाच्यानें सगति करवे काय हो एक तारा ॥
वृक्षांचें कां लघु करवतें पान त्या गर्वभारा ॥
पाताळीं कां उदधि बुडवे नास्तिका सांग मातें ॥
भूमींतूनी गिरिवर तुला काढवे काय हातें ॥ ३ ॥
सर्वश्रीनें सुखमय उषा एकही आणवे ना ॥
किंवा तूतें दिवस करवे संधि आंधारही ना ॥
तेजोहीना शशिस तुज ना देववे सौम्य कांती ॥
ब्रह्मांडें तो रचि, तव मनीं काय संदेहवृत्ती ॥ ४ ॥
खोटें नाटें जगतिं भरलें दुःख अन्याय पाप ॥
संगें संगें विमल दिसतीं सौख्य साचें अपाप ॥
निर्मानीयां सकल जगतीं तो प्रभू चालवीतो ॥
उद्धारावे निज जन, कसे जाणतो सर्वदा तो ॥ ५ ॥
निंदावी त्वां हरिकृति तुझें मानवा काम नाहीं ॥
सत्यार्थाला चिकटुनि रहा निश्चयानें सदा ही ॥
खोटें जें जें बघुनि सहसा दाखवीं पाठ त्यातें ॥
न्याया रीती विहित जग हें उन्नतीच्या पदातें ॥ ६ ॥

---

# तीन मित्र.

## श्लोक

जन्मीं जना दे हरि सौख्यकोटी ॥ वाटे मला त्यांतुनि तीन मोठीं ॥
तदर्थ आहे प्रभुपाहीं लीन ॥ दारिद्र्य एकांत असौख्य तीन ॥ १ ॥
शत्रुस्वरूपें बहु काळ त्यांनीं ॥ उग्रीं मला कांपविलें भयानीं ॥
आले तसे दांभिक हर्ष गेले ॥ त्याहून हे योग्य कळोन आले ॥ २ ॥
दिलें मला शिक्षण उद्यमाचें ॥ तनूंत सामर्थ्य भरी श्रमाचें ॥
खिंडींतुनी दुर्गम घेउनी तो ॥ कीं [१]निर्मलानंद-गिरीस नेतो ॥ ३ ॥
झालें श्रमज्ञान खरें जयातें ॥ ओलांडवे मार्ग तया पदातें ॥
वेगें बळें ते पुढतीच जाती ॥ [२]शैलाग्रही शेवटिं गांठिताती ॥ ४ ॥
एकांत अंतःकरणांत राहे ॥ स्वर्गप्रदेशीं मज नेत आहे ॥

---

१ स्वर्ग. २ पर्वत शिखर.

बोलावया लाविल देव मौनी ॥ प्रेमामृतीं तो मिळवी निदानीं ॥ ५ ॥
आणी असौख्य प्रभुनाम वाचे ॥ तेंची करी ऐक्य जिवाशिवांचें ॥
आधार अंतीं मज दुःख होतें ॥ सामार्थ्य कीं दुर्धर घावयातें ॥ ६ ॥
केला तिघांनीं मम पाटलाग ॥ वर्षानुवर्षें धरुनोहि राग ॥
अरीहुनी निष्ठुर ते दया न ॥ घेती स्वयें नंतर रूप आन[1] ॥ ७ ॥
त्यांनीं दिलें दर्शन पूर्ण मातें ॥ देवापरी सुंदर रूप त्यातें ॥
प्रीती झळंबे नयनांत त्यांच्या ॥ झालों प्रसादें कृतकृत्य ज्यांच्या ॥ ८ ॥

---

## जग उत्कृष्ट होत आहे.

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे

### श्लोक.

दुःखें शोकें खचुनि भरली सर्व पृथ्वी अघांनीं[2] ॥
जेव्हां जेव्हां मनुज वदती आपुल्या हें मुखांनीं ॥
तेव्हां ते ते प्रबळ बनुनी राहती दैत्य लोकीं ॥
शास्त्राधारें कथित न नवें चांगलें हें विलोकीं ॥ १ ॥
त्या दैत्यांचा परिभव सदा साधनें एक होय ॥
ज्या योगें ते पळत सुटती घेउनी जीव हाय ॥
मूर्खत्वाची किरकिर नरीं सोडुनी सर्व द्यावी ॥
धैर्यें त्यानें भय न धरितां आपदेला बघावी ॥ २ ॥
सर्वी देशीं अवगत अशा सर्व कालान्तरांत ॥
धुंडाळोनी जरि बघितलि तीं पुराणें समस्त ॥
ध्यानीं येतें बहु गत युगें या युगाहूनि पाहें ॥
[3]क्रौर्यें होतीं भरुनि उरलीं सत्य ही गोष्ट आहे ॥ ३ ॥
शब्दाशब्दा निरखुनि पहा अक्षराक्षरातें ॥
तेव्हां येतें अधिक अधिक प्रत्ययाला तुम्हा तें ॥
आहे [4]पृथ्वी अधिक बरवी चांगला आज काल ॥
पूर्वी ऐसी मुळिंच नव्हती हें विचारें कळेल ॥ ४ ॥
निःसंदेह प्रचुर जमली घाणही आज काल ॥
काढायाची निकड हि असे सत्य तुम्ही वदाल ॥
व्हावी शुद्धी गमत मज जें चांगलें ही तयांत ॥
अन्यायाचे तरु उलथुनी पाडिले पाहिजेत ॥ ५ ॥

---

१ अन्य. २ पापांनीं. ३ क्रूरपणानें. ४ जग.

अन्नावीणें झडुनि मरती सोसुनी दीन ताप ॥
त्यांचे कर्णीं श्रवण करितों दुःखनिःश्वासशाप ॥
मोठया मोठया फुगिर पिशव्या घेउनीयां धनाच्या ॥
जाती जाती धनिक शयनीं हीन [1]वारांगनांच्या ॥ ६ ॥
आजीं सारें गगन भरलें आपदांच्या [2] घनानें ॥
झांकानीयां रवि, शिर वरी काढियेलें तमानें ॥
पूर्वी होते द्विगुणित असे भूतकालीं प्रकार ॥
ठेवा ऐसें दृढतर मनीं सांगतों सद्विचार ॥ ७ ॥
अन्यायाचे तळपट घडो, ऱ्हास पावोत दुष्ट ॥
न्यायाचा ही विजय फडको हर्षे लाभोत सुष्ट ॥
अन्यायाच्या निबिड तिमिरीं लाविला सावकाश ॥
शास्त्रज्ञानें उजळुनि दिवा तोचि आत्मप्रकाश ॥ ८ ॥
ब्रह्मांडाच्या प्रलयसमयीं सान आवर्तरूप ॥
झालों तेवी निजभुजबळें सर्वही विश्वभूप ॥
दुष्टां लोकां प्रगति पुढची थांबवे आमुची कां ॥
लोकांलोकां वर चढुनियां सत्य जाणार नाका ॥ ९ ॥
तोडूं आतां तटतट बिडया पाश सारे झुगारूं ॥
बांधीयेले दृढतम जये आजपर्यंत वारूं ॥
पृथ्वी आहे खचित बरवी सांगतों सत्य पाहें ॥
पूर्वी ऐशी मुळिंच नव्हती सत्कवी जाणताहे ॥ १० ॥

---

## प्रेमाचें माप.

### श्लोक.

स्वशक्ति वर आपुली खचित अंतरीं प्रेम तें ॥
जियां सकल ही हरी धरुनि माप मोजीत तें ॥
यदंतरिं दया वसे निकट ईश्वरा मानव ॥
स्वरूप विभुचें दया, करि नतावरी माधव ॥ १ ॥
जगा निरखुनी सदा धडपडींत जें राहिलें ॥
विशाल फुगवोनियां हृदय थोर केलें भलें ॥
करी स्थळ उरीं नरा सकळ भूमिच्या लेंकरा ॥
प्रभू जवळ जाउनी सुजन पावला तो खरा ॥ २ ॥
पढा न अथवा पढो विमल वेदशास्त्राक्षर ॥
उपास सगळे करा प्रतिदिनीं गिळो भाकर ॥
भजा हरिस मंदिरीं नगरिं वा विलासीं फिरो ॥

---

१ वेश्यांच्या. २ संकटांच्या.

हरीसदश जाहला नमन लोक त्याला करो ॥ ३ ॥
हरीस बहु पाहिजे हृदय थोरलें आपलें ॥
जया न लघु एकही पथ[1] सुधर्म हेत, सले ॥
करें कवळितो बळें द्विविध [2]मृत्युनाकास ही ॥
असा सुजन ईश्वरी म्हणति अंश झाला मही ॥ ४ ॥

---

# आज

## श्लोक.

होईल सूर्योदय नित्य जेव्हां ॥ आलासि जन्मा नव भावि तेव्हां ॥
सारा बुजोनी गतकाल गेला ॥ खोदोनियां काढुं नको तयाला ॥ १ ॥
असंख्य झाले मृत 'काल' मागें ॥ भूतां तयां बोलवि [3]नानुरागें ॥
संबंध ठेवीं दिन आज त्याचा ॥ [4]सेवेकरी दास करीं तयाचा ॥ २ ॥
सन्मित्र आहे दिन आजचाची ॥ इच्छा करीतो परिपूर्ण तो ची ॥
अंधत्व ये दुःखभरें नराला ॥ चिंतीत तो काल तदा उद्याला ॥ ३ ॥

---

# उपदेश, भिन्नरुचि.

## श्लोक.

तुझ्या सारखें कां करूं सांग मातें ॥ तुझा मार्ग ही चांगला आदरातें ॥
पुरीला परी नीटसे मार्ग दोन ॥ गिरीखालिं तैसा गिरीच्या वरोन ॥ १ ॥
न मार्गीं तुझ्या भीति, तो दाट वाहे ॥ असाची सदा शोधिती धूर्त पाहें ॥
चढोनी पदीं जात मी पर्वतातें ॥ विचारी असें ना करीं साहसातें ॥ २ ॥
खरा मार्ग माझा, तुझा त्या प्रमाणें ॥ न दोघे हि शेंगांतलें आम्हि दाणे ॥
पडोनी रहावेंच ओळींत एका ॥ गळोनी पडावें कदा भूंत देखा ॥ ३ ॥
तुम्ही आम्हि गेलों जरी एक वाटे ॥ तरी विश्व कंटाळवाणेंच वाटे ॥
जरी वेगळे मार्ग आहत आजीं ॥ तरी अंतिं संयुक्त शंका न माजी ॥ ४ ॥
तुला गोड छाया, मला सूर्यताप ॥ हळूं चालणें प्रीय तूतें अपाप ॥
समूहांसवें धांवण्या हौस मात ॥ सुख घालवीं शेवटीं मी श्रमातें ॥ ५ ॥
मला आवडे संकटें युद्ध मारा ॥ तुला आवडे शांतिचा काल सारा ॥
मला गोड ते क्षोभ गोंगाट साचे ॥ तुला वेड आहे सदा स्वस्थतेचें ॥ ६ ॥
तुला आवडे आर्द्र तो पारिजात ॥ हिंवाळ्यांतलीं कुंद पुष्पें सुजात ॥
मला प्रेम आहे गुलाबी फुलाचें ॥ तसें प्रेमही मोगऱ्याचे कळीचें ॥ ७ ॥

---

१ धा.पंथ. २ मृत्यु व स्वर्गलोक. ३ न प्रेमानें. ४ सेवक.

मला माझिया जीवनीं जावयाचें ॥ कपाळीं तसें लेखिलें होय साचें ॥
पथीं नेमिल्या प्राप्त आम्हांस जाणें ॥ पुरीं भेट होते सदा निश्चयानें ॥ ८ ॥

---

## अंतर्दृष्टि.

### साकी

कारण न कळे कांहीं मजला दिसतें जें नयनाला ॥
सुंदर ताजें, शुष्क परी तें दिसतें हो अन्याला ॥ १ ॥
[1]हरिधनु किंवा सूर्योदय जें मन्नयनानीं बघतों ॥
तेव्हां अन्या [2]निशा तमोमय ऐसा प्रकार घडतो ॥ २ ॥
जन वदती कीं तुम्ही अहां हो फार जगीं उत्साही ॥
उत्तर देतों अंधुक पडदा त्यांतुनि हें मी पाहीं ॥ ३ ॥
कारण जिकडे जिकडे माझी दृष्टी मी फिरवीतों ॥
तिकडे तिकडे मजला कांहीं स्तुत्य प्रकार दिसतो ॥ ४ ॥
म्हणतों मी कीं पहा पहा हो किति सुंदर हे डोळे ॥
पुष्पासमही कोमल कांती, गाल किती हे कंवळे ॥ ५ ॥
यावरि उत्तर संदेहानें देती कितीक लोक ॥
साधारण हें रूप दिसतसे आम्हां नयनीं चोख ॥ ६ ॥
मी वदलों कीं याहुनि सुंदर उपवन कोठें नाहीं ॥
भासे मजला नंदनवनची सुखांत फिरतों पाहीं ॥ ७ ॥
म्हणती दुसरे आणि वचनिं ऐसें वदतां काय ॥
पुष्पलतानें खुरटविती हीं झुडपें रानीं हाय ॥ ८ ॥
कारण नेणों परि देवानें दृष्टि दिली मज खोल ॥
नयनीं बघुनी त्यांत पहातों प्रभुची दीप्ति अमोल ॥ ९ ॥
आंतर्गत जे अगम्य आहे सर्वांचा आधार ॥
चराचराला व्यापुनि ठेली भूपवि तनुमंदीर ॥ १० ॥
हांमोत कुणी लोक अजागळ न दिसे त्यांना कांहीं ॥
डोळ्यावरती आला सारा अंधपणाचा पाहीं ॥ ११

---

## पोकळ तत्वज्ञान.

### श्लोक.

[3] पुष्पोद्यानीं फिरत असतां पंडितंमन्य[4] एक ॥

---

१ इंद्र धनुष्य. २ अंधारी रात्र. ३ फुलबाग. ४ पंडित म्हणविणारा.

विद्यागर्वें फुगुनि विवरी सोडुनी तो विवेक ॥
हांसोनीयां वदत सकलां नाहिं सृष्टींत देव ॥
[1]शक्ती निर्मी सकळ जग हें बुद्धि[2]पाळी सदैव ॥ १ ॥
मोठी निष्ठा धरुनि विनयें ज्ञानवंतासमान ॥
रात्रीं प्रार्थी कर जुळुनि तो, देव झाला प्रसन्न ॥
चिंता कष्टें रडुनि रडुनि दीर्घ निःश्वास सोडी ॥
रामा, रक्षीं, मदिय तनुजा, वंश माझा न मोडीं ॥ २ ॥

---

## खरा ज्ञानी.

### श्लोक.

बोले न अन्या विषयीं [3]असाधु ॥ ज्ञानी असे उत्तम तोचि साधू ॥
दृष्टी जयाची बहु शीघ्र पाही ॥ उत्कृष्टता सद्गुण योग्यता ही ॥ १ ॥
चूडामणी तोचि सुधारकांचा ॥ राहे सदा शुद्ध विचार ज्याचा ॥
एकाकि जो उत्तम वर्तनानें ॥ त्यागी स्वदोष स्वपराक्रमानें ॥ २ ॥
निजान्तरीं शोधुनि पाहतां तें ॥ राहें धरोनी कडक व्रतातें ॥
परी स्वबंधू बघसील जेव्हां ॥ ठेवीं दया तूं ह्रदयांत तेव्हां ॥ ३ ॥
निंदा करी लाघव मानवाचें ॥ निंदा पराची न करीं स्ववाचे ॥
जलांत येतीं झुडुपें भरांत ॥ निंदा पिके[4]अज्ञजनाननांत ॥ ४ ॥

---

## जग सुखमय आहे.

### श्लोक.

आहे कोणी जगतिं असुखी सांगतां काय मातें ॥
कोणी ऐशा सुदिनिं रडतें काय सांगा मला तें ॥
खालीं पृथ्वी हिरवि वरती सूर्य दैदिप्यमान[5] ॥
नाहीं कां हो? चिर सुखमय स्वप्न आयू महान ॥ १ ॥
तेजोमूर्ती रवि, नभ वरी, पक्षि ही अंतराळीं ॥
गाती गाणें मधुर, उडती घालिती घेर काळीं ॥
वायू वाहे निकट कथितो मी करीं प्रेम तूझें ॥
एकाकी ना खचित जगतीं थोरलें दैव माझें ॥ २ ॥
आज्ञीं होतों उघडित यदा सूर्यतापार्थ जाळी ॥
कोणी तेव्हां सहज वदला आज मातें सकाळीं ॥

---

१ Force. २ Reason. ३ वाईट. ४ अज्ञानी लोकांच्या तोंडांत. ५ तेजस्वी.

पृथ्वीला या दिन उगवला घोर अत्यंत आर्जी ॥
झाला जेव्हां उदय रविचा देखिली सृष्टि ताजी ॥ ३ ॥
शार्खी कोणी वदति निकरें दुःखवादी[1] प्रचंड ॥
पृथ्वी आहे भयमय दरी पातकांची त्रिखंड ॥
शंका यांची खगगणमधूमक्षिकातें मलाही ॥
वाटे आम्हां खचित जगतो योग्य राहावया हो ॥ ४॥
कोणी बोले मन चल[2] असे मानवी मानवंता ॥
प्रीती आहे असुखजननी संसृती घोर चिंता ॥
मृत्यु क्षेत्रीं खरतर खिळे घालुनी जीवधान्य ॥
कांपी सारें चरचर हलें चांगलें लोकमान्य ॥ ५ ॥
तेव्हां मी हें गुज कथि पिकां[3] हांसलों फार दोघे ॥
त्यानें हास्यें वन भरियलें गाडनी वृक्ष वेंघे ॥
पक्षी बोले विमल करितां आपुलें पंख डावें ॥
ज्याला गाया बळ नच तयें ओरडोनी रडावें ॥ ६ ॥
पक्षी गेला उडुनि गगनीं राहिलें गान मागें ॥
वीणानादापरि हृदयिं तें कोंदलें रंगरागें ॥
निःशक्तांची किरकिर तयें थांबवीली क्षणांत ॥
मार्गी जातां श्रवणि भरतें जो न केव्हां निवांत ॥ ७ ॥
पृथ्वी माते, अतुल विमल ज्ञानसौंदर्यदायी ॥
आहे कोठें मधुर सुख हें, मातृ ह्याच्च पायीं ॥
जन्म प्रेमें जगति, खरि तें प्रीति कर्तव्य लोकीं ॥
राहे दुःखीं कारण कथिं गे, मी तरी ना विलोकीं ॥ ८ ॥

---

## शब्दसामर्थ्य.

### साकी.

जीवनराज्यीं शब्दाचें हो सामर्थ्य असे भारी ॥
योजीं तयास दक्षपणानें युक्तीनें व्यवहारीं ॥ १ ॥
रोगद्वेषाविषयीं बोले निर्धनताची विवरी ॥
आत्मविनाशी ते ते धोंडे पाडुनि घेतो स्वशिरीं ॥
सौख्यसमृद्धिप्रेमबलाच्या वार्ता ऐकुनि कानीं ॥
त्यांचीं नांवें सदैव जपतां जपुनी गातां गानीं ॥ २ ॥
सत्य दैवतापरि तीं येती धांवुनि तुमच्या जवळ ॥
घरांत तुमच्या निवास करिती रक्षण करिती सबळ ॥ ३ ॥

---

१ सर्व जग दुःखमय आहे, असें म्हणणारे. २ चंचल. ३ कोकिळाला.

वृत्तित विचार काढि मुखें तो ते आणी व्यक्तीला ॥
वस्तुसि अदेह देही करि दे मत्त जीवित तोला ॥ ४ ॥
सृष्टिनियम हा मुखांतुनी तरि काढी ना शब्द असे ॥
आशांकुर चिर वाढविती ना सर्वांच्या हृदयिं तसे ॥ ५ ॥

## आमचा वारसा.

श्लोक.

माझी तुझी ही अवनी समस्त ॥ कोधां प्रभूनें दिधली प्रशस्त ॥
तें ईश्वरी वेद अम्हा मिळाले ॥ हेवा कशी कोण न धर्य चाले ॥ १ ॥
देवा असे ही तव भूमि पाहें ॥ कीं आमुचा भाग हि तींत आहे ॥
जन्मास आलों जगदीशवंशीं ॥ ध्यानांत माझ्या मज ना असोशी ॥ २ ॥
भू ईश्वराची गळफांस हीचे ॥ लोभीपणाचे तुटुनी गळयाचें ॥
असेल जें इष्ट अम्हांस मागूं ॥ तें वेंतल्यावांचुनि केविं भागूं ॥ ३ ॥

## जीवाची समस्थिति.

श्लोक.

प्रार्थूं नको दुःख मला नसावें ॥ दुःखांतुनी मुक्त जिवें असावें ॥
आजीं कडू गोड उद्यांस तेंच ॥ हानि क्षणीं संतत लाभ साच ॥ १ ॥
वस्तू न जें तन्महती दुणावें ॥ [१]क्षुद्दुःखि तो भोजनतृप्ति[२] पावे ॥
दुःखास थारा हृदयांत देतो ॥ आनंद येतां पुरता हंसे तो ॥ २ ॥
धरीं न भीती कडु औषधांची ॥ दारिद्र्य पीडा परिताप यांची ॥
दुःखं जिवा सूक्ष्म तयांत पाहें ॥ आत्मीय साम्य स्थितितंतु राहे ॥ ३ ॥

## सिद्धीचें मूळ.

श्लोक.

निजात्मसामर्थ्यं अखंड योजीं ॥ चुकों नको जीवितहेतु आजीं ॥
कालागमाची नच वाट देख ॥ मिथ्या कराया निजदैवलेख ॥ १ ॥
आत्म्यांतची दैव असें कळावें ॥ तैं संशयाज्ञानभयीं पळावें ॥
आहेस तूंची हृदयस्थ देव ॥ काला करीं दास सुखाम सेव ॥ २ ॥

---

१ भुकेनें पीडलेला. २ जेवणाचा संतोष.

द्वेषूं नको प्रेम जिवीं धरावें ॥ अन्यार्थ कांहीं स्वकरें करावें ॥
येईल जो सर्वहितास आड ॥ पोटीं नसो तो निज हेतु द्वाड ॥ ३ ॥
कानीं ध्वनी ऐक समाधियोगीं ॥ निःशंक घे हर्ष खुशाल भोगीं ॥
होतें खरें ज्ञान निजान्तराचें ॥ तेव्हां घडे वश्य अनित्य साचें ॥ ४ ॥

---

## जगदुन्नतीची इच्छा.

### श्लोक.

असो जग भलें मनीं तुजसि होय इच्छा जरी ॥
कवी कथितसें तुला सुलभ युक्ति साधी खरी ॥
स्वकीय निरखीं कृती परम दक्षता ठेवुनी ॥
सदा सरळ ती असो धरिंच सत्यता ही मनीं ॥ १ ॥

सुनिर्मल करीं तुझें मन निजार्थ लोटीं दुरीं ॥
विचार सगळे धरीं विमल थोरले अंतरीं ॥
तरीच करिशील तूं सुवन नंदनासारखें ॥
तुझ्या वसतिचें, करी विषम दुःख जें पारखें ॥ २ ॥

असो सकल शाहणें जग मनांत इच्छा जरी ॥
स्वयें सर पुढें तरी निजबलें कृती आदरीं ॥
सुजाणपण आपुल्या हृदयसंपुटीं सांठवीं ॥
न त्यांत कुविचार तूं फुकट आपुले कालवीं ॥ ३ ॥

दिली नरतनू तुला सतत साधि विद्याधन ॥
कसें जगतिं राहणें शिकविती मुनी पावन ॥
जगास करूं शाहणे जरि मनांत आलें तव ॥
सुजाणपण मेळवीं प्रथम तूं स्वयें त्यास्तव ॥ ४ ॥

सुखी जग असो असें जरि मनीं सदिच्छा भलें ॥
तरी अनुदिनीं तुवां स्मरण ठेवुनी चांगलें ॥
स्वकीय पथि चालुनी जगतिं जात जातां नरा ॥
दयामय बियें करीं दश दिशांस पेरीं धरां ॥ ५ ॥

प्रमोद बहुतां जियां हृदयिं जेधवां कीं घडे
निमित्त जन एकची कितिकदां असें सांपडे ॥
वनांत लघु रोंपिला तरु वटाख्य कोणी तरी ॥
असंख्य पुतनेंसि तो करुनि सांवली सांवरी ॥ ६ ॥

## जन्माचें सार्थक्य.

### श्लोक.

संसाराचा क्रमित असतां मार्ग कंटाळवाणा ॥
भारी ओझें स्वशिरिं नुचले,पाय दीनास कोणा ॥
ओझें त्याचें करुनि हलकें वेग दे तत्पदाला ॥
त्यानें लोकीं सफळ पुरता आपुला जन्म केला ॥ १ ॥
हानी पोटीं उपजत असे लाभ मोठा जगांत ॥
दुःखें ज्याचें मन खचत त्या सांग ही सत्य मात ॥
कष्टें[1] जीवध्वज जड भवीं वाहुनी नेत आहे ॥
त्याला त्याला वर सकृप तो देत देवेश राहे ॥ २ ॥
वक्तृत्वानें मधुर अथवा कौशलाच्या प्रभावें ॥
नैराश्यानें तळमळ करी धीर दे त्यास पावें ॥
किंवा एका जरि हंसविलें खिन्नमुद्रा जनाला ॥
लोकीं आहे सफळ अपुला जन्म त्यानेंच केला ॥ ३ ॥

---

## पुनरुक्ति.

### श्लोक.

तत्वें काव्यीं कविजन कथी सर्वदा तींच पाहीं ॥
ब्रह्मांडाला निकड गमते सत्य माझी तुझीही ॥
इच्छाशक्ती प्रबल, करितें बापुडें दैव काय ॥
प्रेमें चाले जग सकल हें, त्या विना शून्य हाय ॥ १ ॥
संदेहानें भरलिं हृदयें मानवांची जरी तीं ॥
माझें काव्य श्रवण करुनी मानिताती सुनीती ॥
शोधा अंतीं प्रभु गवसतो स्वान्तरीं सर्व काल ॥
देहस्वार्थाविण न दुसरें पाप मोठें [2] कराल ॥ २ ॥
आहे दैत्य प्रबळ जगतीं एकटा लोभ पाहीं ॥
गातों तेंची फिरुनि सगळा जन्म आनंददायी ॥
द्वेषापेक्षां प्रबळ असतो प्रेमनामा विकार ॥
आहे पाहें [3]नरभग खरें मूळ त्याचे विचार ॥ ३ ॥

---

१ जीवरुपी ध्वजा. २ भयंकर. ३ मनुष्याचें दैव.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## मृत्यूची पृच्छा.

### श्लोक.

आशेनें मी भ्रमण करितों सौख्य शोधावयातें ॥
कीर्तीलोभें अविरत[1] करी यत्न मोठें यदा तें ॥
या लोकींचें धन विभव कीं साधितां श्रेष्ठ सारें ॥
संगें कोणी फिरत न जना घेववें नांव त्याचें ॥ १ ॥
मौनें मागें फिरत लपुनी दावि ना तोंड पाहें ॥
त्याला चिंता मुळि न तुमच्या दुःखसौख्यांत राहे ॥
अंतीं येतो परि दिन असा सर्व जीवां समान ॥
त्याचें तेंव्हां मुख दिसतसे होय तच्छद्मभान ॥ २ ॥
तोची मृत्यु प्रगट करितो आपुलें रूप सारें ॥
शोधोनीयां तवपथ वदे अंत[2]हा पाहिं बा रे ॥
केल्या कर्माविषयीं तुज तो काय पृच्छा करील ॥
त्याचें केलें मनन असलीं काय मित्रा सुशील ॥ ३ ॥
केलीं पापें किति जरि तुवां तो विचारी न कांहीं ॥
पंथाधर्माविषयिं तुझिया काळजी त्यास नाहीं ॥
पृच्छा ही तो करिल तुजसीं जन्मदारभ्य कां हो ॥
कोणी लोकां कितिक हलकीं भासवीलीं कथा हो ॥ ४ ॥

---

## अहंब्रह्मास्मि.

### श्लोक.

कोठून आलों समजे न मातें ॥ जातों कुठें तें न कळे मनातें ॥
मी सत्य आहे इह मूर्तिमंत[3] ॥ दुःखासुखाच्या जगतांत[4]हंत ॥ १ ॥
मेघाभ्रुक्यांच्या पटलांतुनी हें ॥ डोळां दिसे तत्व विशुद्ध पाहें ॥
मदंतरीं शक्ति वसे अनंत ॥ सुखासुखोत्कर्ष करी जगांत ॥ २ ॥
अस्तित्व विश्वीं पृथिवीस आहे ॥ ठावें मला कारण काय नोहे ॥
हें चाललें केंवि मला कळे ना ॥ शोधावया बेंचिन जन्म नाना ॥ ३ ॥
आयुष्य माझें क्षणमात्र आहे ॥ मी अल्प कालावधि येथ राहें ॥
हा देह तों वाटतसें मनातें ॥ आनंद द्यावा सगळ्या जगातें ॥ ४ ॥

---

१ अस्खलित, २ शेवट. ३सत्य, प्रत्यक्ष. ४ हाय.

सर्वां जनांना जड हेंचि जातें ॥ मोठेपणाची नुरि[1] भावना ते ॥
सर्वांचिया ये जरि हें मनास ॥ मी जन्मलों मोदचि द्यावयास ॥ ५ ॥
कोणीहि कर्में करितां न भीता ॥ बंधूस बंधू बहु सांवरीता ॥
जगास आनंद अखंड होता ॥ अन्याय सारा विलयास जाता ॥ ६ ॥
आश्चर्य सोडीं जगिं जन्मल्याचें ॥ व्यंगें न काढीं जनदोष वाचे ॥
आतां उठोनी वद साभिमान ॥ मी ब्रह्मचो केवळ एक जाण ॥ ७ ॥
पृथ्वी जिवांनीं भरली जरी हे ॥ सत्वस्थ लोकां स्थळ पूर्ण आहे ॥
अवश्य मी ही इह जन्मलों कां ॥ द्यायास आलों बल सर्व लोकां ॥ ८ ॥

---

## प्रातःस्तवन.

### श्लोक.

प्रातःकाळीं अनुदिनिं करीं प्रार्थना ईश्वराची ॥
द्यावी देवी मजसि सदया संपदा पूर्णतेची ॥
या जीवाला उपकृतियशोबुद्धिसंतोष द्यावीं ॥
भीती शंका हरुनि विलया मन्निराशाहि न्यावी ॥ १ ॥
तारे शंकारहित कधि ही त्या निराशा शिवे ना ॥
आकाशीं ते सतत फिरती वर्षसंख्या कळे ना ॥
मोडी ना तो नियम भरती ओहटींचे समुद्र ॥
हेतू आम्हां अगम समजे निर्मिता रामचंद्र ॥ २ ॥
कोटी गोलां गगनिं फिरुनी तेज देतात तारे ॥
औदार्यानें उदधि वितरी मेघरूपें जला रे ॥
झालें नाहीं किमपिहि कमी तेज त्या तारकांचें ॥
बिंदूचें ही नच उदधिला जाहलें न्यून साचें ॥ ३ ॥
बंधू आहां उदधिसरितातारकांचे उदार ॥
जाणा ऐसें सुमत कथितों पंडितांचे विचार ॥
ईशानें हें विभव दिधलें आपुलें सज्जनार्थ ॥
शांतीनें जे झटुनि करिती प्रत्ययें कर्म सार्थ ॥ ४ ॥

---

## पूर्ण विश्रांति.

### श्लोक.

आहे जीवन मानवी जगतिचें संग्रामची दारुण ॥
देहा जर्जरता जिवा विकळता द्याया खरी कारण ॥

---

१ हृदयांत नाहीं.

देतां तोंड तयां बळें सकळही जीवात्मशक्ती गळे ॥
जिंकाया जड त्यांत ही मिळविण्या स्वामित्व तेजागळें ॥ १ ॥
धैर्यानें स्वमनीं मुळीं नच भितां रात्रंदिनीं एकटा ॥
लाटांच्या थडका बळें खडक कीं सोसीतसे धाकटा ॥
मोठा दुर्धर अंतरीं धरितसे स्वालंब दुर्जिक्य तो ॥
मारानें झिजुनी परी हळुं हळूं चूर्णस्थिती पावतो ॥ २ ॥
क्षोभे मानसवृत्तिचा जलनिधी केव्हां भरे ओसरे ॥
वेगानें लहरी उरीं धडकती एकीवरी एक रे ॥
झाल्यापासुनियां असेच उदधी रात्रंदिनीं चंचल ॥
तोही ना इतुका करी भरुनियां भीनें नरा व्याकुल ॥ ३ ॥
वाटे की मज साहसें खडक तो कंटाळतो नंतर ॥
भावी युद्धविचार येउनि घडे कष्टी तदीयान्तर ॥
लोहाळे दुबके जरी करित तो हेवा तयांचा उरीं ॥
हा हा खाउनि टाकितो जलधि त्या संग्राम झाल्यावरी ॥ ४ ॥
आहे जीवन भांडण प्रबळ जे खाती जिवा दुर्बला ॥
देवा ऐसिच दुर्दशा कथिं असे कां स्वर्गलोकीं बला[1] ॥
शांती ना मज सांपडे प्रगति धी नोहे नवें जीवन ॥
विश्रांती मज द्या इथें मग नको त्वद्धाम सत्पावन ॥५ ॥

---

## आनंदाचा उपयोग.

### श्लोक.

नरा चालुनी जात जातां पथानें[2] ॥ हंसावें तुवां अल्प कांहीं सुखानें ॥
हंसे नाच जीवास आनंद जेव्हां ॥ परी वांकडें होय ही त्यास तेव्हां ॥ १ ॥
कपाळीं अढी इष्ट चिंतेस वाटे ॥ तुझ्या अश्रुनीं तीजला हर्ष दाटे ॥
पहातां तिचें तोंड हांसोनि मोदें ॥ पळे मारितां जेविं कोणी प्रतोदें ॥ २ ॥
पथीं मानवी सर्व या चालतांना ॥ तुवां हांसवावें हजारों मुखांना ॥
दरेका जिवाच्या शिरीं भार आहे ॥ कुणाच्या हृदीं थोर ओझेंहि राहे ॥३॥
मनीं होउनी खिन्न निस्तेज आंगें ॥ कशाला बरें बैसतां दुःख संगें ॥
कटू[3]पौष्टिका प्राशितां दुर्विधीच्या[4] ॥ हंसावेंच पात्रा बघोनी तयाच्या ॥४॥
पथीं भेटती त्याच जे जे प्रवासी ॥ श्रमें त्रासले पाहुनी हांस त्यासी ॥
किती एकदां श्रांत पायीस खालीं ॥ फुलें हांसणें क्रोध कांटें जहालीं ॥ ५ ॥
कठीण स्वयें मार्ग जातां करी न ॥ मुखातें करोनी स्वकोपें मलीन ॥

---

१ संकट. २ संसार मार्गानें. ३ कडू फळें. ४ दुर्दैवाच्या.

प्रमोदें हंसोनी स्वकीय स्मितानें ॥ स्थलीं रम्यता आण हांसोनी मानें ॥ ६ ॥
नसे कार्य झालें तरी हांस नामी ॥ रडे कर्मकाठिन्य पाहोनी धामीं ॥
वरी ना तया संपदा कीर्ति लोकीं ॥ हंसे त्या करीं सिद्धि येती त्रिलोकीं ॥७॥
तुझें आयु थोडें जरी आज राहे ॥ जरी हानिदुःखें तुला शीण आहे ॥
हंसावें हंसावें मनीं शांति पाहें ॥ जरी नेत्रयुग्मांतुनी अश्रु वाहे ॥ ८ ॥

---

## माया.

### श्लोक.

देवें दिलें दर्शन अंतराळीं ॥ देवाविना मी न तिजा निहाळीं ॥
आकाशपृथ्वीजन कोठ गेले ॥ प्रभो कथीं, भूवरिं जे निमाले ॥ १ ॥
हांसोनियां देव तदा म्हणाले ॥ तें स्वप्न सारें तुज सत्य झालें ॥
जिवंत किंवा मृत जीव नाहीं ॥ मी एक, पृथ्वी न, खगोल हाही ॥ २ ॥
भाग्यें तुझें दर्शन आज झालें ॥ भीती न वाटे मन पूर्ण धालें ॥
पापी खरा मी नरकास योग्य ॥ तो स्वर्ग मातें कसला अभोग्य ॥ ६ ॥
स्वप्नेंचि तींहि प्रभु सांगताहे ॥ भीती नसे पाप मुळीं न राहे ॥
नाहीं मुळीं जन्ममृती जिवातें ॥ माझ्याविना सृष्टित कांहिं ना तें ॥ ४ ॥

---

## कर्मानें अधिकार प्राप्त होतो.

### श्लोक.

गिरीवरी मी जरि पोंचलों न ॥ वेंचोनि गेलें जरि शक्तिमान ॥
जातां निमा पर्वत वा चढोनी ॥ प्रभंजनें गांठियलें वरोनी ॥ १ ॥
इष्ट स्थलातें न कदाहि गेलों ॥ अती करोनी श्रम खिन्न झालों ॥
वाटे समाधान असें मनाला ॥ कीं थोर माझा अधिकार झाला ॥ २ ॥
सोत्साह मोठे श्रमही करोन ॥ मातें जयश्री जरि ती वरी न ॥
जें लाधले सत्फल बांधवाला[1] ॥ नाहींच आलें जरि मत्कराला ॥ ३ ॥
इष्टार्थ माझा नच सिद्ध झाला ॥ न देखिलें हेतुस अंतिमाला ॥
मातें न सोडील असा विचार ॥ माझा जहाला अधिकार थोर ॥ ४ ॥
[2]प्रेमप्रभा कांचन भूषणानें ॥ पथीं न माझ्या पडली क्रमानें ॥
जाणें जरी प्राप्त मला तमांत ॥ कठीण कीं निर्जनशा पथांत ॥ ५ ॥
आनंद जो गोड सदा जिवाला ॥ त्याचा जरी लाभ मला न झाला ॥
[3]अवाच्य मोठें बल अंतरीं हें ॥ पात्रत्व आलें मज थोर पाहें ॥ ६ ॥

---

१ मित्राला. २ प्रेमाचा प्रकाश. ३ अवर्णनीय.

# जाती जगांत नाहींत काय ?

## श्लोक.

(पाश्चात्य देशांत प्रत्यक्ष जातिभेद नाहीं, तरी तिकडे कशी विषमता आहे, याचें वर्णन यांत सुंदर केलें आहे.)

नाहीं जाति जगांत काय वदतां ? खोटें असें बोलणें ॥
हांसे गांव पुरा वनस्थ बघती ग्रामापुरातें उणें ॥
भिक्षा मागत जे पुरांत फिरती झोळी धरोनी करीं ॥
त्या त्या द्वेषिति जे नवीन शिरती भिक्षू तया भीतरीं ॥ १ ॥
बाई जी गिरणींत काम करिते घेवोनियां वेतन ॥
ती भावी [१]गृहपाकवेटिस मनीं हीना तिला पाहि न ॥
घेवोनी रजकी करांत वसनें येते जरी साजिरीं ॥
दासी लोटितसे घरांत कचरा स्पर्शे न तीला तरी ॥ २ ॥
वाण्याची दुहिता [२]कृषीवलसुता पाहोनि कंटाळते ॥
डोळे वक्र करी तिच्यावरि जगीं सारें असें चालतें ॥
वाण्याच्या गृहिं बसण्यास न कदा जातील [३]शिष्टस्त्रिया ॥
वाटे त्यांस कमी महत्व जणुं तें होणार लोकांत या ॥ ३ ॥
व्यापारी अवमानि कारकुन त्या जो लेखणीचा धनी ॥
गर्भापासुनि जो धनी धनमदें अंधत्व ज्याला मनीं ॥
उद्योगें चढले पदा जन तया ढुंकोनि तो पाहि ना ॥
विद्वत्ताप्रिय आपुली उपवरा कन्या [४]तिघां देइ ना ॥ ४ ॥
मोठ्या जाहगिरी [५]परंपरतया गर्वे जगीं भोगिती ॥
ते त्या द्वेषिति जे पराक्रमबळें मोठेपणा पावती ॥
विद्यादैवत पूज्य ज्या तनुमनें विद्येस जे वाहिले ॥
बुद्धि श्रेष्टचि मानुनी धरचिया द्वेषें तयें पाहिलें ॥ ५ ॥
सारें विश्वकुटुंब एकचि असे जाती कशाच्या नरीं ॥
ऐसें [६]पंडित बोलतो स्ववदनें तोहि जळे अंतरीं ॥
जेव्हां पुत्र तदीय सुंदर नटी पर्णोनि आणी घरीं ॥
क्रोधाग्नी भडके अतीशय करी कल्पांत त्याच्या उरीं ॥ ६ ॥
आहे पोकळ मानवी परि खरी स्वाभाविका रीति ही ॥
प्रौढी वा अभिमान दुर्बल जिवां दावावयातें मही ॥
तेजस्वी उगवेल सत्ययुगिचा सूर्य प्रतापी यदा ॥
देवाच्या अवनीवरी विरुनियां जातील जाती तदा ॥ ७ ॥

---

१ स्वयंपाकीण. २ शेतकऱ्याचा मुलगा. ३ संभावित, वकील. ४ वरच्या तिघांत. ५ वंशपरंपरा. ६ खिस्ति धर्मीय विद्वान् उपदेशक.

# वायकांचें युद्धाविषयीं विचार.

## साकी.

मारामारी अन्यायाची भांडण नीचपणाचें ॥
आम्हीच पहा मुलां शिकवितों बाल्यापासुनि त्यांचे ॥ १ ॥
[1]विद्यागारें देवस्थानें करिती साह्य अपार ॥
कोमल मनांत बिंबविताती शांतिप्रेमविचार ॥ २ ॥
भोंकायाला दंश कराया वाटे हर्ष श्वाना ॥
आत्मा अमर्त्य जया नरांचा ज्ञान असावें त्यांना ॥ ३ ॥
पशुची रीती सोडुनि त्यांनी उच्च पदाला जावें ॥
निजात्मसंयम विवेकबुद्धी धरुनीयां वागावें ॥ ४ ॥
परी नरांनो सुज्ञवरांनो, कर्मी बलवंतांनो ॥
अबलांपेक्षां स्वयें मिरवुनी बुद्धीबळ श्रेष्ठांनो ॥ ५ ॥
वनितांपेक्षां विवेकमतिही श्रेष्ठ अशी मिरवोनी ॥
करितां युद्धें क्रूरपणानें सांगा काय म्हणोनी ॥ ६ ॥
तुटुनी पडतां परस्परावरि चिरितां चरचर माना ॥
प्राण हरितसां निजबंधूंचे अनन्न ठेवुनि त्यांना ॥ ७ ॥
करुनी पेशा पराक्रमा कां लोकस्तुतिहव्यास ॥
स्वमुखें करितां आत्मप्रशंसा धरुनी हृदिं गर्वास ॥ ८ ॥
विधवा केल्या सुवासिनींच्या असंख्य लोकीं ज्यांनीं ॥
काव्यें कुणि ना रचिलीं त्यांचे पोवाडे ना गानीं ॥ ९ ॥
पृच्छा करितां साशंकमनें भाट निमाले काय ॥
विलया गेली कवित्वशक्ती आज कशी हो हाय ॥ १० ॥
इकडे बाया आम्ही ज्यांचे नरवर हो प्राण अहां ॥
काय करावें स्वस्थ बैसतों करितों घरांत हा हा ॥ ११ ॥
रणवाद्यांची वाई कांहीं स्त्रीजनहितार्थ नाहीं ॥
युद्धारंभक शंखध्वनिचें काम न आम्हां कांहीं ॥ १२ ॥
ध्वजापताका फडफडताती आम्हां त्याचें काय ॥
जयसमयाचा परमोत्सवही आम्हां गमत अपाय ॥ १३ ॥
कष्ट भयंकर अनिश्चयाचे स्त्रीजनदैवीं लिहिलें ॥
नित्य निराशा जर्जर करिते झगडुनि निष्फल वहिलें ॥ १४ ॥

---

१ विद्यालय.

सद्भाग्यानें कानीं आल्या जयवार्ता जरि तुमच्या ॥
त्या सह येती कोमल हृदयीं विचारलहरी स्त्रीच्या ॥ १५ ॥
आज किती हो उघडीं झालीं हाय गृहें लोकांत ॥
स्त्रिया घरोघर शोकीं बुडल्या स्वजनवियोगें हंत ॥ १६ ॥
अहो जनांनो सुज्ञ जनांनो स्त्रीश्रेष्ठांनो बोला ॥
आदेश नसे महायुगीं या कां कांहीं युद्धाला ॥ १७ ॥
महदवसर हा थांबविणें तीं शक्य नसे कीं काय ॥
याचें उत्तर नाहीं ऐसें धारु तुम्ही जरि हाय ॥ १८ ॥
सोडूं कहनी निजात्मजांना लोकीं या वृक धूर्त ॥
बाल्यापासुनि शिकवूं त्यांना राक्षस व्हाया मूर्त ॥ १९ ॥
स्त्रीजनमहती निरर्थ आयू जाऊं द्या कां सगळें ॥
शांती शांती करीत अेव्हां नर समरालाच वळे ॥ २० ॥

---

# वाणी.

## श्लोक.

वाचे वदावें शुभ सौख्यकारी ॥ आहेत लोकां जगिं कष्ट भारी ॥
रडें जगाला न लगे तुझें हें ॥ कठीण सारा भवमार्ग नोहे ॥ १ ॥
शोधीं स्थळें निर्मल रम्य भावें ॥ कर्णा जगाच्या रमवीत जावें ॥
त्यांच्या कथा सांग सदैव वाचे ॥ कल्याण त्यानेंच घडे जगाचें ॥ २ ॥
ऐकोनियां दुःख कथा जनांच्या ॥ कष्टात्मवार्ता श्रवणीं तयांच्या ॥
जनाऽसमाधान धरोनि कानीं ॥ कंटाळलें हें जग सत्य मानीं ॥ ३ ॥
श्रद्धा मुखें बोलत जा स्वकीय ॥ अश्रांकितवाक्यें शतही त्वदीय ॥
त्वदीय शंकाकथनें अनिष्ट ॥ त्याविण नाहीं जगतास कष्ट ॥ ४ ॥
श्रद्धा प्रभूची जरि पूर्ण भागे ॥ निजात्मविश्वास मनांत वागे ॥
विश्वास हा कोणतिया जनाचा ॥ बोलोनि दावीं जगतीं स्ववाचा ॥ ५ ॥
नाहीं तरी सर्व तुझे विचार ॥ मौनांत ठेवीं बुडवोनि पार ॥
श्रद्धा तुझ्या घे हृदिं जों न जन्म ॥ हो मूक त्यानें न कुणी विषण्ण ॥ ६ ॥
आरोग्य बोला, रचिलें गदांचें ॥ पुराण लोकीं न सरे भयाच ॥
वाजे नतारी शिणवी मनाला ॥ उत्साह आनंद न दे कुणाला ॥ ७ ॥
आहें निरोगी वदनीं वदावें ॥ कांहीं न झालें मजला स्मरावें ॥
ऐकेल हें श्रीहरि शब्द सत्य ॥ सांची खरें तें करितो अगत्य ॥ ८ ॥

# वादाचा निर्णय.

## श्लोक.

युद्धान्त झाला प्रतिकूळ दैवें ॥ प्रवेश जेता करि गर्वभावें ॥
खेंकाळती अश्व नभीं ध्वजांचे ॥ कोंदाटती नादहि दुंदुभाचे ॥ १ ॥
स्थापीत सिद्धांत असाच सत्य ॥ कालान्तरीं तो न घडे असत्य ॥
झाला असे निर्णय योग्य नोहे ॥ तों वाद तैसा अवशिष्ट राहे ॥ २ ॥
हाणोत लत्ता बळि दुर्बलातें ॥ धुळीस रोषें मिळवोत त्यातें ॥
कीर्तिध्वनी एक रवें तयाला ॥ करो महान्यायि भला जगाला ॥ ३ ॥
त्याची स्तुती जे करितीं मुखानें ॥ जागोनि सिद्धांत धरोत कानें ॥
झाला असे निर्णय योग्य नोहे ॥ तों वाद तैसा अवशिष्ट राहे ॥ ४ ॥
घाली जयश्री अरिलागिं माला ॥ पराजिता धैर्य धरीं मनाला ।
अन्याय त्याचा जरि सैन्य मोठें ॥ युद्धा नसे अंत कधींच कोठें ॥ ५ ॥
होतां जशी रात्र घनांधकार ॥ प्रकाश पावे रविचा प्रसार ॥
झाला असे निर्णय योग्य नोहे ॥ तों वाद तैसा अवशिष्ट राहे ॥ ६ ॥
श्रमातियोगें थकल्या जनांनो । वार्धक्यगात्री युवती गणांनो ॥
श्रमोपभोजी अतितप्त जीवा ॥ [1]स्वर्णाधिकारांकित दास किंवा ॥ ७ ॥
बलिष्ठ जे त्यांसह झुंज रागें ॥ अशांत तूं चालवि नैव भागें ॥
झाला असे निर्णय योग्य नोहे ॥ तों वाद तैसा अवशिष्ट राहे ॥ ८ ॥

---

# असा काळ समीप येतो.

## श्लोक.

स्थितींत कवण्या असो मनुज कोणत्याही पदा ॥
असा समय येतसे सहज जीवमात्रा सदा ॥
असौख्यभवभोगिनें स्वमनिं होतसे जर्जर ॥
तथा तरुनि जावयां हृदयिं होत तो आतुर ॥ १ ॥
असा समय येतसे विषयवासना जेधवां ॥
झडोनि, मनें संपदेविषयिं वीट ये त्या जिवा ॥
बहुपकृतिला छिटे चल जगाविषयीं अंतरीं ॥
सुवस्तु नच सांपडे रडत तीजसाठीं परी ॥ २ ॥

---

[1] धनिकांचे गुलाम.

असा समय येतसे सहृय मित्र संगें मही ॥
पथीं सहित राहुनी करिति आपुलें प्रेमही ॥
तरी स्वमनिं उद्भवे प्रबळ आपुल्या कामना ॥
सुवस्तु मिळवावया स्थिरचरा जिची भावना ॥ ३ ॥
असा समय येतसे जवळि राहुनी प्रेमदा ॥
विशुद्ध जगतीं क्षुधा शमविण्यास तृष्णा सदा ॥
तिनेंहि नच आपुल्या विमल तोष चित्ता घडे ॥
असे तळमळी जिवा परम उच्च वस्तूकडे ॥ ४ ॥
प्रमाण नच सांपडे अधिक याहुनी थोरलें ॥
अमर्त्य पद मानवा मिळत अन्य लोकांतलें ॥
विराग धरुनी म्हणे प्रभुपदासि साधावया ॥
तयास न मिळे जगीं कधि तरी समाधान या ॥ ५ ॥

---

# भूतकाल विसरा.

## आर्या.

(या कवितेंत झालेल्या गोष्टी विसरून जाव्या, वर्तमान काळाचा चांगला उपयोग करुन घ्यावा, याचें प्रतिपादन आहे.)

गतकालविदेशाला त्यागुनियां दूर जाउनी राहें ॥
त्याच्या मार्गीं कर्दम [1]शैत्योत्पादक भरोनि उरलाहे ॥ १ ॥
शुष्कोद्यानें त्यांतिल वनें तयाचीं भयाण सर्वांशीं ॥
दृष्टिपथाला येती पडक्या झडक्या [2]समाधिच्या राशी ॥ २ ॥
तद्वत आनंदाची प्राप्ती घ्याया करोनि जो म्हणतो ॥
[3]पाटल पुष्पें त्याचीं माती झालीं असेंच तो बघतो ॥ ३ ॥
त्याच्या विभवनिधीवर धूळ पसरली मलिन तो दिसतो ॥
दुर्मिळ रत्नावरती पुट कीटाचें बसे असें बघतो ॥ ४ ॥
गतकालविदेशांतुनि दूर सरावें पिशाच्चवास्त तिथें ॥
त्याच्या मार्गीं फिरती भ्रमती जन पाहती स्वयें तेथें ॥ ५ ॥
बहुमत आनंदाचा [4]भूतस्वामी दिसे तया मागें ॥
अस्थीपंजर सेना मृत आशांची फिरे तिथें वागे ॥ ६ ॥
सुंदर सरिता वेगें वाहत होत्या प्रशस्त शुद्ध जळें ॥
दिसतीं पल्वल[5] समची निश्चल वारी अनल्प[6] पूर्ण मळें ॥ ७ ॥

---

१ हिमताप आणणारा. २ मृताच्या समाधी. ३ गुलाब. ४ वेताळ. ५ डबकें.
६ पुष्कळ.

दिसती समाधि उज्ज्वल तेजोयोगें करोनि ज्या येथें ॥
दिसति मनोरथ खालीं तरुणपर्णीं भग्न जाहले तेथें ॥ ८ ॥
सोडीं गतकालातें निर्जन एकांत तोच नयनातें ॥
तैसा शुष्क असे तो शीत अती भय उरीं भरी वातें ॥ ९ ॥
ज्योती विझल्या त्याच्या त्याचे इतिहास जाहले जीर्ण ॥
सांप्रतकाळ पहावा नूतन तो उन्नती करी तूर्ण ॥ १० ॥
सांप्रत काळ तुम्हांला नेउनि सोडील शेखरीं गिरिच्या ॥
रविनें धवलित केलीं निजतेजें जीं दयामयें वरिच्या ॥ ११ ॥
आज समाधि न दावी जीवाशातें प्रफुल्ल आज करी ॥
आजचि घेउनि बैसे द्याया तुज पारितोषिक स्वकरीं ॥ १२ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय

---

## नट व नाटक.

( संसारनाटकाकडेही यांतील विचार लागू आहेत. )

### श्लोक.

आहे नटा गुण तुझा बहुमान्य लोकीं ॥ मोठेंच कौशल तुझें नटि ही विलोकीं ॥
शक्ती तुम्हां शिकविण्या सगळया जगास॥पात्रत्व सत्य जरि ये तुमच्या पदास॥१॥
सामर्थ्य मोठें जगिं नाटकास ॥ चालू विचारा बळ द्यावयास ॥
खेळाचिया त्या विषयास साचें ॥ शोभे असो अंतर त्या नटाचें ॥ २ ॥
मनोविकारांस करोनि जागे ॥ बोधावया बुद्धिस लागवेगें ॥
संभाषणीं कीर्तनिं अर्थ नाहीं ॥ चातुर्य मोठें तव त्यांत पाहीं ॥ ३ ॥
कोणी न [1]लेखक असा हलवोनि हातें ॥ दे बोध मार्मिक खरा इतुका जनातें ॥
शब्दें तुझ्याचि चतुरा वर हावभावें ॥ पात्रासवेंच रडतों हंसतों स्वभावें ॥ ४ ॥
नाट्याचिया [2]मागुनि सन्नटानें ॥ मोठें असावें स्वगुणाप्रमाणें ॥
जें सोंग घेतो नट नाटकांत ॥ सुभावना तीच वसो मनांत ॥ ५ ॥
तुवां कोणतेंही जरी सोंग केलें ॥ स्वकीया गुणा उज्ज्वला दावियेलें ॥
तुझ्या रोजच्या वर्तनानेंच पाहें ॥ खरा रंग खेळास येणार आहे ॥ ६ ॥
जगीं झांकिले गुप्त ऐसे विचार ॥ खरे ते बरे मत्सरें युक्त फार ॥
लपोनी पुढें चालती मानवांच्या ॥ कृती हेतुला आक्रमीती तयांच्या ॥ ७ ॥
जगा प्राप्त होणार जो बोध सार ॥ नटें दूषवीला चरित्रें असार ॥
प्रकाशे मती धूमकेतूसमान ॥ पडे जाउनी कोपरां हीनमान ॥ ८ ॥
जरी आवडे कार्य हो पात्र त्याला ॥ खरें योग्य व्हावें नृपें कीरिटाला[3] ॥
गुणाला तुझ्या योग्य हो सर्वकाळीं ॥ वरी पाहण्या लावि आम्हा न खालीं ॥ ९ ॥

---

१ ग्रंथकार. २ इतर व्यवहारांतहि. ३ मुगुटाला.

# कष्टा वांचून सिद्धि नाहीं.

## श्लोक.

कोणी एक गुणी चितारि रचितो चित्रें घरीं साजिरीं ॥
सारा वेळ करी परिश्रम उरीं आस्था धरोनी खरी ॥
कीर्तीमान मिळो जगांत म्हणुनी केले तयानें श्रम ॥
ढुंकोनी परि पाहिलें नच कुणी गेला उडोनी भ्रम ॥ १ ॥
आकाशीं रमणीय रंग दिसती जे जे खरे निर्मळ ॥
त्यांहीं रंगविल्या मनोहर कृती भिंती वरी उज्ज्वळ ॥
लोकांनीं परि पाहिले वरिचरी ते रंगची केवळ ॥
रंगारी मिसळी रसायण, मधें घालोनि साधें जळ ॥ २ ॥
गेला काळ असा, सुखास मुकला प्रेमा जिवीं साधिला ॥
दुःखाच्या गिरिकंदरा उतरुनी गेला पुढें लागला ॥
रेंखाटी पट आपुला पुनरपी नेटें झटे बापडा ॥
उद्योगांतचि शांति सौख्य म्हणुनी चित्रीतसे कापडा ॥ ३ ॥
रंगाचा न पुढें कृतींत उजळा केला तयानें मुळीं ॥
होता पूर्व वयांत जो कुशलता दावावया आगळी ॥
केलें काय जगें ? कृती निरखुनी घाली मुखीं अंगुली ॥
नेत्राश्रमधुनी असे प्रगटली झाली म्हणोनी भली ॥ ४ ॥
कोणी एक कवी विशाल मति ज्या होती प्रभूनें दिली ॥
गातो कर्णमनोहरा कृति रची जो काव्यरत्नावली[1] ॥
लोकांची स्तवनें असंख्य करुनी ठेवी लिहोनी कवी ॥
त्याची लोक नुती परंतु करि ना देती न त्या थोरवी ॥ ५ ॥
प्रातःकाळ जसा तसीच कविता त्याची मना हर्षवी ॥
गाती पक्षि जसे तसी मधुरता काव्यें मना चाखवी ॥
लोकांनीं परि नाहिं योग्य दिधला जो मान द्यावा तया ॥
शब्दाहून विशेष कांहिच नसे काव्यांत वाटे जया ॥ ६ ॥
गेला काळ असा कवी निजमनीं कष्टी असे जाहला ॥
त्याच्या जातिस हा प्रसंग न नवा जाणोनिया लागला ॥
काव्याला झटुनी रचीत कविता-माला पुन्हां सुंदर ॥
दुःखें शांत करावया स्वमनिंची काव्यीं सदा तत्पर ॥ ७ ॥
जीं जीं पूर्ववयीं तयें विरचिलीं काव्यें मधु कोमळ ॥
तैसा त्यांत रसप्रसाद लवही ना सांपडे केवळ ॥
केलें काय जगें ? कवीस दिधला जो मान द्यावा तया ॥

---

१ उत्तम काव्यमाला.

नेत्राश्रूमधुनीच तीं प्रगटलीं आली जगाला दया ॥ ८ ॥
व्हावी कीर्ति जया कलाकुशलतायोगें जगीं उज्ज्वळ ॥
त्यानें भोगुनि कष्ट भोग दिधला कीं पाहिजे प्रांजळ[१] ॥
दुःखें विव्हळ जाहले बहु हृदीं कष्टांस सोसोनि जे ॥
देतें हें जग [२]पारितोषिक तया त्यांना च पृथ्वी भजे ॥ ९ ॥
जे जे लोक सुखी विनम्र बनुनी त्यांनीं जगीं राहणें ॥
ज्या मोठेपण इष्ट संतत तयें वर्षावधी राबणें ॥
नेत्राश्रूवरुनी बघे जग खरें लोकीं कला कौशल ॥
त्याच्या पासुनि धन्यता मिळविण्यापूर्वी धरावी कळ[३] ॥ ११ ॥

---

## अविश्वास.

### श्लोक.

सांगे न विश्वास करीं दुजाचा ॥ त्याचाच विश्वास धरीं न साचा ॥
घे तो लघू माप निजा जिवाचें ॥ त्यानेंच मोजी सकळांस साचें ॥ १ ॥
वर्णीत जो मानव नीच लोकीं ॥ कापट्य त्यांच्या भरलें हृदीं कीं ॥
[४]हृद्दर्पणीं त्या नरपामरातें[५] ॥ त्याचेंच भासे प्रतिबिंब त्यातें ॥ २ ॥
संसार सौख्यामृत ज्यास होतें ॥ दुःखें जहालें विषरूप त्यातें ॥
नेत्रीं न पाणी रसनेस[६] गोडी ॥ त्याची करीं कींव तयास सोडीं ॥ ३ ॥
प्रेमामृताचें भय ना धरावें ॥ स्नेहामृत प्राशुनि पुष्ट व्हावें ॥
माधुर्य त्यांचें मज वर्णवे ना ॥ तदंतरीं ना विष सत्य माना ॥ ४ ॥
ठेवोनि सद्दृष्टि जगीं रहावें ॥ सत्या तद्वा त्वां च सुखें पहावें ॥
संदेह-संदेह धरींच खास ॥ शंकाचि शंकास्पद साधकास ॥ ५ ॥

---

## दया माउली.

### श्लोक.

मदीय हृदयांतुनी प्रगट सत्य आजीं घडे ॥
स्वयें प्रभु मला पुढें करुनि सांगतो चोखडें ॥
कदा हरित ना हरी जगतिं एकही वस्तुला ॥
दिल्याविण तिच्याहुनी अधिक अन्य कांहीं तुला ॥ १ ॥
असे नियम हा दयामय खरोखरी प्रेमळ ॥
वयांत पहिल्या मला न कळला कधीं प्रांजळ ॥

---

१ शुद्ध. २ बक्षिस. ३ धीर. ४ हृदयाच्या आरशांत. ५ दुष्टाला. ६ जिभेला

घडे मजसि हानि तैं खळखळां रडोनी जळें ॥
भरा भिजविली अहा असुखि होउनी आंघोळ ॥ २ ॥
धनादि गत संपदेविषयिं कष्ट झाला उरीं ॥
दरेक समयीं परी सकळ शोक गेल्यावरी ॥
सखेद मम अंतरा त्वरित लाभला शुद्ध तो ॥
प्रमोद, न च मागतां सहज कल्पनातीत तो ॥ ३ ॥
प्रकार घडती असे सहज वाटलें मानसीं ॥
परी शिकवि काल हा मजसि सत्य गोष्टी असी ॥
तिळापरिस वस्तु ही मम न नाश पावे परी ॥
दुजी खचित येउनी मिळतसे मला सत्वरीं ॥ ४ ॥
खरा नियम पूर्ण हा कधि न थोरला भंगतो ॥
धरोनि मम अंतरीं अढळ जीव विश्वास तो ॥
मदीय हृदयीं यदा विमल हर्ष तो संचरे ॥
तदा क्रमित काल मी अतुल शांतिधीरान्तरें ॥ ५ ॥
नसे मजसि काळजी जरि मला महासंकटीं ॥
घडे दडपिलें भवीं क्षणभरीं तया रानटीं[1] ॥
उभी तरि दिसे मला जवळची दया माउली ॥
प्रसाद वर[2] द्यावया नव करावया सांउली ॥ ६ ॥

---

## जग चांगलें होत आहे.

### श्लोक.

वाढे माझें वय तसतसें होतसे ज्ञान मातें ॥
दृष्टी माझी [3]विशद दृढता येतसे मानसातें ॥
अन्यायाच्या बहळ[4] तरुच्या खालतीं मूळ आहे ॥
न्यायाचें ही सबळ बहुधा वाढतें नित्य राहे ॥ १ ॥
सर्वा दुःखांमधुनि असतो नेमिला हेतु कांहीं ॥
दुःखी कष्टी अशांति न तया येत हा तर्क पाहीं ॥
रात्री होतां खचित रवि तो जेंवि आणी प्रभात ॥
आहे जें जें सकळ बरवें सत्य तें तें जगांत ॥ २ ॥
रात्री जैसी पसरित तमा भूवरी निश्चयानें ॥
ठावें आहे मजसि सकला पापकर्मान्तरानें ॥

---

१ दांडग्यांनीं. २ श्रेष्ठ. ३ स्पष्ट. ४ विस्तीर्ण.

शिक्षा कोठें कशि तरि घडे सर्वही प्राणियांला ॥
गेला गेला जरि निघुनियां काल दीर्घावधीला ॥ ३ ॥

[1]तोषाभावें निज हृदयिंच्या केधवां केधवां तें ॥
जीवा साह्य प्रगट घडतें वृद्धि पावावयातें ॥
मोठें होणें जगति म्हणजे भोगणें कष्ट साचें ॥
आहे जें जें सकळ बरवें सत्य तें तें जगाचें ॥ ४ ॥

मोठी आहे प्रभुकृति शिवा शाश्वती विश्व सारें ॥
तीच्या मध्यें वसत न कुठें व्यंग वा न्यून बा रे ॥
साऱ्या वस्तू मिळुनि करिती कार्य लोकी उदंड
साधायातें वर जनहिता उत्तमातें अखंड ॥५॥

शोधायातें [2]ध्रुवपद बळें जावया मोक्ष धामीं ॥
आत्मा माझा वरिंवरि यदा धांवतो तेधवां मी ॥
पाहोनीयां वरुनि परतें तत्व सांगेन शुद्ध ॥
आहे जें जें जगति बरवें धन्य तें तें विशुद्ध ॥ ५ ॥

---

# जीवन मारवाडी आहे.

## श्लोक.

आहे जीवन हें [3]कदर्यु पुरतें तें मारवाडी खरें ॥
देतें सौख्य नरा तयावरि सदा घे चोपुनी व्याज रे ॥
त्याच्या हातुनि ना सुटे चिकट तें अर्थास धाया जना ॥
आम्हाला उसनेंहि देत परतें केल्याविना सोय ना ॥ १ ॥

बुद्धी सद्गुण अर्थ लाभ झटुनी जीं जीं जगीं साधिती ॥
द्यावा भोग तया विशेष पडतो कांहीं तरी निश्चिती ॥
रात्री मागुनि येतसे दिवस कीं ऐसें असे निश्चयें ॥
केल्यावीण शरीरकष्ट पुरता आनंद होतो नये ॥ २ ॥

प्रेम द्वेष सुभक्ति मत्सर जगीं यांतून जें जें दिलें ॥
देवाला मनुजा पशूस अथवा अन्याहि जीवा भलें ॥
तें तें येउनियां मिळेल परतें केव्हां कसें ही जना ॥
नोहे व्यर्थ मनोविकार कधिंही कर्मा असे नाश ना ॥ ३ ॥

आहे रीत जगांत रोकड दिसे देवाण घेवाण ही ॥
अर्पी सौख्य बरा तुम्हांस सदया ती शुद्ध बुध्या मही ॥
नाहीं फेड परी तुम्ही लवकरी केली तियेची जरी ॥
टाकी ती तुमच्या [4]हिशेब खरडा सव्याज अंगावरीं ॥ ४ ॥

अत्यांनंद यदा भरेल हृदयीं रोमांच आणीतसे ॥
भोगावा मित तो स्मरें उपकृती ध्यानांत ठेवीं असें ॥
द्यावें लागत व्याजही तुज पुढें कालान्तरानें इथें ॥
वर्षी श्रावण नाहिं जेथ न कुठें पौषा ठिकाणा तिथें ॥ ५ ॥

---

१ असंतोषानें. २ अढळपद, ईश्वरपद. ३ कृपण. ४ व्याजासह बिल.

# विपत्ति.

## श्लोक.

तुला [1]मदरि मानिलें सुचिर आपदे सुंदरि ॥
कठोर मुख ठाउकें स्मित तुला न पर्वा उरीं ॥
कळें मजसि सत्य ना मुख तुझें पुढें या दिसे ॥
अनिंद्य मम मित्र तूं जगतिं निष्कलंका असे ॥ १ ॥

बळें तवचि वाढलों बहु समर्थ झालों महीं ॥
विचारगति वाढली भिडत थेंट नाकास [2]ही ॥
कठोर वचनें तुझ्या चढविलें गिरीच्या शिरीं ॥
त्वदाग्रह बळें बळें करवि कर्म या भूवरीं ॥ २ ॥

तुझें मुख न फुंकितें ठिंणगि सान जीवाग्निची ॥
विझोनि तरि जाति ते प्रखरता न होती तिची ॥
प्रतोद नसता तुझा पडुनि आळसीं राहतों ॥
स्वशक्ति न च मी कदा इतुकि योजुनी पाहतों ॥ ३ ॥

जिवावरति माझिया नसति खष्ट सत्ता जरी ॥
निराश तरि होउनी वसुनि राहतों मी घरीं ॥
निजात्मखनि खोल ही खणुनि पाहतों ना कदा ॥
अखंड भरली तिथें मिळति ना मला संपदा ॥ ४ ॥

विभिन्न पथ आपुले इथुनियां जरी जाहले ॥
दिसेल मुख या पुढें तव न हें कळे चांगलें ॥
त्वदर्थ रचितों कवी कुसुममालिका सुंदर ॥
तुला इतर ओळखो परम मित्र मानो नर ॥ ५ ॥

---

# सफळ प्रार्थना.

## श्लोक.

धन प्रभुसि याचिलें, त्वरित सिद्धि झाली मला ॥
जिथें स्वकर घातला, कनकलाभ झाला भला ॥
स्वशांति परि मोडली, अधिक काळजी वाढली ॥
मदीप्सित यदा करी सफळ तो हरी माउली ॥ १ ॥

---

१ माझी शत्रु. २ स्वर्गास.

प्रभो मजसि कीर्ति दे म्हणुनि आळवीलें यदा ॥
स्तुती जगति पेकिली मम लहान थोरीं तदा ॥
सुकीर्तिसह येउनी भिडती कष्ट नाना जनीं ॥
मला दडपिलें तर्यी न च सुखीजह्मालों मनीं ॥ २ ॥
पुढें प्रभुसि चिंतिलें, त्वरित प्रेमही लाभलें ॥
भरे नखशिखान्त तें, स्थिर हृदीं सर्वे राहिलें ॥
उरीं भडकली परी प्रखर आग खाया तया ॥
न कांहि उरलें विना तनुसि डाग दावावया ॥ ३ ॥
प्रभूसि मग याचिलें मजसि देइं संतोष तो ॥
प्रकाश झटिती तमोमय जिवांत विस्तारतो ॥
मला परम शांतिचा घडत लाभ आलें बळ ॥
स्पृहा प्रथम कां अशी मज न जाहली उज्ज्वळ ॥ ४ ॥

---

# जीव अमर आहे, दुःखाचें प्रमाण.

## श्लोक.

मोठा या जगतीं [1]सहिष्णु नर जो दुःखास भोगीतसे ॥
आहे या वरुनी खरा अमर तो सिद्धान्त मोठा ठसे ॥
दुःखें दारुण सोशितों किति तरी आम्ही बरें भूवरीं ॥
सोसे वेग न केवला नरमना [2] मी निश्चयो हा करीं ॥ १ ॥
लाटा दुर्धर सिंधुच्या थडथडा वाहोनियां फोडिती ॥
धक्के कृत्रिम बांधिले चतुरशा [3]शिल्पीवरांनीं किती ॥
देवानीं रचिल्या तटांत वसतें सामर्थ्य सोसावया ॥
लाटांच्या धडका बळें झगडुनी स्वास्तित्व राखावया ॥ २ ॥
आम्ही मंदिर बांधितों श्रमुनियां ठेवोनियां दक्षता ॥
झंझावात तया पळें धडधडां पाडीतसे बोलतां ॥
मोठा वृक्ष वनीं असे उगवला भूमीवरीं वाढला ॥
त्यानें वांकविला जरी क्षणभरीं नोहे कदा भंगला ॥ ३ ॥
जीवाचें जरि मूळ ना उगवतें [4]ईशावनीभीतरीं ॥
होते मह्य न कष्ट त्या जगतिचे रेटे चपेटे तरी ॥
माझ्या या हृदया विदारण करी जें दुःख घोरान्दर[5]॥
तेंची निश्चय अंतरीं दृढ करी सातत्य[6] जीवा चिर ॥ ४ ॥

---

१ सोसिक. २ मानुषी मनाला. ३ शिल्पशास्त्रवेत्त्यांनीं. ४ ईश्वररूपक्षेत्रांत.
५ भयंकर. ६ संतत अस्तित्व.

# आशावाद.

## आर्या.

सुधारणेच्छु मच मा कारण जगतीं मला प्रकाश दिसे ॥
अंधःकारापेक्षां अधिक इथें तो भरोनि राहतसे ॥ १ ॥
चपला दृष्टी मजसीं दिसते अरुणप्रकाशपूर्वछटा ॥
अवलोकाया असमय-वृष्टिनिदर्शक सुमंद मेघघटा ॥ २ ॥
सौंदर्य गुलाबाचें सुगंध माझ्या मनास हर्षविती ॥
त्याच्या कांट्याविषयीं परंतु लेश न विचार मज शिवती ॥ ३ ॥
निर्मल गान पिकाचें माझ्या कानीं भरोनि चिर घुमतें ॥
घूकांचे घूघू रव ऐकूं येती परंतु विस्मर ते ॥ ४ ॥
जीवन म्हणती कोणी केवळ दुःखप्रवाह भासतसे ॥
त्यांत मला सांपडतो हर्ष निराशातमांत राहतसे ॥ ५ ॥
चिंता निर्माल्य असे आनंदाची खरोखरी महती ॥
दोषाहुनि अधिक बरें मानवमात्रांत सांपडे जगतीं ॥ ६ ॥
प्रेमा उजळी ज्योती अधिक विझवीत त्याहुनी द्वेष ॥
जग जात पुढें जैसें तैसा होतो जनोन्नतीपोष ॥ ७ ॥

---

# जग चांगलें व वाईटही आहे.

## श्लोक.

चाले स्वमार्ग पद वाजवितां न साधू ॥ पृथ्वीस कांपवि भरें तुडवी असाधू ॥
मी ऐकतों रड सदा जन बोलतात ॥ रात्रंदिनीं घडतसे जग दुष्ट हंत ॥ १ ॥
आहे खरें न अतिशांत पदें जगांत ॥ मौनेंच पुण्य वरि पेरित बीज जात ॥
आतें ध्वनी करित पातक दुंदुभीचा ॥ होतो प्रतिध्वनि सदा जगि घोर त्याचा ॥२॥
पृथ्वी असे फिरत संतत अंतराळीं ॥ तेजोनिधी रवि सभोंवतिं सर्वकाळीं ॥
नाचे तसेंचि विभुसूत्र[1] महाजवानें [2]॥ होते सुसंस्कृत खरी नरजाति त्यानें ॥ ३ ॥
संचार गोंधळ करीत असत्य आहे ॥ सत्याहि होत परिपाक उदंड राहे ॥
[3]भूताहुनी शत गुणें वर वर्तमान ॥ पूर्वीहुनी नर उदंड विचारवान ॥ ४ ॥
पाहोत सत्य जन हें सगळया जगांत ॥ संचार पाप करितें तुटक्या रथांत ॥
तारे जसे चढत पुण्य वरीं वरीं तें ॥ रात्रंदिनीं जग बरें बरवेंच होतें ॥ ५ ॥

---

१ ईश्वराची योजना. २ मोठ्या वेगानें. ३ भूतकाळापेक्षां.

## आत्मश्रद्धा.

### आर्या.

प्रत्यक्ष प्रभुवरती श्रद्धा व्हावी तुझी जसी जितुकी ॥
निजात्मशक्तीवरिही ठेवावी स्वांतरीं तसी तितुकी ॥ १ ॥
प्रभुसंभव जीव असे तोची तेजःस्वरूप शर्वाचें[1] ॥
शक्ती अनंत वसती त्याच्यामध्यें न भान तुज त्याचें ॥ २ ॥
आहे अगाध उदधी अझुनी त्याचा न लागला अंत ॥
तैसा तव जीवाच्या महाबलाचा न लाधला प्रांत ॥ ३ ॥
मौनें मानसनौका धांवो रत्नाकरोदरीं शांत ॥
जा जा शोधित त्यातें घे इच्छा [2]मार्गदर्शिका सहित ॥ ४ ॥
सांवरि ते तीच तुला आंवरि सारे मनोविकार बळी ॥
तेची अनुकुल वारे प्रेरिति नौका त्वदीय खोल जळीं ॥ ५ ॥
मर्यादा स्वबलाला घाली ऐसा बली कुणी नाहीं ॥
ईश्वरनिजशक्तिवरी धरितां श्रद्धा खरोखरी पाहीं ॥ ६ ॥
लभ्य न झाली मर्त्या सिद्धि अशी आपुल्या करीं येते ॥
[3]आनंदयशोर्थाच्या खाणीचें अधिपतित्व ही पुरतें ॥ ७ ॥
अद्यावधि कोणीही चढलें न च ज्या गिरीवरीं पुरतें ॥
नरवर अंतीं कोणी नेटें जाइल चढोनि त्या वरते ॥ ८ ॥
वाट किमर्थ दुजाची पाहसि आत्मप्रभाव जाणाया ॥
स्वयें न कां तूं चढसी बांधीं कंबर बळें वरीं जाया ॥ ९ ॥

## पुनर्जन्माचें कारण.

### श्लोक.

आयू थोडें खचुनि भरलें दुःख या मानवाला ॥
भोगायाचें बहुत दिसतें पार नाहीं तयाला ॥
दैवी द्यावी मनि विभुचिया सर्व ऐश्वर्यखाण ॥
याला मोठें मुळिच न लगे अन्य कांहीं प्रमाण ॥ १ ॥
व्हावें लोकां असुख विभुला वाटतें गोड काय ॥
त्यांना जें जें चिरडुनि भरें भाजुनी नित्य खाय ॥
यात्रा होतां क्षणिक पुरती शेवटीं देहपातें ॥
अन्यां लोकां विशुचि बनुनी केवि ते जीव जाते ॥ २ ॥
थोडे आयू किति तरि किती वेदना घोर त्यास ॥
द्यावा लागे म्हणुनि दुसरा जन्म ही मानवास ॥
जीवांमध्यें तनु विरचिली मृत्तिकेची तिच्यांत ॥
[4]वैषम्यें जीं सकळ झडुनी साम्य व्हावें तयांत ॥ ३ ॥
जीवात्मा जें मम दडपुनी जातसे दुःखभारें ॥
टांके सारे हृदि खिळखिळे कांपताती शिरा रे ॥
मद्विश्वासा प्रबळ करिते बुद्धि माझी विचारें ॥
हेतू तेव्हां प्रगट कळती ईश्वराचे मला रे ॥ ४ ॥

---

१ ईश्वराचें. २ वाटाडीण. ३ आनंद, यश आणि अर्थ, यांची खाण. ४ विशुद्ध. ५ विषमपणा.

# प्रेमच ईश्वर आहे.

## श्लोक.

जें जें निर्मल रम्य शुद्ध जगिं या प्रेमा तयाच्या घरीं ॥
प्रत्येका मनुजान्तरीं वसतसे त्याचीच सत्ता खरी ॥
अल्पांशें जरि अंतरीं प्रगटलें उत्कर्षही पावलें ॥
जें राहे चिर काल सत्य कथितों केव्हां न जें लोपलें ॥ १ ॥
त्याला भंग नसे नसे लय तया देहान्त झाला जरी ॥
काळातें हि अभेद्य तें अमर तें कल्पान्त झाला तरी ॥
जीवांचा झगडा चढोनि वरती जातां सदा जो घडे ॥
वांचे मी जितुका मला अधिक तो पाहावया सांपडे ॥ २ ॥
पाहोनी नयनीं मदीय हृदयीं हें सत्य जागावलें ॥
विश्वाधार मला विशंक कळलें तें प्रेमची जाहलें ॥
सीमा नाहिं चहूंकडे पसरलें विश्वांत तें कोंदलें ॥
त्याचें नांव मुनीश्वरीं बदलुनी देवेश ठेवीयलें ॥ ३ ॥
भूतें जन्मति भूवरीं प्रथमचि वा जन्मजन्मान्तरीं ॥
ज्यांना भास्कर निर्मितोचि अथवा शक्ति स्वयें साजिरी ॥
मोठ्या प्रेमनिधींतुनी चमकती एकेक दीप्ती असे ॥
राहे गुप्त तदन्तरीं जळत ती हें सत्य मानें दिसे ॥ ४ ॥
गेलीं हीं भुवनें अनंत झडुनी तारे निमाले जरी ॥
ही ज्योती निजतेज युक्त भिरवे जाते न कल्पान्तरीं ॥
हीचें रूप बघोनियां मुनी खरे वेडावले स्वान्तरीं ॥
सारें बाहिर शोधितें जग तिला ती प्राप्त नाहे तरी ॥ ५ ॥

---

# कलियुगाचा दोष.

## श्लोक.

मोठा दोष कलौ जगीं जन करी कर्मांमि वेड्यापरी ॥
जाया ते उडुनी खगासम पदं जे आक्रमावे गिरी ॥
शक्ती वेंचुनि साहसें निजमनश्चातुर्यकृतीमुळें॥
काला जिंकुनि युक्तिनें असमर्थी सिद्धींस जोडी खुळें ॥ १ ॥
आहे साध्य करावया उचित जें साठीं न त्या थांबती ॥
होतांची अरुणोदय प्रखरता मध्यान्हिची शोधिती ॥
होते पूर्वज आमुचे करित ते प्राचीन काळीं जसें ॥
तैशा उद्यमसंग्रहार्थ लवही आनंद त्यांना नसे ॥ २ ॥

उत्साहें करितों अकालिं झटुनी ते पाटलांचे [1]मळे ॥
कंठीं माळ धराबया फुलवितों पुष्पें तयांची वळें ॥
आतां दुर्मिळ कां विदोष कलिका लाधे न ती साजरी ॥
याचें कारण काय हो म्हणुनियां साश्चर्य पृच्छा करीं ॥ ३ ॥
व्हावा लाभ गमे मनीं परि नको उद्योग वाटे जना ॥
व्हावें त्यास न पारितोषिक परी द्यावें कुणी आंदणा ॥
जातो काळ निरर्थ या तळमळींमध्यें किती बाष्कळ ॥
येतीं जंगल तोडितां उठवितां प्रासाद ही पुष्कळ ॥ ४ ॥
वांछी अर्थ घडो मनीं मिळविण्या भीती धरोनी बसे ॥
इच्छी कीर्ति मिळो जगीं, भय परी युद्धार्थ पोटीं वसे ॥
झाला दुष्परिणाम एकचि असे पापें जगीं वाढलीं ॥
झाली मानसशक्ति मंद सगळी नीती बुडाली जलीं ॥ ५ ॥
पूर्वीची श्रमपद्धती शतगुणें होती खरी चांगली ॥
वर्षाचा करुनी हिशेब बघती अत्यल्प सिद्धी भली ॥
शक्ती वेंचितसों मनोबल उगें युक्तिप्रयुक्तीमधीं ॥
साधाया सुख धांवतों श्रमुनि जें संपादिलें ना कधीं ॥ ६ ॥

---

# प्रेमाष्टक.

## श्लोक.

प्रेमा असे कार्य विशुद्धतेचें ॥ प्रेमा खरें लक्षण पूर्णतेचें ॥
प्रेमा महाशक्ति अतर्क्य आहे ॥ प्रेमा प्रभूचें निजरुप पाहें ॥ १ ॥
आकर्षितें प्रेम चराचरातें ॥ प्रेमा करी एक कणाकणातें ॥
प्रेमें असें विश्व अभंग चाले ॥ प्रेमें शशीसूर्य नभांत हाले ॥ २ ॥
प्रेमोद्गमें स्वार्थ लयास जाय ॥ समर्थ होती अबलां सहाय ॥
श्रीमंत साधी [2]अधनावनाते ॥ ज्ञानी शहाणे करिती जगातें ॥ ३ ॥
प्रेमें न लोकीं मतभेद राहे ॥ प्रेमा विरोधा शमवीत आहे ॥
प्रेमा बघे केवळ सद्गुणांश ॥ दोषैकदृष्टी नच निर्मळास ॥ ४ ॥
प्रेमें कुटुंबीं सुखशांति नांदे ॥ प्रेमें जगीं वर्तति लोक साधे ॥
प्रेमा महोत्कर्ष करी जगाचा ॥ प्रेमा प्रभूचें पद देत साचा ॥ ५ ॥
प्रेमेंच पावित्र्य दिलें सतीला ॥ प्रेमेंच पूज्यत्व असे पतीला ॥
प्रेमा बळें सर्व जगास बांधी ॥ तोडीतसे प्रेम जगीं उपाधी ॥ ६ ॥
प्रेमास ओली [3]निजभावनाच ॥ प्रेमा असे सात्विक वृत्ति साच ॥
प्रेमेंच वाढे जगतांत प्रेम ॥ ऐसें मुनी सांगती सृष्टिनेम ॥ ७ ॥

---

१ गुलाबांचे बाग. २ दीनरक्षण. ३ आपलेपणा.

प्रेमें जगीं सयश जोडितातीं ॥ निष्काम कर्मं वलि थोर हातीं ॥
प्रेमेंच जिंका भुवनत्रयाला ॥ प्रेमें न कोणा भवबंध झाला ॥ ८ ॥

---

## गुण घ्यावेत.

### श्लोक..

जगीं दोष काढूं नको मानवांचे ॥ जरी आढळे. व्यंग कांहीं तयांचें ॥
धरावी दया अल्पसें अंध व्हावें ॥ तया अंतरींच्या गुणातें पहावें ॥ १ ॥
तमें व्यापिल्या घोर रात्रींत देखा ॥ प्रकाशाचिया लान आहेत रेखा ॥
बरें शोधुनी काढणें तारकांचें ॥ परी पाहणें डाग ना भास्कराचे ॥ २ ॥
जिवाचे झरे वाहती सर्वदाही ॥ महेशान्तराच्या नदीच्या प्रवाहीं ॥
तिच्या रोधनीं वेंचि ना बाहुसार ॥ गती पालटाया तिची ना विचार ॥ ३ ॥
अभिशाप देवूं नको या जगाला ॥ तुझ्या वर्तलें पूर्वि वागो मनाला ॥
नको क्षुद्र तूं तोंड देऊं तुफानीं ॥ शिरा वांकवीं जाउं द्यावें वरोनी ॥ ४ ॥
कदा योजना विश्व मोठी करी ना ॥ चलेच्छानुसारें तुझ्या वर्ततें ना ॥
चिरंजीवनीं वांकडें होत कांहीं ॥ तुला सत्वरीं हें कळो सत्य पाहीं ॥ ५ ॥
अनंतासवें भांडणें मौर्ख्य आहे ॥ अशा संगरीं तूं पराभूत पाहें ॥
अजेच्छा तशीं वागतातीं शहाणीं ॥ धरी रुप पात्रापरी जेविं पाणीं ॥ ६ ॥

---

## खरी योग्यता.

### श्लोक.

जीवौघ हा वाहत संथ आहे ॥ आनंद तेव्हां सकळांसि राहे ॥
माथां पडे संकट कष्ट घोर ॥ हांसेल तैं तोचि मनुष्य थोर ॥ १ ॥
जीवीत तों दुःखपरंपराची ॥ दुःखें घडे पारख अंतराची ॥
लोकस्तुतीला स्मित पात्र होतें ॥ अश्रूदकानें झळके सदा तें ॥ २ ॥
बाह्यान्तरंगीं नच पापगोडी ॥ मोहीं नराला न कुणीहि पाडी ॥
उन्मार्ग व्हाया नच लोभ जेव्हां ॥ सोपा जगीं धूर्तपणाहि तेव्हां ॥ ३ ॥
सोनें परी हीन तया गुणाचें ॥ अग्नीमधें तापविलें न ज्याचें ॥
सन्मान पृथ्वीवरि तोचि पावे ॥ स्वाधीन कामा करि जो प्रभावें ॥ ४ ॥
शक्ती न संसार-रणांगणांत ॥ जे पाप खेदा करिती जगांत ॥
गर्दी अशांची भुवनांत झाली ॥ पृथ्वी कसे दुर्बळ पुत्र व्याली ॥ ५ ॥
कामास जिंकी गुणि सत्य जाणें ॥ जो शोक नेटें दडपी स्मितानें ॥
त्यालाच सन्मान जगांत लाधे ॥ थोडे असे साधु पवित्र साधे ॥ ६ ॥

# कालावधि.

( कालावधीची जरुर आहे. कालावधीनें जीवास लाभ होतो. उतावळीनें कार्य होत नाहीं, वगैरे विचार या कवितेंत आहेत. )

## साकी.

कीर्ति वरितसे कालेंकरुनी योग्य बली मनुजाला ॥
दुर्जन गेला थोर पदा जरि पळभरि मोठा झाला ॥ १ ॥
कालावधिनें सद्गुणमंडित उच्च पदा पावेल ॥
दुर्लक्षित तो पोकळ ढोंगी पूर्व पदीं घसरेल ॥ २ ॥
संधि कशाची कसली नियती प्राक्तन वा दुर्दैव ॥
कार्यें करिती धीरधृतीनें त्यांसचि दयालु दैव ॥ ३ ॥
दैवी दुःखें जगतीं सारीं कालें फळ देणार ॥
सन्मार्गाच्या कष्टापरतें श्रेष्ठ नसे दातार ॥ ४ ॥
जागरणाच्या रात्री भाल्यापरि टोंचिति जे दिवस ॥
कष्टी जीवा क्षीण मनाला देती सुखशांतिरस ॥ ५ ॥
हर्ष असे तो निरर्थ करितो अंतीं क्षीण नराला ॥
शोक परी दे उज्ज्वल कालेंकरुनी लाभ तयाला ॥ ६ ॥
कालेंकरुनी रहस्य सारें सृष्टीचें समजेल ॥
शोध करीतां हृदयीं तुमच्या सत्य रवी उगवेल ॥ ७ ॥
अनुदित हेतू सर्व मनाचे कांहीं वर्षाअंतीं ॥
अन्या कळती प्रगट बनोनी सिद्ध हि कालें घडती ॥ ८ ॥
प्रेमाची वर यथार्थ महती मनुजा कळली नाहीं ॥
कालावधिनें प्रेमोद्धिला प्रेमें भरती पाहीं ॥ ९ ॥
शाश्वत विशाल विभुच्या विश्वीं प्रमाद गणितीं नाहीं ॥
प्रेमाची खरि महती त्यांतचि समजेल तुला पाहीं ॥ १० ॥
धनावांचुनी वितरीं प्रीती मूल्य न मोजीं तीचें ॥
ऐशी सुंदर वस्तु कदा ही नाश न पावे वेंचे ॥ ११ ॥

---

# कालाचा तडाका.

## श्लोक.

ज्यांचा ना इतिहास कोणि लिहिला कोणी न ज्यां पाहिलें ॥
कालाच्या जठरांत शांत पडुनी ऐसे मुनी राहिले ॥

ज्यांचें ज्ञान अगाध पाहुनि ऋषी ही लाजते शाहणे ॥
ज्यांची कीर्ति महोज्ज्वला पसरती स्वर्गास येतें उणें ॥ १ ॥
सत्तेच्या करितां प्रयत्न सगळे कैसे खुळे वाटती ॥
बुद्धाच्या सकला विशाल कृति ही कैशा भिकारी अती ॥
सोडोनी जग हें बळें निसटलों स्वर्गास गेलों जरी ॥
मागें राहत नाहिं कांहिं घटिका एकाहि झाल्यावरी ॥ २ ॥
कांहीं राहत नाहिं शाश्वत टिके आकाश हें केवळ ॥
रानीं पाडितसे समूळ तरुतें वायू महातुंबळ ॥
मोठाले नग सोडुनी निजनिज स्थानांस कालान्वयें ॥
अज्ञातोदधिच्या तळीं लपविती उत्तुंग डोकीं भयें ॥ ३ ॥
ही पृथ्वी स्वशिरास हालवुनियां मागें पुढें कांपुना ॥
मोठालीं नगरें सपाट करिते एक क्षणार्धांतुनी ॥
जेथें सागर गर्जतो लटलटां प्राणी जना कांपवी ॥
तेथें घोर दऱ्या भयंकर पशुव्याघ्रादिकीं व्यापवी ॥ ४ ॥
येथें शाश्वत शक्ति वांचुनि नसे राहात कांहीं मुळीं ॥
दुःखी सागर थांबवी वटवटी गेला सुकोनी बळी ॥
मोठाले नद कोरडे पडुनियां कीं वाहती वांकडे ॥
आकाशांतुनि तारका झडुनियां झाले तयांचे सडे ॥ ५ ॥
नाशा पावति कल्पना जगविंचा लोपेल सद्धर्म ही ॥
मोठें वैभव आमुचें असुखही जातें लयाला मही ॥
सारें लापतसें अरी प्रबळ कीं सन्मित्र जाती खरे ॥
ब्रह्मांवांचुनि नाहिं राहत दुजें ज्या नाम ना ग्राम रे ॥ ६ ॥
उत्पत्ती करि शक्ति त्याच विभुची ती राहते केवळ ॥
कोणाला नच जी वळे अकळ जी, अव्यंग जी सोज्ज्वळ ॥
जिंकाया नच शक्य जी, अढळ जी, जी शाश्वता सुंदरी ॥
प्रेमें सृष्टि रचीत ती सकळ या विश्वचिया अंतरीं ॥ ७ ॥
नाशी मागुति निर्मिते पुनरपी मोडी घडी ही बया ॥
कर्में जीवगणां पदा चढविते सिद्धत्व त्या द्यावया ॥
मर्त्यां मागुनि देव निर्मिल पुढें ही आधशक्ती खरी ॥
राहे ती इह शाश्वता करितसे लीला विचित्रा करीं ॥ ८ ॥

# इच्छाशक्ति.

## श्लोक.

इच्छाशक्ति जिवांत दिव्य भरली मेरूहुनी निश्चळ ॥
आत्म्याची ध्रुव शक्ति ती प्रबळ ती सन्निश्चयो उज्ज्वळ ॥
दैवादैव हि बापुडें तिजपुढें जोडोनि राही कर ॥
झाले मानवदेवनागमुनि ही तीचे खरे किंकर ॥ १ ॥

मोठी शक्ति विशाल एकचि असे जी दुर्जया दांडगी ।
सर्वां टेंकविते करा निजबळें ती सर्वदा भांडगी ॥
पात्रीं धांवतसे नदी झरझरां भेटावया सागरा ॥
तीचा वेग धरावया न च बली कोणी त्रिलोकीं खरा ॥ २ ॥

किंवा सूर्यरथा पथीं अडविता ऐसा न कोणी बली ॥
चंद्रातें उडुनी धरी निज करीं शक्ता असे कोठली ॥
जीवात्मा करि साध्य तें सकळ ही ज्या पात्र तो जाहला ॥
मूर्खांनीं जरि दैव दैव म्हटलें त्याची न चिंता मला ॥ ३ ॥

दैवाचा नर तोचि हेतु मनिंचा कांहीं न केल्या ढळे ॥
एकीं लागुनि राहिलें मन सदा लक्ष्यावरी ना चळे ॥
मृत्यूचें असल्यापुढें भयद ही कांहीं न चाले अहा ॥
भीष्में मास सहा तया बसविलें इच्छा बलिष्ठा महा ॥ ४ ॥

---

# भवभार.

## श्लोक.

मदीय प्रभो दुर्दशा कोण पाहीं ॥ जगीं घोर दुर्दैव याहून नाहीं ॥
शिरीं भार वाटे, न जीवास शांती ॥ नसे माय वा स्त्री सती तोषदा ती ॥ १ ॥

जशी वायुनें क्षुब्धता सागरातें ॥ शिरा तापवी क्षोभवी अंतरातें ॥
सचिंताभयें अग्निनें देह पोळे ॥ भवाच्या श्रमें शीण होवोनि लोळे ॥ २ ॥

जगीं जीभ काढोनि मोठया रवानें ॥ करीं लोकनिंदा बळें धाडसानें ॥
लपोनी भयें लाजुनी ऐकतों मी ॥ तनू आंतुनी तापली रोमरोमीं ॥ ३ ॥

प्रयत्नें असे पेरिलें भूविभागीं ॥ तया भोगितों शांत्यभावें अभागी ॥
असे कीर्तिची लालसा थोर पोटीं ॥ स्त्रियेचीच निःसत्यता येत मोठी ॥ ४ ॥

# माझें स्वामित्व.

## श्लोक.

संपादिलें म्यां मम तेंच सारें ॥ झडोत पानें उलथोत तारे ॥
कोणी कमी त्यांत करी न कांहीं ॥ तें चोरुनीयां कुणि नेत नांहीं ॥ १ ॥
तें आजि गेलें मम तें न होतें ॥ अल्यावधी मात्र करीं तगे तें ॥
कीं वायुनें पान उडोनि जातें ॥ न आपुलें दैव हरूं शके तें ॥ २ ॥
निर्वंध हा नेम जगांत चाले ॥ हा जीव त्यांतूनि सुटे न काले ॥
जीवीं अशी शक्ति भरोनि राहे ॥ त्या जें हवें ओढुनि घेत आहे ॥ ३ ॥
आकर्षितो चुंबक आयसातें ॥ हे जीव तैसे दृढ ईप्सितातें ॥
दैवा असे अंतर जाणतें तें ॥ जीवास जें होय अवश्य देतें ॥ ४ ॥
यदा मिळे जाय अपार वाटे ॥ ये हर्ष तेव्हांचि तदन्त वाटे ॥
तारे बुजाले गगना न हाय ॥ सूर्योदयें हर्ष न त्यास होय ॥ ५ ॥
जें आपुलें दैव हरी न कांहीं ॥ कमी न कोणा करवे कदाही ॥
जें काल ने ठेव घरांत होती ॥ संपादिलें राहत तेंच हातीं ॥ ६ ॥

---

# गुप्त रत्नें.

## श्लोक.

असे अंतरात्म्यांत या काय काय ॥ कळाया विना शोधिल्या ना उपाय ॥
किनाऱ्यावरी सांपडे नैव मोतीं ॥ समुद्रीं बुडी मारणें प्राप्त होती ॥ १ ॥
गिरी सांवळे रुक्ष कंटाळवाणे ॥ तया अंतरीं धातुचें होय ठाणें ।
वरोनी दिसे शुष्क तें नारिकेल ॥ परी अंतरीं गोड पाणी निघेल ॥ २ ॥
बुडी खोल मारीं समुद्रीं मनाच्या ॥ जिथें वीचिच्या गर्जना दूर साच्या ॥
अती खोल भागीं वसे शांतता ती ॥ खरीं मौक्तिकें पांवळीं लाभतातीं ॥ ३ ॥
विचाराचिया अंत लावी खनीचा ॥ धरी स्वर्णलोभी तसा धीर साचा ॥
मिळे अश्ममंधींत गाळातळीं तें ॥ विना प्रार्थितां संपदा सर्व देतें ॥ ४ ॥
असे मानवी चित्त अंश प्रभूचें ॥ जरी बिंब झालें असे धूलिकेचें ॥
तिथें नांदती शुद्ध उत्कृष्ट रत्नें ॥ करीं येति तीं शोधितां सर्व यत्नें ॥ ५ ॥

# आनंददेव.

## अनुष्टुप.

व्यापिलें जग देवांनीं । नाम संख्या तया नसे ॥
देवता ऐकिली नाहीं । कोणी भक्त नसे अशी ॥ १ ॥
म्हणोनी माझिया देवा । काव्य हें सान अर्पितों ।
कवितारूप पुष्पांचीं । वाहीं माळ तया पदीं ॥ २ ॥
युद्धीं विजय देणारा । बळी मंगल तो नव्हे ॥
मुचकुंद सुखा निद्रा । दे झोंपीं रक्षि आस्तिक ॥ ३ ॥
नसे तो शुक्र सर्वांतें । प्रेमसौंदर्यदायक ॥
नमितों देव हे सारे । अन्यही वंदितों पदीं ॥ ४ ॥
बाळकृष्ण निजात्मा तो । मूर्त आनंद केवळ ॥
अश्विनीसुत आरोग्य । देती धनद संपदा ॥ ५ ॥
व्यापारीं बुध दे द्रव्य । स्कंद रक्षी मुली मुलें ॥
दयालु देवता साऱ्या । त्यांची महति जाणतों ॥ ६ ॥
आत्माराम असे माझा । सुखानंदकर प्रभू ॥
घेरें लपविलें सूर्यें । आपुलें तोंड उज्ज्वल ॥ ७ ॥
विद्या वटारुनी डोळे । पाहे मजकडे जरी ॥
आनंददेवभक्ताला । भूपती कःपदार्थ ते ॥ ८ ॥
उडुनी जातसे प्रेम । विद्येनें शीण होतसे ॥
संपदा वाढवी भार । भोग पीडी पदोपदीं ॥ ९ ॥
ऐश्वर्यमुकुटीं कांटे । राज्यान्तीं नर्क दारुण ॥
देवता देति जे भोग । दशा त्यांची असी असे ॥ १० ॥
आत्माराम करो रक्षा । आनंददेवता मम ॥
अखंडानंद दातारा । बाळकृष्णा नमोस्तुते ॥ ११ ॥

---

# शत्रु.

## श्लोक.

देवा मला शत्रु विशंक द्यावे ॥ मानीन मी त्यांस सुमित्र भावें ॥
संसार ही शर्यत लांब हाय ॥ कीं धांवतां तींतूनि शीण होय ॥ १ ॥
मध्यें बसावें स्वमनांत येतें ॥ अरी परी वेग पदांस देते ॥
मी देणगी पाहत एक जेव्हां ॥ धांवें जवें बोलत मित्र तेव्हां ॥ २ ॥

होणार ती प्राप्त तुला अवश्य ॥ कांहीं जगीं नाहिंच कीं अशक्य ॥
गेलों परी अर्ध पथांत जेव्हां ॥ वाटे नसे शक्ति पदांत तेव्हां ॥ ३ ॥

माझी दशा शत्रु पहात राहे ॥ धिःकार नेत्रीं मनिं हर्षताहे ॥
गात्रीं नवा जोर भरे नराचा ॥ झालों धनी शेंवट मी यशाचा ॥ ४ ॥

मी आंधळा रम्यपणें अघाच्या ॥ धात्यास ही सितरिलें भवाच्या ॥
दावीतसे शत्रु उणें मदीय ॥ शुद्धी करी द्वेष कुठें तदीय ॥ ५ ॥

जे साधती ईप्सित अर्थ लोकीं ॥ अर्धे अरी साधुनि दे विलोकीं ॥
मात्सर्यधिःकार तया रिपूचा ॥ जावें तिथें कार्य करीत साचा ॥ ६ ॥

त्याचें सदा वैर असें रहावें ॥ न लेश कालान्तरिं ही झडावें ॥
मित्राहुनी उत्तम शत्रु मातें ॥ द्वेषें करी संतत रक्षणातें ॥ ७ ॥

---

## जगांत वेडेच वेडे.

### श्लोक.

हा मत्त आहे जन एक झाला ॥ कारागृहीं बांधुनि त्यास घाला ॥
हें सत्य आहे तुमचें विधान ॥ वेडा परी कोण जगांत या न ॥ १ ॥

पृथ्वी असे मत्त-गृहासमान ॥ वेडेच सारे जन मूर्तिमान ॥
विलास ढगांत गढोनि गेले ॥ कामांत दुःखांत जळोनि मेले ॥ २ ॥

छाया बघोनी भयभीत पोरें ॥ खोटें खरें मानिति बाल सारे ॥
स्त्रिया जुन्या रीतिस आदरीती ॥ भिन्ना नरांची मृतिकल्पना ती ॥ ३ ॥

करी कदर्यु धनसंग्रहातें ॥ अतिव्ययी जो उधळी तयातें ॥
विद्यार्णवीं पंडित मग्न झाला ॥ कामांध पाहे शशिच्या मुखाला ॥ ४ ॥

संसार सानंद कवी कथी हें ॥ खोटेंच सारें शठ बोलताहे ॥
विलास शोधी तरुण भ्रमांत ॥ ईशस्थितीचे बहु वादजात ॥ ५ ॥

विवाद कर्माविषयीं भटांचे ॥ वितंड कीं वादहि नास्तिकांचे ॥
हांसावया तत्पर जो विनोदी ॥ संधी रडाया हुडकी विषादी ॥ ६ ॥

जो जो असे खिन्न उदास लोकीं ॥ उल्लास आनंद जया विलोकीं ॥
हे भ्रांतिनें सर्वहि मूढ झाले ॥ वेडेंच ऐसें जग सर्व चाले ॥ ७ ॥

---

## पंथ.

### श्लोक.

प्रभूचे भले भिन्न ही धर्मपंथ ॥ असे काय माझ्या तुझ्यो भावनांत ॥
जगीं भ्रातृभावें सदा लोक राहो ॥ असे ईश्वरी हेतु सर्वी असा हो ॥ १ ॥
दया अंतरीं ठेउनीयां रहावें ॥ स्तुती ईश्वराची विधी आचरावें ॥
कुणी आदरी ब्रह्मविद्यार्जनातें ॥ तिन्ही मार्ग संयुक्त एक स्थळातें ॥ २ ॥
न झाले यदा वेद किंवा पुराण । अशा कालिं ही जीव होते प्रवीण ॥
तयीं ईश्वरी हेतु सिद्धीस नेला ॥ सुनिष्काम भक्तीबळें साध्य केला ॥ ३ ॥
रवी वन्हिच्या पूजनीं सिद्ध झाले ॥ असे ही किती मुक्त होवोनि गेले ॥
जरी भावना अंतरीं क्षीण नाहीं ॥ खऱ्याची तृषा शांत होईल पाहीं ॥ ४ ॥
नसे निर्मिला नर्क जेव्हां नवीन ॥ नवीना जगातें कराया सुदीन ॥
महाराक्षसात्मे किती जीव गेले ॥ सरीं [1]कल्पनावन्हिच्या मग्न झाले ॥ ५ ॥
सहस्रावधी पंथ होवोनि गेले ॥ न त्याचें तुला वा मला दुःख झालें ॥
तरूच्याचि एका असे पंथ शाखा ॥ सदा प्रीतिचें मूळ भूमींत देखा ॥ ६ ॥
कुजोनी जरा जाय शाखानुशाखा ॥ वसे जीव मूळांत पीयूषरेखा ॥
तुझी भावना राहु माझी मनांत ॥ प्रभुचे भले भिन्नही धर्मपंथ ॥ ७ ॥

---

## दोन पेल्यांचा संवाद.

### श्लोक.

कोणा नृपाच्या घरिं दोन पेले ॥ मेजावरी सुंदर पूर्ण ठेले ॥
एकांत रक्तापरि ताम्र[2] वारी ॥ अन्यांत पाणी स्फटिकास हारी ॥ १ ॥
मद्यार्क पेला वदला पराला ॥ सांगू कथा स्वीय परस्परांला ॥
संभोजनें [3] गायन नाच झाले ॥ राजा तिथें मी जन वश्य केले ॥ २ ॥
गर्विष्ठ मोठे जन या जगांत ॥ स्पर्शेंचि माझ्या पडले तमांत ॥
किरीट भुपाशिरिंचे हरीले ॥ [4]कीर्तीगिरीचे जन लोटियेले ॥ ३ ॥
सन्मान्य नांवें बहु लोपवीतों ॥ हरोनी मी सद्गुण लाज देतों ॥
स्वादें किती मोहविले जवान ॥ आयुष्य त्याचे करिं धूळधाण ॥ ४ ॥
राजांहुनी थोर जगांत होय ॥ माझ्या पुढें सैन्य करील काय ॥
मी [5]वाहकांचा कर कांपवीतों ॥ रूळा वरोनी [6]रथ पाडवीतों ॥ ५ ॥

---

१ अग्निच्या सरोवरांत. २ मद्य. ३ मेजवान्या. ४ कीर्तिरूप डोंगरावरून.
५ हांकणारांचा. ६ आगगाडी.

नौका समुद्रीं दृढ मग्न केल्या ॥ हांका मृतांच्या मज गोड झाल्या ॥
लक्ष्मीपती किर्तिशरीरशक्ती ॥ माझ्या पुढें शून्य तदीय भक्ती ॥ ६ ॥
मदीय सत्ता जगिं सर्व चाले ॥ माझ्याविना पान न एक हाले ॥
बंधो म्हणे मद्य कथा वदावी ॥ माझ्या परी कां कृतकृत्य दावीं ॥ ७ ॥
पेला जलाचा म्हणतो स्वबंधो ॥ माझें असें कर्म नसेच साधो ॥
केले न म्यां गा [1]पदहीन भूप ॥ न मारिला म्यां [2]जनसंघ खूप ॥ ८ ॥
झाले परी जे हृदयांत खिन्न ॥ केलें तया मी मुदितप्रसन्न ॥
केली तृषा शांत, करा शिरातें ॥ नेत्रां धुतों वांचवितों जिवातें ॥ ९ ॥
गिरींत जन्में पडतों दरींत ॥ विस्तार माझा [3]तपनीं करीत ॥
यंत्रांतुनीं सोडित मी तुषार ॥ बाहूंत ऐसें तव काय सार ॥ १० ॥
तोडोनियां मी [4]घनशृंखलातें ॥ [5]व्योमांतुनी धांवत ये जगातें ॥
आशांकुरा चक्षुसि तोष देतों ॥ संतप्त शीर्षाप्रति शांतवीतों ॥ ११ ॥
भूमींत अन्नें पिकवीत नाना ॥ यंत्रोपयंत्रां गति देत यानां ॥
आधार यंत्रें दळितीं तया मी ॥ मदीय इच्छा करि कार्य नामीं ॥ १२ ॥
त्वां वक्रमार्गी जन फार नेला ॥ आणीं तुफानीं सरितातटाला ॥
[6]उद्धार त्यांचा करि मींच पाहीं ॥ कीर्ती तयातें वरितें पुनःही ॥ १३ ॥
मी मोद दे साह्य करीं जनांला ॥ सामर्थ्य देतों वितरीं धनाला ॥
केलीं जनांचीं हृदयें प्रसन्न ॥ देतों स्वभक्तां धनवस्त्रअन्न ॥ १४ ॥
कारागृहीं सांपडले तुझ्या जे ॥ मी त्यां करीं मुक्त बळें स्वतेजें ॥
जे जे मला ओळखती सुदैव ॥ कल्याण त्यांचे करितों सदैव ॥ १५ ॥
पेले असें वृत्त परस्पराला ॥ सांगोनियां आत्मपराक्रमाला ॥
मेजावरी भूपतिच्या बसोनी ॥ आनंदवीती रसिकांसि कानीं ॥ १६ ॥

---

## प्रातःस्तवन.

### श्लोक.

देवा पावा स्वकरिं घडवा नित्य सत्कर्म कांहीं ॥
ज्यायोगानें असुखजलधी शुष्क होवोनि जाई ॥
आनंदाचा लघुतम सदा आपगाही फुगावी ॥
सत्कर्मीं, द्या प्रभु वर असा, पूर्ण इच्छा करावी ॥ १ ॥
माझी स्वार्थी कृति न दुखवो शत्रुमित्रांतरातें ॥
होवो ना वा अमत वचनें दुःख अन्या जनातें ॥

---

१ पदच्युत. २ जनसमुदाय. ३ सूर्यप्रकाशांत. ४ मेघरूपी बिड्या. ५ आकाशांतून. ६ उन्नती.

दीनाला म्यां बघुनी नयनीं पाठ ना दाखवावी ।।
रक्षा कांहीं मुखि न वदतां पापियांची करावी ।। २ ।।

द्रव्याल्पत्वें अतिशय जरी जाहलों मी भिकारी ।।
द्यावें थोडें तरि मम करीं मानवा अन्नवारी ।।
आर्तीं धैर्यें सबळ करणें रोगियां धीर द्यावा ।।
माझ्या हस्तें शुभ कृति अशी होउं द्या देवदेवा ।। ३ ।।
आजीं रात्रौ अरुणउदयापासुनी काल गेला ।।
त्याच्या मध्यें निरखुनि कळो कोण म्यां अर्थ केला ।।
केली कोणावरी उपकृती सान मोठी म्हणोनी ।।
झालें आजीं जग अधिक मी चांगलें सर्व मानीं ।। ४ ।।

---

# मी कसा आहे.

## साकी.

लहरी प्रचंड ह्रदयीं तैशा मनोविकृति आदळती ।।
आहे तरि मी शांती केवळ ऐसी मज अनुभूती ।। १ ।।

राहे मधुरा तया पलिकडे शांति खरी मी समजें ।।
धीरानें ती लभ्य होतसे कर्मं करितां उमजे ।। २ ।।

ह्रदयीं माझ्या तुफान करितें भीतीकर शिरजोर ।।
शांती आहे स्वयें वदे मी पितृधन शांती थोर ।। ३ ।।

असे निरोगी मी, ज्वर जरि तो मस्तक माझें फिरवी ।।
भय देणारा विकार किंवा तनुला क्षणहि करवी ।। ४ ।।

दुःख जाउनी पूर्णपणानें पूर्व दशा येणार ।।
निश्चय ऐसा मनांत अंतीं सत्फल मज मिळणार ।। ५ ।।

दिवसां कष्टीं अनिद्र रात्रौ असतांना ही वदतों ।।
रोगि नसे मी आरोग्याचा स्वामी केवळ मी तो ।। ६ ।।

थंडी वाजे अन्न मिळे ना वस्त्रहि जरि मज लोकीं ।।
होउनि सस्मित धीरें म्हणतों सिद्धी मीच विलोकीं ।। ७ ।।

कुदशा नच चिर टिकेल होइल आनंद उद्यां मजला ।।
कारण पुढती सौभाग्याची भेटी होई सकला ।। ८ ।।

हरि जननी मम, त्याचें वैभव वचनीं मज कथवे ना ।।
सत्संपत्ती माझी, सोनें सौख्यारोग्य खुटेना ।। ९ ।।

# प्रेमच पुरे.

## श्लोक.

पुरे प्रेम मातें, नको स्वर्णपर्व ।। विते संपदा दुर्मती लोभ गर्व ।।
युगीं शांतिच्या सन्मुनींच्या पुराणीं ।। न वस्त्रा न हर्म्या विचारीत कोणी ।।१।।

शिरीं मेरुच्या देवतावास राहे ।। तदर्थीं असे त्यांस अस्तित्व पाहें ।।
तिथें साधिला प्रेम आनंद देवीं ।। पुरे प्रेम हें मी मनीं नित्य ठेवीं ।। २ ।।

पुरे प्रेम, चिंता नका लौकिकाची ।। अ।नष्टा असे हांव मोठेपणाची ।।
जना नामकीर्त्यर्थ ती लोभवीते ।। स्वशांतो हरी विश्रमा लांबवीते ।। ३ ।।

स्थलीं पूर्ण एकांत ऐशा रहावें ।। असो भूषवीलें वरप्रेमभावें ।।
पुरे प्रेम, सत्तार्थ कां म्यां झटावें ।। अविश्वास औद्धत्य जीनें जणावें ।। ४ ।।

क्षणीं एक सन्मान संतोष देतो ।। जगांतील सन्मान राखेंत जातो ।।
प्रसिद्धास ही होय एकांतवास ।। करावें जनीं प्रेम माझें विशेष ।। ५ ।।

महंती तयें पाहिजे प्रेम केलें ।। जरी अन्य कांहीं न हातास आलें ।।
पुरे प्रेमची, अन्य मी काय मागूं ।। असे ईश्वरा देणगी सत्य सांगूं ।। ६ ।।

हरीनें दिली पेटिका अंतराची ।। असे तींत संपत्ति मोठी नराची ।।
सदा सांठवे प्रेमभक्ती तिच्यांत ।। वर श्रेष्ट हा नाहिं कां जीवनांत ।। ७ ।।

जुनें जाहलें प्रेम पावे लयाला ।। तशी राहते माधुरी ही नव्याला ।।
करी संसृती जीव-कल्याण हेतें ।। तसी कर्मभूमी सुखानंद देते ।। ८ ।।

---

# श्रेष्ठ कर्तव्य.

## श्लोक.

ईशें ज्याला सुमति दिधली श्रेष्ठ कर्तव्य त्याचें ।।
सर्वा लोकांसहि निजगुणें मान्य झाला तयाचें ।।
झाला नाहीं जंववरि निजोद्धार ना झोंप घ्यावी ।।
नेटें कर्म सतत करुनी बुद्धि सीमेस न्यावी ।। १ ।।

जीवा द्यावी निजकृतिगुणें संस्कृती पूर्ण त्यानें ।।
शुद्धा हेमांतचि जडविती कोंदणीं रत्न मानें ।।
त्यानें केले मधुर सगळे पाहिजे सद्विचार।।
मौर्ख्या गर्वा उधळुनि दिलें अंतरांतील दूर ।। २

ईशानाच्या कनकखचिता निर्झरांतून प्याला ॥
चौदा विद्या चउसट कला वेदशास्त्रांतराला ॥
जीवीं कोंडा झटकुनि तयें मत्सराचा त्यजावा ॥
दुष्टत्वाचीं उपटुनि मुळें तो हृदीं शुद्ध व्हावा ॥ ३ ॥

मोठे घाला सुगुण मुकुटासारखीं भूषणें तीं ॥
घेऊं नाहीं हिरकणि जशी ठेवि तो रंक हातीं ॥
जे जे राजे चढुनि मुकुटप्राप्तिला योग्य झाले ॥
त्यांनीं मोठे श्रम अनुदिनीं दीर्घ जागोनि केले ॥ ४ ॥

---

## तुमची नौका.

### श्लोक.

नौका मोठी समज असली आपुली एक खाशी ॥
जीच्या मध्यें खचुनि भरली संपदारत्नराशी ॥
तीला कोणी त्यजुनि उदधौ मोकळी देत काय ॥
वायूवेगें फुकट खडकीं फोडण्या तीस हाय ॥ १ ॥

या विश्वाची निखिल भरली संपदा लक्षकोटी ॥
नौके मध्यें खचित तुमच्या गूढ सर्वार्थ पेटीं ॥
तीच्या मध्यें वसत विभुचा सर्वकर्तृत्व भाव ॥
सर्वी जीवां प्रभु वितरितो जन्म घेतां प्रभाव ॥ २ ॥

इच्छारुपी उमज मनुजा नांव मोठी तुझी ते ॥
वाटे तेथें फिरविसि कसा मोकळी सांग तीतें ॥
राहे एक क्षण पडुनि ती बंदरीं स्थीर शांत ॥
एकाएकीं लहर फिरतां सिंधुमध्यें वहात ॥ ३ ॥

एका वेळीं पडुनि सुकते वाळवंटीं प्रशस्त ॥
शोधायातें उगिच पुढती निर्जन द्वीप जात ॥
गेली तैसी परत फिरुनी पातली रिक्त हातें ॥
ऐसें व्यर्थ श्रम करुनियां श्रांत होवोनि जाते ॥ ४ ॥

वातें झाली खिळखिळि पुढें जीर्ण होवोनि गेली ॥
वेगानें ती खडकिं हपटे थोरली भेग झाली ॥
पाणी तेव्हां झरझर शिरे आंत काहूर झालें ॥
जातें खालीं धन बुडुनियां भोगिलें नाहिं गेलें ॥ ५ ॥

मंदा जा रे लवकरिं तुझीं नाव रक्षी अर्जुंते ॥
हातीं चक्रा धरुनि वळवी ज्ञानकीर्तीयशातें ॥
मोठया नौकानयनपटुनीं रेखिला मार्ग सोपा ॥
जावें खाडी चढुनि वरती मानसैकाग्र्यरूपा ॥ ६ ॥
सारे ईप्सित अर्थ नंतर तुझी ओढील इच्छा बळी ॥
जैसा चुंबक सूचिकेस सहजों सत्ताबळें आक्रळी ॥
सूर्याला तृण झांलितें हिमगुणें जैसें बळें आणितें ॥
साऱ्याहि हिमकालि जें निजमनीं प्रार्थी वसंतार्थ तें ॥ ७ ॥

---

## ' स्वभक्ति करिं शेंवटीं '

### श्लोक.

स्वधर्म मनुजा तुझा जवळ पाहुनी आपुले ॥
तुझ्या सहित जे पथीं विकळ चालुनी जाहले ॥
प्रसन्न करिं साह्य त्या भवभरास सोसावया ॥
स्वभक्ति करि शेंवटीं, सुजनतेस जोडावया ॥ १ ॥
स्वभक्ति करिं शेंवटीं मनुज शोधि तूं दूरचा ॥
निराश बनला अर्धे बहुत भाजली यत्त्वचा ॥
तदीय भय वारुनी धरुनियां तया सांवरीं ॥
गिरीशिखरीं पोंचवीं जगिं दिसेल शोभा खरी ॥ २ ।
स्वभक्ति करिं शेंवटीं अमित पोकळी अंबरीं ॥
असे भरलि दैवतें सकळ आत्मरुपी वरीं ॥
सुमित्र तव हातिं तीं करिति लोभ तूझ्या वरी ॥
परांस सुख द्यावया निजबळें श्रमातें करीं ॥ ३ ॥
स्वभक्ति करिं शेंवटीं मनि भरीं परानंद तो ॥
निजार्थपरमोत्सुका अझुनि लभ्य झाला न तो ॥
असो स्थिति कशी तरी तुजसि पूर्ण शांती मिळे ॥
दिसेल जगतींच या विमल सौख्य नाकागळें ॥ ४ ॥
स्वभक्ति करिं शेंवटीं तरि निजात्मशक्ति चढे ॥
श्रुतीनयन चोखडे बनति ज्ञानबुद्धी घडे ॥
अनंत भगणें नभीं सहज हेतु त्यांचा कळें ॥
प्रमोद मग ईश्वरी तुजसि साध्य झाला बळें ॥ ५ ॥

# भावी धर्म.

( यूरोप खंडांत व अमेरिकेंत 'ख्रिस्ति धर्माची स्थिति कशी होती व पुढें होईल ' यांचे वर्णन यांत आहे. )

## श्लोक.

विचार भुवनें नवीं नविन निर्मितीं आपुले ॥
अमोघ बल त्यांतची वसत [1]आशिशापांतलें ॥
[2]निराकृतिसमानभीं गडगडाट त्यांच्या झडे ॥
वरोनि पडती भुवीं घणघणाट विश्वीं घडे ॥ १ ॥

स्वयें रचुनि ठेवितों निजभविष्य आम्ही करीं ॥
न कर्म करुनी दृढा धरुनि वासना अंतरीं ॥
असे सुटुनि जावया मुळि न मार्ग त्या डोंगरीं ॥
न विप्रकृत पंथ ही स्वकृत कर्म मिथ्या करी ॥ २ ॥

न मुक्तिपद लाभतें विकत भीक वा मागुनी ॥
अशी हृदयिं राहिली बहुत काल आशा जनीं ॥
मनुष्य बसला असे अमत या विचारावरी ॥
स्वशत्रुहत येशुच्या म्हणुनि तो मदारावरी ॥ ३ ॥

गळोनि पडतीं जुनीं तरुवरील पानें जळीं ॥
तसे पडति पंथ हे झडुनि धर्मवृक्षातळीं ॥
जनांस कळुं लागलीं असतिं काय व्यंगें तया ॥
विमुक्ति निज व्हावया रडति जीव लोकांत या ॥ ४ ॥

असौख्यजयभार तो त्यजुनि मोकळा जाहला ॥
युगीं प्रथम कल्पिली मनिं कला सुखप्राप्तिला ॥
स्वधर्म विसरोनि तो धरुनि लोक निःशंकता ॥
विशृंखळ फिरे जगीं पसरि नास्तिकाच्या कथा ॥ ५ ॥

विधी विविध वाटले मधुर जे अनादी मना ॥
तया चिकटवावया क्षम न धर्म आजीं जना ॥
पदीं चढुनियां गिरी त्वरित धाडसाच्या गुणें ॥
रहस्य नुमजे मनीं म्हणुनि सर्व खोटें म्हणे ॥ ६ ॥

पहा वदति मंत्र ते भट बसोनि एकीकडे ॥
दुजीकडुनि संशयध्वनि विशेष कानीं झडे ॥
सुशांत रव भक्तिचा मधुनि गोड कानीं शिरे ॥
जगीं दशदिशांतरीं पसरी भाव तो शुद्ध रे ॥ ७ ॥

---

१ आशिर्वाद व शापा सारखें. २ निराकार वर्ष ( काल ) रूप आकाशांत.

दिनप्रतिदिनीं ध्वनी विमल गोड तो वाढतो ॥
प्रतिध्वनि नभांगणीं दुमदुमोनी कोंदाटतो ॥
शिळा उलथि हापटी जबर दुर देहात्मता ॥
वसे शिव तुझ्यांत जो उदय पावुं तो तत्वतां ॥ ८ ॥

---

## विचाराकर्षण.

### श्लोक

अवश्य तव जे जिवां विषय वाटती सर्वदा ॥
बलान्वित विचार त्या विषयिं होति वांच्छा यदा ॥
अजिंक्य गणितां नये इतुकि होय सेना खडी ॥
त्वदीप्सित तुझ्या मधें मनन शक्तिची रोकडी ॥ १ ॥

यदा अबल अंतरीं फिरवितें मनावासना ॥
यदा बदल इच्छितीं घडुनियां ढळे भावना ॥
अदृष्ट बल तेधवां करित मोध शक्ती तव ॥
सुसिद्धि वर द्यावया गलितवीर्य होतें नव ॥ २ ॥

विचार दृढ चुंबक प्रबळ वांछना सांगती ॥
प्रसाद, सुखहेतु, वा नियम सुव्रतें लोह तीं ॥
जिवांत जितुकी असे बतवती तुझ्या भावना ॥
तशीच तितुकी करीं त्वरित सिद्धि ये [1]वामना ॥ ३ ॥

---

## जीवनदी.

### साकी.

वाहतसें मी [2]ईशोदधिंतुनि सरिता वक्र पथानें ॥
त्याच पथें मी जाते दिधला निश्चित करुनी प्रभुनें ॥ १ ॥
अन्यें जाया शक्ति न मजसी माझें कर्म प्रशस्त ॥
जल ठेवावें शुद्ध आपुलें सारुनि गदळ समस्त ॥ २ ॥
सरिता विचित्र जन्मे जेथें तेथें तीचा अंत ॥
या जीवाचा अल्पावधि जैं संपे तंतोतंत ॥ ३ ॥

---

१ दुर्बळा. २ ईश्वररूपी समुद्रांतून.

जावें लागत परत मला त्या गुप्त[1]प्रभवालाच ॥
म्हणुनी जातां जातां मार्गीं अनुदिनि माझा म्यांच ॥ ४ ॥
घ्यावा सुगंध मधुर फुलांचा सुंदर नाकीं भरतो ॥
आरोग्य घेउं लतांमधुनियां मोद नगोनगिं वसतो ॥ ५ ॥
लोटुनि न्यावीं खालीं खालीं वेगें पात्रांमधुनी ॥
पाषाणचि ना परि रत्नें ही बघण्या प्रभुनें नयनीं ॥ ६ ॥
[2]शोकाक्षींचें पवित्र जल तें—अश्रू वाहुनि न्यावें ॥
[3]प्रभूसिंधूतें ज्यांतुनि सर्व हि सरिता उद्गम पावे ॥ ७ ॥
नेउं नये म्यां क्षतहृदयाच्या वाहुनियां रुधिरातें ॥
विषवल्लीचें विष नच न्यावें सांगाती उदधीतें ॥ ८ ॥
कुसुमलतांच्या दरींत जेव्हां घालिन उडि हर्षानें ॥
दुखवुं नये त्या वा वध त्यांचा करूं नये दर्पानें ॥ ९ ॥
शोभा विशेष त्यांना यावी ऐसें करणें उचित ॥
हर्षसुखाचें प्रदान माझ्या कडुनी घडणें खचित ॥ १० ॥
भयद कड्यांच्या वरुनी जेव्हां उडुनी जावें खालीं ॥
करो न कुरकुर कधि मी न्यावी रेंटुनि वेळा आली ॥ ११ ॥
निर्भय होउनि शेंवट वरि मी धडधड वाहत जावें ॥
ज्यानें रचिला पथ मम तो विभु जवळ सदा समजावें ॥ १२ ॥
प्रेमीं झालें जन्म पावलें प्रेमीं जाते परत ॥
प्रेम प्रभु तो प्रेमचि केवळ ऐसें मुनि वदतात ॥ १३ ॥

---

# लोकांस प्रार्थना.

## आर्या.

रात्रंदिन जन जगतीं ओरडती ऐकतों सदाशेनें ॥
बोलाविति ते रडती उत्तम यायास काल वाटेनें ॥ १ ॥
नारीनर हो ऐका योग्य तुम्ही लक्ष देवुनी त्यांचें ॥
आक्रोशांत तयांच्या भरलें भयचिन्ह थोरलें साचें ॥ २ ॥
ऐका भूमिहरांनो लोभांधांनो पुरा विचार करा ॥
मंद ध्वनि जरि आर्जी पुढतीं होणार घोर तोच खरा ॥ ३ ॥
वळव्याच्या वृष्टीनें फुगुनी धांवे वनीं जवें जैसा ॥
ओढा विशाल होउनि झोडित जातो जनध्वनी तैसा ॥ ४ ॥
वाहतसे खिडींतुनि उडतो उंचावरोनि मग फुगतो ॥
जातां जातां त्याला प्रवाह मिळुनी असंख्य फुगवीतो ॥ ५ ॥

---

१ गुप्त उगमाला, ईश्वराला. २ शोकानें व्याकुळ अशाच्या नेत्रांचे अश्रु.
३ ईश्वररूपी समुद्रास.

होताहे रुंद नदी लोकमताची अहर्निशीं खास ॥
लोंढा तीचा वेगें खोदी करितोच लोभगिरिनाश ॥ ६ ॥
नैष्ठुर्यें कोंडियली तीच्या वरि हेमहेतु जरि केला ॥
झरझर येतो दिन जैं जावें लागे पळोनि भीत तुला ॥ ७ ॥
हा, हा, जन ओरडती रात्रंदिन यावया सुकाळ सदा ॥
कष्टें श्रमही करिती शिणति जवानींत भोगिती विपदा ॥ ८ ॥
रडती विभाग घ्या हो शोकानंदांत आमुच्या वदती ॥
चढवुनि उंच स्वधना धनि त्या देती भिकार अंश अती ॥ ९ ॥
भूमि प्रभुची चोरुनि भरिती कोश स्वकीय सोसानें ॥
प्रभुपुत्रा या जों नच धरिलें उग्र स्वरुप विनयानें ॥ १० ॥

---

## जर.

### श्लोक.

आजीं आहे स्थिति तव उद्यां सत्य होणार बाला ॥
त्यांच्यां मध्यें ‘ जर ’ शिरुं न दे दोष ठेवावयाला ॥
मेरू केला लघुतम जगीं मोहरीचा नरांनीं ॥
जातो जैसें गवत चिरिलें[1]कर्षिकांच्या विळ्यांनीं ॥ १ ॥
इच्छा उत्पादक बळ झटे हेतु साधावयातें ॥
कांपी मार्गीं ‘ जर ’ तृण बळें शुष्क होवोनि जातें ॥
होसी मोठा निजबल तसा तेवढा निश्चयानें ॥
कालाची ना अनुकुल दशा बुद्धिचा खेळ जाणें ॥ २ ॥
आत्मज्योति प्रखर जळते सिद्धिलाभार्थ[2]जेव्हां ॥
साध्या[3] जीवांमधुनि हरिते विघ्न काळोख तेव्हां ॥
तेजें सूर्य त्वरित नुरवी जें धुकें दाट झालें ॥
तैसा आत्मा हतबल करी विघ्नसेनेस काळें ॥ ३ ॥
जे जे लोकीं मनुज असती आळसी दीर्घतंत्रीं ॥
त्यांचा राहे अविरत ‘ जरा ’ धेय आधार मंत्रीं ॥
राहे मोठा भर ‘जर’वरी सर्वही मध्यमांचा ॥
मोठे मोठे असति न कळे त्यांस हा शब्द साचा ॥ ४ ॥
धिःकारानें उलट बघती कार्यकर्तें तयाला ॥
संदेहानें खचुनि भरले तेच जाती लयाला ॥
शंकात्मत्वें कुजुनि मरती लक्ष्मी झांसिची ते ॥
कीर्तीरूपें उरति कसली गायनीं कोण गातें ॥ ५ ॥

---

१ शेतकऱ्यांच्या. २ यशोलाभार्थ. ३ साध्य वस्तु.

# ज्योतिष्यास उत्तर.

## श्लोक.

देवज्ञा मजला न संशय उरीं ही गुप्त विद्या खरी ॥
शंका ना मम पत्रिका प्रगटवी भूताभविष्या बरी ॥
माझा जीव करीतसे जगतिं जें त्याचाच कार्यक्रम ॥
सारेंही मजला कळे तिळभर भ्रांती मना ना मम ॥ १ ॥
उन्मत्ता जलधीस दुर्बळ असा आकर्षिताहे शशी ॥
खालीं बैसवितो पुनः उठवितो ही नित्य लीला कशी ॥
जन्मस्थ ग्रह तो करी मम नभीं[1]पत्ती जसा रक्षण ॥
भेष्दुर्यें अडवी शुभाशुभ घरा येवों न देई क्षण ॥ २ ॥
[2]हर्षामर्षजयाजया सुखविण्या दुःखांत लोटावया ॥
सोडी त्यासचि आंत कर्मगतिनें पात्रत्व ज्या यावया ॥
सारें मान्य असे, परी अधिकही ठावें मला अल्पसें ॥
जेव्हां विश्व न कल्पिलें विरचिली माला रवीची नसे ॥ ३ ॥
कांहीं ही नव्हतें अनाम विभुच्या वांचोनी विश्वीं यदा ॥
होता जीव मदीय रेणुपरि तो गर्भी तयाच्या तदा ॥
रूपें पुष्कळ घेउनी युगयुगीं तो वर्ततो आजही ॥
त्यानें ही धरिली असे नरतनू सिद्धि वराया महीं ॥ ४ ॥
माझ्या मीस नसे जरामरण वा नाहीं भवाचें भय ॥
सर्वोत्पादक अग्निचा चमकता स्फुल्लिंग तो दुर्जय ॥
आहे शाश्वत ईश्वरप्रभव तो, त्याचा खरा अंश तो ॥
ब्रह्मांडाहुनि सर्वही अधिक तो शक्तीगुणें श्रेष्ठ तो ॥ ५ ॥
झालें ज्ञान जयास हें न विसरे तें पूर्ण झाल्यावर ॥
ईशाख्या मम जीव हा प्रगटला वंशीं महा सुंदर ॥
दैवा जिंकित तो, तया बदलितो, होतो तयाचा पती ॥
वोशी तो नभ हें पटापरि महा नक्षत्र त्यादींच तीं ॥ ६ ॥
मिथ्या तो करितो स्वकीय रचितो इच्छाबळें पत्रिका ॥
साधी सिद्धि अपेश भंगुनि वरी दुःखीं सुखाच्या पिका ॥
आकाशीं ग्रह बापुडे, रविशशी राशी असे ना अशी ॥
मी जिंकी स्वबळें करोनी तुमच्या आंतील देवा तशी ॥ ७ ॥
वोळावें बल जेधवां निज भवीं जीवित्वकार्याकडे ॥
आत्मेच्छेसम वांकवूं घडवुं तीं जाऊं भवाच्या कडे ॥
जेव्हां बांधपडे अनंत परि तो सान्ताचिया अंतरीं ॥
तेव्हांची करि पत्रिका करितसे सत्ता मनुष्यावरी ॥ ८ ॥

---

पहारे करी, संत्री. २ आनंददुःख.

# मुक्ति.

## श्लोक.

माझ्या मागुनि कोण पातक करी त्याची न चिंता मला ॥
छाया ना कधिही पडे मजवरी त्यांच्या अघांची[1]बला ॥
माझ्या वंशपरंपरेहुनि बली इच्छा मदीया असे ॥
व्हाया पुष्ट मृतावरी जगति या झालों किडा मी नसे ॥ १ ॥
मुद्रारूपस्वर मम गती हावभावादि साचीं ॥
सारीं बिंबें जरि मजमधें[2]पूर्ववंशान्वयाचीं ॥
आहे अंश प्रभुवरमहाकारणाचा स्वभावें ॥
जाणोनीयां स्वमनि बहु मीं हर्ष आनंद पावें ॥ २ ॥
जीवात्मा मी प्रबळ जगतीं योजितां योग्य त्यातें ॥
बद्धा विश्वा निखिल करितों मोकळें एकदां तें ॥
दुष्टा मर्त्याहुनि वर न मी कां अपक्वा नराच्या ॥
एकाद्या जो वळवळ करी वंशवृक्षीं स्वतःच्या ॥ ३ ॥

---

# जगाची प्रगति.

## श्लोक.

देण्यांत घेण्यांत इथें जगाच्या ॥ चिंतेंतुनी हर्षभरांत त्याच्या ॥
उद्योगशांतीवरसौख्यकालीं ॥ युद्धाचिया घोर घनांध सालीं ॥ १ ॥
नेटें पुढें पाय पडे जगाचा ॥ सिद्धी वरी मानवमात्र साचा ॥
साधीतसे हें जग अर्थ धन्य ॥ जो जो प्रभूच्या हृदयांत नान्य ॥ २ ॥
शोकांत हास्यांमधुनी जगाच्या ॥ लाभांत हानींतुनि ही तयाच्या ॥
मोदांतुनी कष्टदशेंत त्याचें ॥ बाह्यान्तरंगीं प्रभुसूत्र नाचे ॥ ३ ॥
उत्पत्तिनाशावधि सर्व काल ॥ पुण्यांत पापांतुनि ही कराल ॥
उद्धारचक्रीं विभुच्या विचित्र ॥ वेगें फिरे सत्यसुवर्णसूत्र ॥ ४ ॥
अज्ञान सारें सगळे प्रमाद ॥ सारें भयासौख्यहि निर्विवाद ॥
विश्वाचिया पृष्ठपटीं विशाल ॥ ठेवीतसे चित्रुनि शांत काल ॥ ५ ॥
हा काल जैं डाग तमोगुणाचें ॥ झांकील झोंकें कलमें स्वतःचे ॥
सौंदर्य तें जीवकथानकाचें ॥ चित्रील तो वैभव सांग त्याचें ॥ ६ ॥

---

१ संकट. २ पूर्वजांची.

## दान.

### आर्या.

आला माझ्या द्वारीं भिक्षा मागावयास एक नर ॥
थोडें धन मजजवळीं परंतु दिधलें तयास अल्पतर ॥ १ ॥
नेलें त्यानें धन तो खर्ची सारें यथावकाशांत ॥
आला पुन:पुनः तो क्षुत्पीडित पूर्वसा धरी हात ॥ २ ॥
दिधला विवेक त्याला तया माझ्या सद्विचारयोगानें ॥
काढियला निज आत्मा शोधुनियां श्रेष्ट देव जो त्यानें ॥ ३ ॥
वस्त्रान्नाची प्राप्ती सर्व सुखाचें मिळे तया धाम ॥
भिक्षा मागायाचें आतां उरलें नसे तया काम ॥ ४ ॥

---

## सिद्धि.

### श्लोक.

मर्त्यें योजिलि नाहिं शक्ति पुरती अद्यावधी आपुली ॥
वाहे ती सरिता निर्वाणि विभुच्या रूपांतुनी माउली ॥
आत्म्याला इह मानवी मिळतसे ती येउनी सुंदरी ॥
जातां मागुति उद्गमावरि घडे देवेश भेटी तरी ॥ १ ॥
माझें पात्र निरुंद, तीर लघु ना ठेवीं स्मृती अंतरीं ॥
मार्गीं घोर दऱ्या कडे अडविती त्यांची न चिंता करीं ॥
जन्माला उगमांतुनी स्मर सदा आलासि कीं पावन ॥
जो जो मानव ही विचारदृढता ठेवील रात्रंदिन ॥ २ ॥
कार्यें तो करितो जगांत सगळीं इच्छेपरी दुष्करें ॥
मर्यादा निजशक्तिला न च असे हें सत्य त्याला स्मरे ॥
आहे कारण ईश उद्गम तीचा ही भावना पावना ॥
तो मोठा नद वाहुनी निजउरीं नेतो तरी कांचना ॥ ३ ॥
आशायत्नमनोरथादि तरि तो नेतो बळें वाहुनी ॥
कामक्रोधगिरी भयाण खडका सांभाळुनी पाहुनी ॥
घाली आणुनी बंदरीं सहज तो सिद्धीचिया उज्ज्वल ॥
सोडी नंतर नांगर स्थिर करी स्वर्थि दे मंगल ॥ ४ ॥

## असंतोष.

### श्लोक.

असंतोष संशुद्ध होता विधीला ॥ म्हणोनी रची विश्व तो रम्यलीला ॥
प्रकाशावया निर्मिला सूर्य त्यानें ॥ भरी सर्व आकाश तारागणानें ॥ १ ॥
जरी माकडें लांगुलीं तुष्ट होतीं ॥ तरी उंच योनी कशा जन्म घेती ॥
सवें घेउनी देहसौंदर्यरूप ॥ कपी होउनी बैसता आजि भूप ॥ २ ॥
नराच्या असंतोषयोगें जगाची ॥ सदा होतसे उन्नती श्रेष्ठ साची ॥
करा ज्योत मोठी महशोद्भवा ती ॥ चढा सत्वरीं स्वर्गसोपानपंक्ती ॥ ३ ॥

---

## गुप्त विचार.

### श्लोक.

वस्तुत्व मी मानितसें विचारा ॥ आहे तया प्राणतनूपिसारा ॥
लोकीं तया सोडितसों भराया ॥ सुष्टत्व दुष्टत्व अपार राया ॥ १ ॥
ज्या बोलती गुप्त असे विचार ॥ पृथ्वीवरी धांवति दूर दूर ॥
दुःखें सुखें ठेविति तेथ मागें ॥ मार्गांत जेवीं पदपंक्ति धागे ॥ २ ॥
या ईश्वराच्या नियमा स्मरावें ॥ शांत स्थलीं ध्यान सदा करावें ॥
अज्ञात धैर्यें करितां विचार ॥ एकांति ते मित्र तुझे उदार ॥ ३ ॥
त्यांना असे प्राण उडोनि जाती ॥ संस्कार मागें परि ठेविताती ॥
वायू जसा पाणथळी विषारी ॥ धामीं शिरोनि ज्वर आणि मारी ॥ ४ ॥
गेले स्मृतींतून निघोन पार ॥ गतीं विचारीं दृढ येत सार ॥
अंतीं मनोमंदिरिं राहण्यातें ॥ काकामराळापरि धांवती ते ॥ ५ ॥
असावे भले गुप्त लोकीं विचार ॥ तयांच्या बळीं थोर आहे मदार ॥
कराया नवी सृष्टि दैवा रचाया ॥ कृति ईश्वरी गूढ आहे कळाया ॥ ६ ॥

---

## सेवकसंहार.

### साकी.

भासे मजसीं कंप होउनी पृथ्वीतलाचा घोर ॥
गेले मरुनी सेवक सारे विनाश झाला घोर ॥ १ ॥

मुद्रा प्रफुल्ल विलासियांची काळी काळी झाली ॥
सुखी जनांची पांचावरती धारण येउनि बसली ॥ २ ॥
धनिक विलासी निर्धळ झाले धुंदी त्यांची उडली ॥
सगळे गाणें सहास्य सोडुनी देति शिव्या लाखोली ॥ ३ ॥
परावलंबी जनताहृदयीं भीती अतर्क्य शिरली ॥
मृत्युविनाशें सारी अवनी तेव्हां खचुनी भरली ॥ ४ ॥

---

## खरा श्रीमंत कोण ?

### साकी.

एके दिवशीं एक खगानें उडतां बालक दोन ॥
एका नगरीं पंखावरती नेले निज बसवोन ॥ १ ॥
एक मुलाला ठेवी खग तो सुंदर गृहिं धनिकाच्या ॥
दुसऱ्याला तो उतरी उटजीं निर्धनशा मजुराच्या ॥ २ ॥
धनिक म्हणाला आनंदानें सुपुत्र मम होणार ॥
भूजलधीचा स्वामी जगतीं महत्पदीं जाणार ॥ ३ ॥
बदला मजूर कष्टें इच्छा प्रभुची घरांत आलें ॥
एकाधिक मुख खाया देवा कैसें आतां चालें ॥ ४ ॥
श्रीमंताचा मुलगा झाला सुंदर बलाढ्य मोठा ॥
लक्षपतीचा भरला आंगीं त्याच्या केवळ ताठा ॥ ५ ॥
जीव तंववरी भोगविलासीं समय क्रमिला त्यानें ॥
कितिं वर्षांची दिनांत एका केली चैन तयानें ॥ ६ ॥
कीर्तिप्रतिष्ठाभूमि त्यानें विकत घेतली भारी ॥
शशिमुखि सुंदर त्यानें केली द्रव्यबळावर नारी ॥ ७ ॥
केला प्रवास साऱ्या जगभर विलासभोग अपार ॥
त्याच्या हृदयीं विळखा घालुनि अतोष झाला स्वार ॥ ८ ॥
झुडुपांमधुनी पानांत जसा विखार बैसे घोर ॥
संसृति असार भासे त्याला रत्नें दिसतीं गार ॥ ९ ॥
वीट तयाला आला स्त्रीचा संशय ही देवाचा ॥
मेला पशुसा राख करी हा ! अग्नी देह तयाचा ॥ १० ॥
सेवकसुत तो शेतीं खपतो श्रम करी सारा वेळ ॥
प्रार्थी देवा अनुदिन, ठेवा निरोग मजसी सबळ ॥ ११ ॥
प्रेमासाठीं लग्न तयानें केलें तरुणपणांत ॥
त्याच्या समान झालीं त्याला दोन अर्भकें शांत ॥ १२ ॥

सरळ राहणी त्याची साधें त्याचें धर्माचरण ॥
श्रद्धा त्याला प्रभुची ठेवी शांतिसुखीं आमरण ॥ १३ ॥
हलके करिते श्रम ती त्याचे साह्य करी मृतिकालीं ॥
आशा नयनीं ठेवी, करिते प्रसन्न मुख स्मित गालीं ॥ १४ ॥
कर्तव्याची इथल्या सीमा झाल्यानंतर आतां ॥
दोघांमधुनी कोण कथावा श्रीमंत खरा होता ॥ १५ ॥

---

## वर्ष प्रतिपदेचा निश्चय.

### श्लोक.

गेल्या वर्षी गत बुडतसे फाल्गुनी मास जेंवी ॥
झालीं पापें कुजत पडूं दे तीं गतायूंत तेंवी ॥
आशा ठेवीं नविन पुढती जन्म होणार आहे ॥
स्वर्गा जाया चढुनि रचितों स्वीय सोपान पाहें ॥ १ ॥
उत्साहाच्या रविकिरणिं त्वां राहवें शांत भारी ॥
हानीदुःखें विसरुनि सदा भूतकालीन सारीं ॥
अर्धें आम्ही बल दवडितों व्यर्थ खेदीं जगांत ॥
गेल्या गोष्टी कथित बसतों कंठितों काळ हंत ॥ २ ॥
तुझा चूकला रोंखिला काय बाण ॥
अझुनी दिसे तें पहावें निशाण ॥
उरीं शर्यतीचा शिरे शीण काय ॥
दमा घेउनी सिद्ध अन्यार्थ होय ॥ ३ ॥
जरी संकटांच्या घनें भीत होसी ॥
पहा नीट तो भास आहे मनासी ॥
श्रमानें असे पात झाला तुझा कां ॥
तुझे चक्षुला अंजनाची शलाका ॥ ४ ॥
भूताब्दांचें अनुसरतसे भूतकालास सैन्य ॥
जोडीं त्याला त्वरित पळतें संपलें वर्ष धन्य ॥
जावें तुम्ही प्रगतिकर तो मार्ग नेटें धरोनी ॥
दृष्टी ठेवा निज त्रिभुवरी तोंड द्यावें तुफानीं ॥ ५ ॥
ठेवोनीयां पद दृढ वरी पातकांच्या चितेच्या ॥
खेदा सोडीं मन दृढ करीं निश्चयें पूर्णतेच्या ॥
तारे जों जों भ्रमति गगनीं तोंवरी दुःखितातें ॥
नाहीं कांहीं भय मग पुढें सांगतों सद्वचातें ॥ ६ ॥

झाली हानी जरि दिसतसे सर्व ही जीविताची ।।
वेळा गेली न नव घटनासिद्धि साधावयाची ।।
दुःखी कष्टी मुख अवनिचें जाहलें म्लान कालें ।।
त्यातें पाहें उजळ करितें वर्ष जें नव्य आलें ।। ७ ।।

---

## प्रेम.

### श्लोक.

ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे.

प्रेमा आहे परिधि उमजां मध्य बिंदू भवाचा ।।
प्रेमा आहे उगम गतिही चेतनाचेतनांचा ।।
द्वार प्रेमा स्वसुखअसुखां हर्षशोकांस थारा ।।
भावी भूतां सकल जगिंच्या हानिलाभां पसारा ।। १ ।।
दुष्टा पापासम कटु असे प्रेम हें मृत्यु लोकीं ।।
पीयूषाच्यापरि मधुरही प्रीति आहे विलोकीं ।।
प्रीती आहे खुण निज जिवा स्वर्गद्वारीं शिराया ।।
त्याच द्वारें समथि नरका लावितें प्रेम जाया ।। २ ।।
प्रेमा आहे मुकुट शिरिंचा वाढवी गौरवाला ।।
प्रेमा ओझें शिरिं घडवितो दोषही मानवाला ।।
प्रेमा आहे जनुमरण कीं सृष्टिचा तो नियन्ता ।।
प्राण प्रीती न च तिजविना वस्तुमात्रांत सत्ता ।। ३ ।।
प्रीती सत्ता प्रबळ, अखिला सृष्टिला चालवीते ।।
सारे प्राणी शिर नमविती स्वांतरीं जाणती ते ।।
जन्मोजन्मीं मनुज फिरतो स्वार्थ शोधावयातें ।।
पुष्पोपुष्पीं भ्रमर शिरती सन्मधू न्यावयातें ।। ४ ।।
आकाशीं या भ्रमत वसुधा धांवुनी प्रेमपाशें ।।
आलिंगाया प्रियतम रवी संगमाच्या सदाशें ।।
त्या प्रेमाचें अनुचर खरें निर्मितें सृष्टिजात ।।
चाऱ्ही बाजू सहज हलतें प्रीतिनेंची प्रशांत ।। ५ ।।
या जन्माला सफळ करितें एकटें प्रेम साचें ।।
प्रेमें राहे मरणभय न स्वांतरीं मानवाचे ।।
देवा आहे सुखद जग हें, मोहवी कष्टकारी ।।
ज्यांना प्रेमा कळत, न कळे ते दयापात्र तारी ।। ६ ।।



---

# भावी अवतार.

## श्लोक.

केलें जयांनीं जगिं धर्मशास्त्र ॥ होवोनी गेले मुनि कीर्तिपात्र ॥
स्वातंत्र्ययोगीं तनुपात केला ॥ वीरीं स्वयें स्वर्गहि साधियेला ॥ १ ॥
जे वीर आजीं जगिं विद्यमान ॥ जयापुढें वांकवि लोक मान ॥
त्यांची स्तुती ना मम ये मुखातें ॥ होणार गातों अवतार त्यातें ॥ २ ॥
चाले स्त्रियांचें खर युद्ध आजीं ॥ त्यांतून जन्मे नर एक गाजी ॥
सामर्थ्य दैवी वर बुद्धि ज्याला ॥ भूलोकिं येणार कथीं तुम्हांला ॥ ३ ॥
शुद्धीं तयाच्या हृदिं संचरे ना ॥ निजार्थवृत्ती सहसा स्फुरे ना ॥
भंगील अन्याय बळें जगांत ॥ कर्मांचि तो भूषण मानि शांत ॥ ४ ॥
उत्साह मोठा भय त्यास नाहीं ॥ ईशांश सर्वेश्वर शक्ति पाहीं ॥
येईल अत्यंत अगत्य जेव्हां ॥ कीं पाहिजे त्या घटकेस तेव्हां ॥ ५ ॥
शत्रुत्व जें मानवमानवांचें ॥ क्षणार्धमात्रें शमवील साचें ॥
दासांत लक्ष्मीसुत जे तयांत ॥ जें युद्ध चाले करि तोचि शांत ॥ ६ ॥
येणार तो येत असे कराया ॥ सद्भावना सत्पथ दाखवाया ॥
न दुंदुभीचा ध्वनि येत कानां ॥ त्याच्या ठिकाणा जरि ना निशाणा ॥ ७ ॥
क्लेश स्त्रियांना पडतात घोर ॥ स्वतंत्र निर्भीड खरे विचार ॥
हे सांगती दूत असे निघाला ॥ स्वर्गाहुनी भूवरि यावयाला ॥ ८ ॥
यत्पौरुषातें इतिहास वानी ॥ जे जे कवींच्या सुरसाल गानीं ॥
गेले मुनीवीर मरोनि थोर ॥ शोचूं नको भूत युगांस घोर ॥ ९ ॥
होणार आहे नर ईशरूप ॥ त्याच्या गुणें तेज जगा अमूप ॥
लोकांस अद्यापि पहावयाचा ॥ भावी जगीं वैभवकाल साचा ॥ १० ॥

---

# प्रेमाचें साम्राज्य.

## साकी.

एके दिवशीं पूर्व दिशेला होतां रविचा उदय ॥
राज्य निघालों शोधायातें प्रेमाचें मी अभय ॥ १ ॥
मार्गीं भेटे कविवर मजला केला प्रश्न तया मी ॥
मार्गद्वय हें यांतुनि सांगा सुलभ कवण तो स्वामी ॥ २ ॥
मज म्हणुनि या, कवि सांगतसे सत्वर दिसतिल जातां ॥
प्रकाशयोगें उज्ज्वल शिखरें त्या राज्याचीं आतां ॥ ३ ॥
पुढती दिसली दीर्घ पसरली सुंदर शोभा जीची ॥
कवी ह्मणाला नगरी पाहा कांती दिव्य तियेची ॥ ४ ॥

परि मी झालों खिन्न अहाहा, आशा विलया गेली ॥
स्वप्नाचें तें राज्य निघालें त्याला माया व्याली ॥ ५ ॥
पुढें भेटला वीर सदा जो आनंदीं मग्न मला ॥
विचारितांची त्याला, मागें या हो, ऐसें वदला ॥ ६ ॥
आनंदानें मार्गीं दोघे चालुनि झरझर गेलों ॥
सुंदर तीरा जीवोदधिच्या जवळीं जाउनि ठेलों ॥ ७ ॥
नंतर गेलों खिंडीमधुनी रमणीया जी भारी ॥
काश्मीराच्या खिंडीहुनिही नवलपरीं सुखकारी ॥ ८ ॥
कुंजांमधुनी फुलासारखी सुमुखी दिसली मातें ॥
त्या वीराला पाहुनि हंसली मोदें स्मितवदना ते ॥ ९ ॥
वीर म्हणाला नरजन्माचा हेतू येथें फळला ॥
पूर प्रेमाआनंदाचा निर्मल येथें वळला ॥ १० ॥
जीव परी मम निराश झाला, हा हा, सांगू काय ॥
कारण होतें केवळ इंद्रियराज्य तेथलें हाय ॥ ११ ॥
जातां जातां मंद गतीनें खिसला रथ, लक्षीत ॥
त्याच्या मागें रक्षक होते रथपतिला रक्षीत ॥ १२ ॥
मंदिर अमुच्या बाईचें हो प्रेमाच्या राज्यांत ॥
आहे, यावें, अमुच्या संगें, वदति असें ते शांत ॥ १३ ॥
धैर्योत्साहें गेलों मागें त्यांची धरुनी कांस ॥
वृद्धा परि तिस नटाथटाया नव नवरीची हौस ॥ १४ ॥
संध्यासमयीं रविकर जैसे आशा मम मावळली ॥
कांचनराज्यीं प्रविष्ट झालों भ्रांति मनाला पडली ॥ १५ ॥
उठजद्वारीं सुंदर कुमरी दिसली तीस विचारीं ॥
ऐकियलें तें राज्य असे मी, ऐसें म्हणत बिचारी ॥ १६ ॥
गृहराज्यांतुनि बाहिर माझा कधिंही पाय निघे ना ॥
म्हणुनी मजला मार्ग तयाचा ठावा थेट असे ना ॥ १७ ॥
निहाळिलें म्यां उठजप्रांता शांतीनें रम्य दिसे ॥
कुमारिका ती हंसो तैसी आनंदें खेळतसे ॥ १८ ॥
तेव्हां प्रकाश पडला हृदयीं शब्द निघाले वाचें ॥
गृहची आहे केवळ पाहें राज्य खरें प्रेमाचें ॥ १९ ॥

---

## धैर्य.

### श्लोक.

स्वबल परम आहे धैर्यरूपी विशाल ॥
असुख जनक त्याचा पूर्ण आहे कराल ॥

त्रिजगिं विजय पावे आदिशक्तीसमान ॥
प्रचलित भयभारा दूर सारी महान ॥ १ ॥
अकळ सकळ भावी संकटातें निवारी ॥
धरित सहनशक्तिशीर्षरक्षेस भारी ॥
अशनिकठिन छाती शूरवीरासमान ॥
जळत जळत कांहीं शोक निश्वास ज्या न ॥ २ ॥
प्रखर जरि हि देहीं आगिनें जाळ झाला ॥
अढळ हृदय गातों ईश्वराच्या यशाला ॥
अतुल अभय पोटीं पवढें धैर्य भारी ॥
कवचसमचि दुःखें घालितें आंगि सारीं ॥ ३ ॥
नयनिं बघुनि त्याला दैव भी चापपाणी ॥
पळत करुनि मुद्रा आपुली दीनवाणी ॥
समजुनि मनिं माझें येथ कांहीं चले ना ॥
खरतरशरपातें कार्य येथें घडे ना ॥ ४ ॥
तनुसि कवच घाली जो असे भेदहीन ॥
कठिण धरुनि शस्त्रें सिद्ध ऐसा प्रवीण ॥
बघुनि नयनिं भीतो मृत्यु ही त्या स्वभावें ॥
चळचळ तनु कांपे थोर धैर्यप्रभावें ॥ ५ ॥

---

## स्थित्यंतर.

### श्लोक.

वसंत ऋतु चांगला तरि हि वर्ष कंटाळतें ॥
निदाघसमया नव्या धरुनि हर्ष कौटाळितें ॥
विटे अवलतेस तें प्रखर ताप आणीत जी ॥
सुशीत सुख वृष्टिचें बघुनियां निदाघा त्यजी ॥ १ ॥
कळ्यांस तरुही विटे सुभगभूषणा सत्वरीं ॥
प्रफुल्ल कुसुमें शिरीं रुचिर गंध गर्वें धरी ॥
भरें लवति लाजुनी शिणति सर्व शाखा फुलें ॥
तदा धरुनि सत्फळें बहुत हर्षयोगें डुले ॥ २ ॥
दशांतरगुणें सुखी परम होतसे जीवन ॥
सुखासुख जुनें तया हृदय जात कंटाळुन ॥
विलक्षण नवी नवी प्रगटते विचारावली ॥
अशाश्वतचि सुखें न तीं टिकति दीर्घ या भूतलीं ॥ ३ ॥

अभीष्ट रुचि आजच्या बदलती उद्यांच्या नव ॥
मना विषय आवडे न चिर तोषती मानव ॥
तनु त्यजुनियां जुनी नव धरीत आत्मा जसा ॥
गताब्दवसनें जशीं त्यजिति देह येथें तसा ॥ ४ ॥

खरें प्रगतिचिन्ह तें बदल होत लोकान्तर ॥
विटोनि सुपथा जुन्या नविन शोधिताती नर ॥
अतोष मनुजान्तरीं प्रवळ वासनेच्या गुणें ॥
प्रयत्न करवी गिरी चढुनि जावयाचे दुणे ॥ ५ ॥

भजोत कुणि बापुडे हृदयमंदिरीं आपुले ॥
सदा स्थितिस एकची धरुनियां तिचीं पावलें ॥
क्रमेंकरुनि जीवनीं करिन थोर रूपान्तर ॥
करीत नव सांवली उडवि जें अनास्था दुर ॥ ६ ॥

---

## लोकांस काय पाहिजे.

### श्लोक.

आझीं वाहुनि नित्यनित्य दुखती पाठी जयांच्या श्रमें ॥
घेवोनि अति कष्ट अल्प धन दे श्रीमंत ज्यांना भ्रमें ॥
त्यांचा भार कुणी बली उतरवी राष्ट्राधिप स्वाधिन ॥
तोची धन्य खरा जगास सगळ्या आनंदकारी दिन ॥ १ ॥

द्रव्या सांचविता तया न समयीं पावे कुणी मान्यता ॥
अन्याच्या न कुणी श्रमावरि मजा मारील तैं धन्यता ॥
कष्टें दीन अहर्निश श्रमति जीं त्या आपुल्या लेंकरा ॥
पृथ्वीच्या मधली विभागुनि विभु संपत्ति देतो बरा ॥ २ ॥

पृथ्वीच्या उदरीं अखंड भरती लक्ष्मीस सर्वा असे ॥
भांडारीं महिच्या भरोनी उरली कीं अन्नपूर्णा वसे ॥
धर्मे भाग कराल कोश तरि तो राहील जैसा तसा ॥
द्यावें इष्ट नरा विशंक तितुकें लोभें भरीं ना पसा ॥ ३ ॥

द्रव्याचा व्यय ना करी कृपण जो धिःकार त्याला असे ॥
नाडी कर्मकरांस कोश अपुला वाढावयाला तसें ॥
खांचा खोदिति जे तयांस दिडकी धांवे कमी द्यावया ॥
दीनान्नांतुनि भाकरी न कळतां जो चोरितो खावया ॥ ४ ॥

[library stamp]

झाले जे खनिचे धनी लखपती धिःकार त्यांना असे ॥
स्वार्थे निष्टुरतागुणें मिळविती संपत्ति जे दैत्यसे ॥
ज्याचें सर्पण फोडिती मनुज ते चिंध्या सदा गाळिती ॥
आशारोग्यसुखास पूर्ण मुकती त्याची न ज्याला क्षिती ॥ ५ ॥
जे श्रीमंत सदा रथांत फिरती धिःकार आहे तया ॥
अर्धे वेतन माणसा वितरुनी जीवावरी त्यांचिया ॥
नाहीं संततिलग्नदारगृहही ठावीं जया कापडें ॥
मेंढ्याच्या कळपापरी खपति जे कार्यालयीं बापडे ॥ ६ ॥
दीनांचा बहु कर्कश ध्वनि भयें सर्वांस जागें करो ॥
त्यांची दृष्टि करो विशाल कृतिचें मालिन्य त्यांच्या हरो ॥
धर्मन्याय करें तयांस हलवो देवोनि झोंका बळें ॥
अन्यायें मिळवीयलें धन तया सोडोनि सारें पळें ॥ ७ ॥
कोणी द्रव्यगिरीवरी वसुं नये संपादिल्या चोरुनी ॥
कोणा निर्धनता न शैत्य दुखवो जन्मान्तरीं येउनी ॥
धर्माची उपजीविका वर असो भिक्षा नको केवळ ॥
आम्ही मागतसों विभागसमता द्रव्यश्रमीं दुर्बळ ॥ ८ ॥

---

# इच्छा देवी.

## श्लोक.

ज्यांच्या साठीं तळमळ खरी होतसे मानसाची ।
वर्षोवर्षी स्थिर चिर असे उत्कटेच्छा जयांची ॥
ते ते अर्थ प्रगट मिळती पात्र झाल्या जिवाला ॥
तीव्रा इच्छा जवळजवळीं ओढिताहे शिवाला ॥ १ ॥
स्वज्ञीवाची प्रबळ बरवी लाव मोठी सतार ॥
इष्टार्थाशीं स्वर मिळवुनी कष्ट भावीं असार ॥
त्या दोघांचा समरस घडे जेधवां तालसूर ॥
इच्छादेवी तुजवरि करी हर्षवृष्टि प्रचूर ॥ २ ॥
इष्टा वस्तु वसत तुझिया पासुनी लांब भारी ॥
वाचाचक्षूहुनि पर असे गुप्त विश्वीं अपारीं ॥
जेव्हां जीवा अनुकुल तसे वागसी जीवितांत ॥
इच्छादेवी म्हणसि तसले धावथा अर्थ येत ॥ ३ ।

श्री कृष्णार्पणमस्तु.

ठी ग्रंथ संग्रहालय,
नं.
ता.
ठाणे

REFBK-0002363

REFBK-0002363

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 23565